महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची ७१ वी बैठक

बैठक दिनांक	दिनांक १७ मे २०२२
ठिकाण	मराठवाडा महसूल प्रशिक्षण प्रबोधीनी, जालना रोड, औरंगाबाद
वेळ	सकाळी ११.०० वाजता

बैठकीचे इतिवृत्त

विषय क्रमांक. १: - **सन्माननीय सदस्यांच्या रजे बाबत.**

ठराव क्रमांक. १: - **सन्माननीय सदस्य श्री. फारुक अनवर शाह यांची रजा एकमताने मंजुर करण्यात येत आहे.**

विषय क्रमांक.२: - **दिनांक २७.०२.२०२२ रोजी झालेल्या बैठकींचे इतिवृत्त वाचून कायम करणेबाबत पुढील प्रारुप ठराव मान्यतेसाठी ठेवण्यात येत आहे-**

ठराव क्रमांक. २: - **दिनांक २७.०२.२०२२ रोजी झालेल्या बैठकींचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले./सुधारणांसह कायम करण्यात आले.**

(नोंदणी विभाग)

विषय क्रमांक ३:- **वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार नोंदणी प्रस्तावांना मान्यता देणे बाबत.**

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार राज्यात अस्तित्वात असलेल्या वक्फ संस्थांच्या नोंदणीच्या प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करण्यात येऊन सर्व बाबीची पुर्तता करणा-या एकूण (८७) प्रस्तावांची यादी खालील प्रमाणे आहे. प्रस्तावांच्या छाननीची कार्यवाही सतत सूरू असून बैठकीच्या प्रत्यक्ष दिनांकापर्यंत आणखी जेवढे प्रस्ताव परिपूर्ण आढळून येतील, त्या सर्व प्रस्तावांची पुरवणी यादी वक्फ मंडळाच्या बैठकी पुढे मान्यतेसाठी ठेवण्यात येईल.

Statement showing the list of registration u/s 36 of the Waqf Act 1995 proposal for final approval of the Board.

Sr. No.	File No.	Name of Waqf Instituion	Address	Village	Taluka	District	If Any case pending in the court Yes /No	Any court order Yes/ No
1	ABD/883/ 2015	Arbi Madarsa Rahemaniya	Avhana Road, Usman Nagar	Sillod	Sillod	Aurangabad	No	No
2	ABD/483/ 2017	Masjid-E-Bibi Mariyam and Arbi Madarsa	at Property No. 655	Ajantha	Sillod	Aurangabad	No	No
3	ABD/235/ 2021	Masjide Jubeda Vajir	At. Kasabkheda	Kasabkheda	Khuldabad	Aurangabad	No	No
4	ABD/110/ 2020	Jama Masjid	Deogaon	Deogaon Rangari	Kannad	Aurangabad	No	No
5	ABD/584/ 2019	Mohammadiya Masjid	Plot No. 25, Ibrahim Colony, Jatwada Road, Harsul	Aurangabad	Aurangabad	Aurangabad	No	No
6	ABD/1019 /2016	Madarsa Ayesha	G. No. 7, Plot No. 2 and 3, Bhavsingpura	Padegaon	Aurangabad	Aurangabad	No	No
7	ABD/92/2 020	Gulshane Raza Madarsa & Masjid	Deogaon	Deogaon Rangari	Kannad	Aurangabad	No	No
8	ABD/586/ 2019	Amin masjid	At.Garkheda	Garkheda	Aurangabad	Aurangabad	No	No
9	ABD/325/ 2021	Kabrastan (Balapur)	Gut. No. 49, Balapur	Balapur	Aurangabad	Aurangabad	No	No
10	ABD/594/ 2009	Noorani Masjid	At. Kunnjkheda	Kunj Kheda	Kannad	Aurangabad	No	No
11	ABD/666/ 2019	Masjid-E-Amire Hamza Maslak E Ala Hazrat	At. S. No. 225/3/1 Plot No. 15, Harsul	Harsul	Aurangabad	Aurangabad	No	No
12	ABD/599/ 2017	Masjid and Madarsa Bashir	At Aland	Aland	Phulambri	Aurangabad	No	No
13	ABD/82/2 022	Madarsa wo Masjid Jamiya Milliya Islamiya	at Ghodegaon	Ghodegaon	Khuldabad	Aurangabad	No	No

14	JLN/31/2015	Mohammadiya Madarsa Wo Mohammadiya Masjid	At S. No. 49, Chandanzira	Jalna	Jalna	Jalna	No	No
15	JLN/31/2022	Madarsa Dawatul Haq	At. Post. Nutan Wasat, Ambad Road	Jalna	Jalna	Jalna	No	No
16	BED/534/2018	Masjid Shaikh Masud Kirmani & Arbiya Madarsa	H.No.10-1988, Area No.10, Kranti Nagar	Ambajogai	Ambajogai	Beed	No	No
17	BED/783/2016	Masjid-e-Afzal Bi Mohd Nabi and Arbi Madrasa	At Ambajogai	Ambajogai	Ambajogai	Beed	No	No
18	BED/107/2015	Kabrastan Wo Masjid	Gadhi	Gadhi	Georai	Beed	No	No
19	BED/590/2018	AbuBakar (Bagwan) Masjid,	Raviwar Peth, Bagwan Galli	Ambajogai	Ambajogai	Beed	No	No
20	BED/30/2018	Madina Masjid	Rasulabad	Rasulabad	Georai	Beed	No	No
21	BED/548/2019	Masjid Jamiya Islamiya Arbiya Tayyabul Uloom	Bagpimpalgaon	Bagpimpalgaon	Georai	Beed	No	No
22	BED/11/2020	Masjid Dawat	Karchundi	Karchondi	Beed	Beed	No	No
23	BED/41/2018	Madina Masjid	At post Chaklamba	Chaklamba	Georai	Beed	No	No
24	BED/631/2019	Hussaniya Arbi Madarsa & Masjid	Hussainiya Colony, Telgaon Naka	Beed	Beed	Beed	No	No
25	BED/182/2017	Madarsa Arbiya Talimul Quran wa Noorani Masjid	At Saundana	Saundana	Kaij	Beed	No	No
26	BED/161/2018	Quadar Chand Arbi Madarsa	Maulana Azad Nagar, Shaunagar,	Beed	Beed	Beed	No	No
27	PBN/550/2018	Jama Masjid	At.Naikota	Naikota	Sonpeth	Parbhani	No	No

28	PBN/258/ 2017	Masjid and Madarsa Arbiya Dare Arqam	Pathan Mohalla	Jintur	Jintur	Parbhani	No	No
29	PBN/397/ 2021	Masjid Hazrat Syed Sadat	At. Babar Colony	Parbhani	Parbhani	Parbhani	No	No
30	PBN/427/ 2017	Madarsa & Masjid Hazrat Khwaja Gariban Nawaz	At Barkat nagar	Parbhani	Parbhani	Parbhani	No	No
31	PBN/256/ 2017	Masjid Abubakar (Sid.)	Sulaiman Colony, Idgah Road	Warud	Jintur	Parbhani	No	No
32	NDD/293/ 2016	Masjid Faiz Siddiqui RaziAllah Tala Anha	Sharavasti Nagar	Nanded	Nanded	Nanded	No	No
33	NDD/847/ 2017	Masjid Va Dini Darsgah Madarsa Mumtaz Begum W/o. Masood Chaush, Ahle Sunnat Wal Jamat	Millat Nagar, Gut No. 17/2, Village Brahampuri	Brahampuri	Nanded	Nanded	No	No
34	NDD/354/ 2016	Masjeed-E-Rahamatiya	Nandigram Housing Society, Sharda Nagar	Nanded	Nanded	Nanded	No	No
35	NDD/10/2 018	Masjide-Alhira & Maktabe Allama Ibne Aljozi Deeni Darsga	Alhira Colony, Millat Nagar, Deglur Naka	Nanded	Nanded	Nanded	No	No
36	NDD/90/2 018	Faizan-E-Mustafa Arbi Madarsa and Masjid Faizan-E-Mustafa Ahle Sunnat Wal Jamat	Mahatma Gandhi Chowk	Hadgoan	Hadgaon	Nanded	No	No
37	NDD/754/ 2018	Noorul Islam Dini Darasgah & Masjid	Barkatpura	Ardhapur	Ardhapur	Nanded	No	No

38	NDD/398/2021	Masjid E Quwwate Islam	At Balirampur	Balirampur (CT)	Nanded	Nanded	No	No
39	NDD/399/2021	Graveyar	Sangvi (Bk)	Sangvi (Bk)	Nanded	Nanded	No	No
40	LTR/681/2016	Nabi Deeni Arbi Madarsa and Masjid	Nabi Nagar Latur Road Ausa	Ausa	Ausa	Latur	No	No
41	LTR/488/2021	Jama Masjid	At. Ujani	Ujani	Ausa	Latur	No	No
42	OSD/342/2018	Makka Masjid	Dalimb	Dalimb	Umarga	Osmanabad	No	No
43	OSD/349/2021	Muslim Kabrastan	At Kajla	Kajla	Osmanabad	Osmanabad	No	No
44	OSD/984/2015	Masijd wo Kabrastan,	Ruibhar	Ruibhar	Osmanabad	Osmanabad	No	No
45	RGD/36/2022	Markaz E Islami Trust	Situated at Gut No. 18/1	Wawanje	Panvel	Raigad	No	No
46	NSK/841/2018	Masjid-O-Madarsa Ahle Sunnat Haji Shaikh Gulab	S.No193/1 Plot NO 110/11 Nomani Nagar	Malegaon	Malegaon	Nashik	No	No
47	ADR/568/2019	Madarsa Mohammadiya Masjid, Kabrastan and Idgah	Loni (Kh)	Loni Khurd	Rahta	Ahmednagar	No	No
48	ADR/11/2021	Gulshane Kadriya Trust	Nimon	Nimone	Sangamner	Ahmednagar	No	No
49	ADR/371/2018	Masjid-O-Madrasa Haji Gulam Rasool Shah Talimul Quran	at Gut No. 93/1 to 4/361, Ward No. 2	Shrirampur	Shrirampur	Ahmednagar	No	No
50	ADR/142/2021	Masjid & Madarsa Ashabe Rasul	Rehmat Nagar	Sangamner	Sangamner	Ahmednagar	No	No
51	ADR/250/2020	Jama Masjid	Gonegaon	Gonegaon	Newasa	Ahmednagar	No	No
52	ADR/282/2020	Kaba Masjid	Ward No 1	Shrirampur	Shrirampur	Ahmednagar	No	No
53	ADR/352/2012	Madarsa Taqwa Trust	Ward No. 2, Qureshi Mohalla	Shrirampur	Shrirampur	Ahmednagar	No	No

54	JGN/299/2021	Hazrat Sayyad Ahemad Shah Kamali Rahematullah Aleh Dargah	Dharangaon	Dharangaon	Dharangaon	Jalgaon	No	No
55	JGN/421/2019	Sutar Muslim Kabrastan	G.No. 2320 Nasirabad	Nashirabad	Jalgaon	Jalgaon	No	No
56	JGN/755/2017	Jama Masjid	Devalgaon (Gu)	Devalgaon (Gu)	Jamner	Jalgaon	No	No
57	JGN/13/2021	Jumma Masjid, Madarsa and Kabrastan	CTS No. 1991 & 1992	Paldi Bk	Dharangaon	Jalgaon	No	No
58	JGN/16/2021	Maniya Wo Bagwan Kabrastan	Gut No. 2	Paldi Bk	Dharangaon	Jalgaon	No	No
59	PUN/27/2017	Hazrat Bagul Shah Wali Rehmatullah Dargah	Loni	Loni Kalbhor	Haveli	Pune	No	No
60	PUN/320/2021	Usman Ibne Affan Masjid Arbi Madarsa	S. No. 64/A, Indra Nagar, Handewadi Road	Hadapsar	Haveli	Pune	No	No
61	PUN/158/2020	Darul Ulum Sattariya	S.No.100/2	Kuruli	Shirur	Pune	No	No
62	SLR/38/2018	Haji Hafiz Fatte Mohammad Jodhpuri Masjid Va Madarsa	Plot No. 7, Gut No. 83/4/B	Akluj	Malashiras	Solapur	No	No
63	KPR/310/2021	Masjid wo Madarsa Umar Bin Khattab Rz. Ahele Hadees Wakf Trust	Shahpur	Shahpur	Hatkanangle	Kolhapur	No	No
64	STR/638/2018	Gausiya Masjid wo Kabrastan	At Eksal	Eksal	Koregaon	Satara	No	No
65	STR/834/2018	Kabrastan (Masanvata)	Padali Station, Satara Road	Padali Station	Koregaon	Satara	No	No
66	STR/986/2018	Muslim Samaj Kabrastan and Idgah	CTS. No. 783	Dahiwadi	Maan	Satara	No	No

67	STR/309/2021	Jama Masjid (Islam Mandir) Trust	Maldan	Maldan	Patan	Satara	No	No
68	STR/983/2018	Jama Masjid	Property No. 2524	Dahiwadi	Maan	Satara	No	No
69	STR/984/2018	Old Kabrastan	Gut No. 353/B	Dahiwadi	Maan	Satara	No	No
70	STR/969/2018	Masjid-a-Ayesha	46/Plot No 113, Birdeo Nagar, Jadhavwadi	Jadhavwadi	Phaltan	Satara	No	No
71	STR/987/2018	Madina Masjid	CTS. No. 1513	Dahiwadi	Maan	Satara	No	No
72	AMT/791/2019	Masjid E Taiba Wa Arbi Madarsa	At Janta Colony, Habib Nagar	Amravati	Amravati	Amravati	No	No
73	AMT/16/2019	Masjid Khalid Bin Waleed	Sabanagar	Amravati	Amravati	Amravati	No	No
74	AKL/1100/2015	Masjid-e-Ayesha(R.A.)	S. No. 387+396/B/4	Hiwarkhed	Telhara	Akola	No	No
75	AKL/391/2021	Madarsa wo Masjid-E-Mohsiniya-wo-Maktab	Nursing Colony	Nizampur	Akola	Akola	No	No
76	AKL/135/2014 & 76/2016	Masjid Bandukpura		Hiwarkhed	Telhara	Akola	No	No
77	BLD/635/2018	Noorani Masjid	At Alasna	Alasana	Shegaon	Buldhana	No	No
78	BLD/121/2017	Noorani Arbi Madarsa Wo Masjid (Ahle Sunnat Wal Jamaat),	Raza Colony	Mathani	Khamgaon	Buldhana	No	No
79	WSM/479/2011	Jama Masjid	Sakhardoha	Sakhardoh	Manora	Washim	No	No
80	WSM/25/2021	Masjid -e-Huzaifa wa Madarsa	Huzaifa Nagar (Millat Colony)	Washim	Washim	Washim	No	No
81	WSM/27/2021	Maktab Madina Masjid	At Madina colony	Washim	Washim	Washim	No	No
82	WSM/102/2022	Masjid wo Maktab Albadar	Savera Colony	Washim	Washim	Washim	No	No

83	WSM/157 /2022	Madina Masjid	Shendurana	Shend urana	MAngrulpir	Washim	No	No
84	WSM/158 /2022	Jama Masjid	At Ladegaon	Ladeg aon	Karanja	Washim	No	No
85	WSM/126 /2015	Nagina Masjid	Jhupad pati	At Kamar gaon	Karanja	Washim	No	No
86	NGP/155/ 2020	Raza-E-Mustafa Masjid And Madarsa	S.No. 101/1D-1	Mhas ala	Kamptee	Nagpur	No	No
87	NGP/299/ 2012	Maktab Darul Haque Masjid Wakf	at Pimpalgaon	Pimpa lgaon	Mauda	Nagpur	No	No

उपरोक्त प्रकरणे या कार्यालयाने तपासली असून ती बरोबर आहेत. मान्यतेसाठी शिफारस करीत आहे.

(अनिस शेख)
मुख्य कार्यकारी अधिकारी

ठराव क्रमांक ३:-

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार उपरोक्त एकुण (८७) नोंदणी च्या प्रस्तावांची तपासणी करण्यात आली असुन उपरोक्त (८७) नोंदणीच्या प्रस्तावांना मान्यता देण्यात येत आहे. ठराव कायम होण्याची वाट न पाहता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आदेश निर्गमित कराव्यात. मस्जीद नोंदणी बाबतचे बहुतांश प्रकरणे मंडळाकडे प्रलंबित आहेत. मस्जीद नोंदणी बाबत आगामी १० दिवसात विशेष मोहिम राबवून सर्व नोंदणी बाबतची प्रक्रिया मंडळाने पुर्ण करावी.

या कामासाठी अतिरिक्त कर्मचाऱ्यांची आवश्यक्ता असल्यास कंत्राटी पध्दतीने एक महिन्याच्या कालावधीकरीता कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी.

(चौकशी विभाग)

विषय क्रमांक. ४: -

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९(ए) नुसार योजना मंजूरीसाठीच्या प्रस्तावांना मान्यता देणेबाबत.

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नुसार राज्यात अस्तित्वात असलेल्या वक्फ संस्थांच्या योजना मंजूरीच्या प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करण्यात येऊन सर्व बाबीची पुर्तता करणारा प्रस्ताव खालील प्रमाणे आहे. प्रस्तावांच्या छाननीची कार्यवाही सतत सूरूअसून बैठकीच्या प्रत्यक्ष दिनांकापर्यंत आणखी जेवढे प्रस्ताव परिपूर्ण आढळून येतील, त्या सर्व प्रस्तावांची पुरवणी यादी वक्फ मंडळाच्या बैठकी पुढे मान्यतेसाठी ठेवण्यात येईल.

Sr No.	File No	District	Name Of Institution	If Any case pending in the court Yes/No	Any court order Yes/No
1.	69/62/2016	Aurangabad	Jama Masjid, Village. Shivna, Tq. Sillod, Dist. Aurangabad	No	No
2.	69/298/2017	Aurangabad	Graveyard and Chilla Zinda Shah Madar Alongwith Masjid, Kaman Mohlla near Nagarkhana, Village & Tq. Khuldabad, Dist. Aurangabad	No	No
3.	69/481/2017	Aurangabad	Dargah Mast Miyan, Dargah Syed Saheb and Masjid and Grave Yard, Village & Tq. Gangapur, Dist. Aurangabad	No	No
4.	69/75/2018	Aurangabad	Masjid-E-Mehboob and Arbi Madarsa, At Situated In Gut No. 106, Plot No. 107, At Mitmita, Village. Mitmita, Tq. Aurangabad, Dist. Aurangabad	No	No
5.	69/189/2018	Aurangabad	Masjid Ahlesunnat Gausul-Wara, At Plot No. 95 & 97, Khidki Bunglow, Qazi Mohalla, Village & Tq. Kannad, Dist. Aurangabad	No	No
6.	69/48/2021	Aurangabad	Masjid SarwarSaheb, Jagirdar alongwith Graveyard, At Ghatti, Village & Tq. Aurangabad, Dist. Aurangabad	No	No
7.	69/232/2021	Aurangabad	Tomb Mir Naqi Saheb and Masjid (delipidated), Village & Tq. Khuldabad, Dist. Aurangabad	No	No
8.	69/448/2021	Aurangabad	Masjid and Graves, near Maqbara, Begumpura, Village & Tq. Aurangabad, Dist. Auranbgabad	No	No
9.	69/451/2021	Aurangabad	Dargah Hazrat Mubarak Saheb, At Nandrabad, Village & Tq. Khuldabad, Dist.Aurangabad	No	No
10.	69/260/2022	Aurangabad	Masjid Shahi, Village. Nandrabad, Tq. Khuldabad, Dist. Aurangabad	No	No

11.	69/265/2022	Aurangabad	Dargah Hazrath Sk. Shah Jalaluddin Ganje Rawa alongwith two Masjids two Graveyards, two Khankhas, Dargah Hazarath Syed Sadat and Naqqar Khanas, At Suli Bhanjan, Village. Sulibhanjan, Tq. Khuldabad, Dis. Aurangabad	**No**	**No**
12.	69/38/2021	Jalna	Idgah, At Repala Road, Village. Jafrabad, Tq. Jafrabad, Dist. Jalna	**No**	**No**
13.	69/266/2021	Hingoli	Graveyard, At Hayat Nagar, Village & Tq. Basmat, Dist. Hingoli	**No**	**No**
14.	69/626/2015	Nanded	Rahmaniya Masjid . and Madarsa (Maktab), At Rahmaniya Colony, V/o Brahanpuri, Tq & Dist. Nanded	**No**	**No**
15.	69/627/2015	Nanded	Mohammadiya Masjid and Arbi Madarsa Ahle Sunnat Wal Jamat, At Mehboob Nagar, Village & Tq. Nanded, Dist. Nanded	**No**	**No**
16.	69/419/2021	Nanded	Masjid Yamna with Kabrastan, At Situated in S.No. 115 and 116, Manaspuri, Village. Manaspuri, Tq. Kandhar, Dist. Nanded	**No**	**No**
17.	69/186/2021	Osmanabad	Grave Yard. At Padsap, Village. Palsap, Tq & Dist. Osmanabad	**No**	**No**
18.	69/879/2014	Mumbai	Sunni Anjuman Garib Nawaz Masjid & Madarsa, At E-7, 554-D-1 Pathar Nagar, Bharat Nagar, Village & Tq. Bandra (E), Dist. Mumbai	**No**	**No**
19.	69/407/2017	Akola	Muslim Qabrastan, At At Balak-Shah, Village & Tq. Barsitakli, Dist. Akola	**No**	**No**
20.	69/390/2021	Akola	Madarsa & Masjid Aiesha, At Panaj, Village. Panaj, Tq. Akot, Dist. Akola	**No**	**No**
21.	69/410/2019	Washim	Maulana Mohammad Iliyas Muslim Masjid and Madarsa Wakf Panch Committee, At Karanja Lad, Village & Tq. Karanja, Dist.Washim	**No**	**No**
22.	69/389/2021	Washim	Mahmudiya Masjid & Madarsa, At Kamargaon, Village & Tq. kamargaon, Dist. Washim	**No**	**No**

23.	69/472/2015	Yavatmal	Darul Uloom Gausulwara Madarsa, At Arni, Village & Tq. Arni, Dist. Yavatmal	**No**	**No**
24.	69/94/2019	Yavatmal	Abdullah (Makka) Masjid, At Railwaystation, Village & Tq. Darwha, Dist. Yavatmal	**No**	**No**
25.	69/100/20219	Yavatmal	Madina Masjid, At Railwaystation, Village & Tq. Darwha, Dist. Yavatmal	**No**	**No**
26.	69/263/2021	Yavatmal	Masjid E Abubakar, At Plot No. 39, Rachna Layout, Village & Tq. Yavatmal, Dist. Yavatmal	**No**	**No**
27.	69/325/2021	Yavatmal	Gausiya Jama Msjid (Arbi Madarsa) Dargah Committee, at Mahagaon (kasba), Village. Mahagaon (kasba), Tq. Darwha, Dist. Yavatmal	**No**	**No**
28.	69/727/2015	Nashik	Hazrat Umme Kulsum Madarasa & Masjid,At Sangmeshwar, Village & Tq. Malegaon, Dist. Nashik	**No**	**No**
29.	69/278/2021	Nashik	Arab Masjid Trust, At 146 behind Mumbai Hotel, Village & Tq. Igatpuri, Dist. Nashik	**No**	**No**
30.	69/314/2016	Ahmednagar	Nimbale Masjid Dargah Wo Kabrastan Trust, Village. Nimbale, Tq. Sangamner, Dist. Ahmednagar	**No**	**No**
31.	69/268/2017	Ahmednagar	Sunni Muslim Jamat & Jama Masjid, Village. Loni Mawla, Tq. Parner, Dist. Ahmednagar	**No**	**No**
32.	69/328/2018	Ahmednagar	Kabrastan, at kuran, Village, Kuran, Tq. Sangamner, Dist. Ahmednagar	**No**	**No**
33.	69/82/2016	Nandurbar	Khand Bara Panch Masjid, At Khed Bazar, Village & Tq. Navapur, Dist. Nandurbar	**No**	**No**
34.	69/311/2020	Nandurbar	Shahi Masjid Panch Mandal, Village & Tq. Nandurbar, Dist. Nandurbar	**No**	**No**
35.	69/194/2018	Dhule	Peer Anjanshah Data (Dargah Idgah, Musafirkhana and Kabrastan, Village. Dhule, Tq. Dhule, Dist. Dhule	**No**	**No**
36.	69/203/2020	Jalgaon	Juma Masjid Trust, At Chopda, Village & Tq. Chopda, Dist. jalgaon	**No**	**No**
37.	69/562/2022	Jalgaon	Jumma Masjid Sanstha, Village. Parola, Tq. Parola, Dist. Jalgoan	**No**	**No**

38.	69/617/2015	Ratnagiri	i] Kokan Mohalla Jumma Masjid Kond Dapoli Taluka Dapoli Dist Ratnagir ii] Urdu School Building iii] Graveyard at Kond Dapoli, at Dapoli, Village & Tq. Dapoli, Dist. Ratnagiri	No	No
39.	69/297/2018	Ratnagiri	1] Masjid 2] Kabrasthan, At Nava Nagar, Village. Bhatiya, Tq. Ratnagiri, Dist. Ratnagiri	No	No
40.	69/465/2021	Ratnagiri	Jama Masjid wo Kabrastan Jamatul Muslemeen Trust, At Wave vr Natu, Village. Diwn Khawti, Tq. Khed, Dist. Ratnagiri	No	No
41.	69/227/2021	Raigad	Jama Masjid Jamatul Muslimin, Village. Warandh, Tq. Mahad, Dist. Raigad	No	No
42.	69/438/2015	Nagpur	Kachchi Memon Jamat Jama Masjid, At Sadar Bazar, Village & Tq . Nagpur Dist. Nagpur	No	No
43.	69/301/2021	Nagpur	Chhota Laharpura Masjid Trust, Village & Tq. Nagpur, Dist. Nagpur	No	No
44.	69/530/2021	Pune	Moinoor Masjid, At Kharadi, Village & Tq. Kharadi, Dist. Pune	No	No
45.	69/183/2020	Solapur	AR-Rahman Arabi Madarsa Wo Masjid, at Plot No. 48, Hazrat Bilal Nagar, Jule Solapur, Village & Tq. Solapur, Dist. Solapur	No	No
46.	69/474/2018	Satara	Jama Masjid (Khada Masjid), At Guruwar Peth, Village. Satara, Tq. Satara, Dist. Satara	No	No
47.	69/123/2020	Akola	Kabrastan and Masjid, Situated in S. No. 10 & 11 Naigaon, Akotfile Naigaon, Akola	No	No
48.	69/282/2022	Pune	Muslim Jamat Masjid, at Induri village Induri Tq. Mawal Dist Pune	No	No
49.	69-46-2022	Nashik	Masjid O Madarsa E Baghe Firdos at Bagbanpura, Village Chandwad Tq. Chandwad Dist Nashik	No	No

उपरोक्त प्रकरणे कार्यालयाने तपासली असून ती बरोबर आहेत. मान्यतेसाठी शिफारस करीत आहे.

(अनिस शेख)
मुख्य कार्यकारी अधिकारी

ठराव क्रमांक ४:-

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नुसार उपरोक्त व्यवस्थापन योजनाच्या प्रस्तावाची तपासणी करण्यात आली असुन उपरोक्त (४९) योजनाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. ठराव कायम होण्याची वाट न पाहता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आदेश निर्गमित कराव्यात.

विषय क्रमांक. ५: - वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४२ नुसार व्यवस्थापन बदलाबाबत प्रस्तावांना मान्यता देणेबाबत.

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ नुसार राज्यात अस्तित्वात असलेल्या वक्फा संस्थांच्या बदलाबाबत प्रस्तावांना मंजूरीच्या प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करण्यात येऊन सर्व बाबीची पुर्तता करणारा प्रस्ताव खालील प्रमाणे आहे. प्रस्तावांच्या छाननीची कार्यवाही सतत सूरूअसून बैठकीच्या प्रत्यक्ष दिनांका पर्यंत आणखी जेवढे प्रस्ताव परिपूर्ण आढळून येतील, त्या सर्व प्रस्तावांची पुरवणी यादी वक्फ मंडळाच्या बैठकी पुढे मान्यतेसाठी ठेवण्यात येईल.

Sr. No.	File No.	District	Name of Waqf Institution	If Any ease pending in the court Yes/No	Any court order Yes/No
1	42/249/2019	Mumbai	Imambara Haidari, At 26 Yaqub Street, Village & Tq. Mumbai, Dist. Mumbai	No	No
2	42/375/2016	Thane	Bangal Pura Masjid, At Bangal Pura Masjid, Village & Tq. Bhiwandi, Dist. Than	No	No
3	42/189/2020	Thane	Anjuman Taleem Ul Quran Arabi Madarsa , At Kalyan, Village & Tq. Kalyan, Dist. Thane	No	No
4	42/349/2021	Pune	Cutchi Memon Jamat and Jama Masjid, at 313 M.G. Road. Village & Tq. Pune, Dist. Pune	No	No
5	42/382/2019	Washim	Hazra Shah Badruddin Auliya Dada Hayat Kalandar Shah Sanstha Trust, Village. Mangroal Peer, Tq. Washim, Dist.Washim	No	No
6	42/388/2021	Washim	The Peer Gaibi Masjid Sanstha Trust, At Ward No. 7, Village & Tq. Washim, Dist.mWashim	No	No
7	42/523/2021	Jalgaon	Peer Balemiyan Kabrastan Wo Takiya Trust, At Amalner, Village & Tq. Amalner, Dist. Jalgaon	No	No
8	42/47/2017	Solapur	Khwaja Peer Saiful Malak Dargah Masjid wo Kabrastan , at Haidra Tq, Akkalkot Dist Solapur	No	No

उपरोक्त प्रकरणे कार्यालयाने तपासली असून ती बरोबर आहेत. मान्यतेसाठी शिफारस करीत आहे.

(अनिस शेख)
मुख्य कार्यकारी अधिकारी

ठराव क्रमांक. ५: -

वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४२ नुसार व्यवस्थापन बदलाबाबत प्राप्त झालेल्या उपरोक्त (८) प्रस्तावांची तपासणी करण्यात आली असुन उपरोक्त (८) प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

(सियानत विभाग)

विषय क्रमांक. ६: - जामा मस्जीद डोलवी ता.पेण जि.रायगड च्या संबंधित वक्फ मिळकत सर्वे नं. १६१/१ पैकी क्षेत्र ०.४४.७ हे.आर जमीन Non Commercial फक्त ग्रीरीनरीसाठी ३० वर्षाच्या भाडेपट्टयावर देण्यास वक्फ संस्थेस परवानगी देणे बाबत.

जामा मस्जीद डोलवी ता.पेण जि.रायगड ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ नुसार क्र.MSBW/RGD/३५/२००८ दि.११/०२/२००८ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ अन्वये सुचना क्र.मरावमं/चौकशी-१०८०/२५५२/२००९ दि.१६/६/२००९ नुसार १)अब्दुल सत्तार अ.लतीफ खोत, २)अ.वहाब अ.लतीफ खोत, ३)अतिक महंमद अ.सत्तार खोत हे ३ वक्फ संस्थेचे कार्यरत विश्वस्त आहेत.

सदरील वक्फ संस्थेच्या संबंधित मिळकत सर्वे नं. १६१/१ पैकी क्षेत्र ०.४४.७ हे.आर जमीन हायवे लगत असुन जे.एस.डब्ल्यु स्टील लि. डोलवी या कंपनीच्या समोर आहे या जागेवर बऱ्याच लोकांनी टीनशेड बांधुन दुकाने उभी करुन अतिक्रमणे केली होती. हे सर्व अतिक्रमण पुर्वीच्या कुळ कायदा अंतर्गत असलेले भाडेकरु यांनी केले होते सदर भाडेकरुचे निधन झाल्यानंतर त्याचे वारस म्हणुन लोकांनी कब्जा केला होता या विरुध तहसिलदार व इतर विभागात वक्फ संस्थेच्या विश्वस्तांनी दावा दाखल केला होता त्यामध्ये वक्फ संस्थेच्या बाजुने निर्णय झाला परंतु सदर जमीनी वर इतर लोकांनी गाळे बांधुन अतिक्रमण केले होते. सदर अतिक्रमण हटविण्या करीता तहसिल कार्यालयाकडून वक्फ मंडळास सहकार्य मिळाले नाही. तसेच वक्फ मिळकतीवरील बेकायदेशिर बांधकाम काढून टाकण्यास ही त्यांनी सहकार्य केले नाही.

उपरोक्त प्रकरणात जे.एस.डब्ल्यु स्टील लि. डोलवी यांनी त्यांच्या कंपनीच्या दर्शनी भागावर ही सर्व बेकायदेशिर अतिक्रमण टिनशेड चांगले दिसत नव्हते. सदर जमीन कंपनीने लिजवर मागणी केली व सदर ठिकाणी ग्रीनरी करू व चांगले पध्दतीने याचे देखरेख करु जर ही जागा त्यांना लिजवर देणार असाल तर आम्ही संस्थेस सर्व सहकार्य करु अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली होती व संस्थेस सर्व सहकार्य करुन सदर जमीनी वरील एकुण १२ ते १५ दुकाने व बांधलेले घराचे अतिक्रमण हटविले आहे. सदरची खुली जागा कंपनीसाठी उपयुक्त असल्याने त्यांनी सदर जमीन फक्त गार्डन व रस्त्याचे उपयोगासाठी दिर्घ मुदतीच्या भाडेपट्टयावर मिळणेस वक्फ संस्थेकडे विनंती केली होती. परंतु वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ५६ तसेच वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियमानुसार वक्फ मालमत्ता भाडेपट्टयावर देण्यासाठी दैनिक वर्तमान पत्रात जाहिर प्रगटन प्रसिध्द करुन इच्छुक लोकांकडून अर्ज मागविणे आवश्यक असल्याने वक्फ संस्थेतर्फे दैनिक रायगड वृत्तवेध, रायगड आणि दैनिक नवराष्ट्र, मुंबई या दैनिकात अनुक्रमे दि.३१/१०/२०२१ व दि.१०/११/२०२१ रोजी जाहिर प्रगटन प्रसिध्द करुन इच्छुक लोकांकडून अर्ज मागविण्यात आले होते.

नोंदणी व मुद्रांक विभाग, महाराष्ट्र शासन, बाजारमुल्य दर पत्रकानुसार प्रति चौरस मिटरचे दर रु.४१७०/- असुन त्याप्रमाणे एकुण क्षेत्र ०.४४.७ हे.आर जमीनीचे बाजार मुल्य रु.१,८६,३९,९००/- (रु.एक कोटी छेअन्शी लाख एकोनचाळीस हजार नऊशे फक्त) इतके आहे.

उपरोक्त वक्फ मालमत्ता गैरव्यवसायीक वापराकरीता देण्यासाठी बाजार मुल्यांकनाचे १ टक्के प्रमाणे दर महिन्यास मासिक भाडे रु.१५,५३३/- (रु.पंधरा हजार पाचशे तेतीस फक्त) वक्फ संस्थेतर्फे निश्चित करण्यात आले होते. निवीदा च्या शेवटच्या दिवसापर्यंत फक्त जे.एस.डब्ल्यु स्टील लि. डोलवी यांचे अर्ज प्राप्त झाले व त्यांनी सदरील जागासाठी मासिक भाडे रु.२४,०००/- चे ऑफर दिले आहे.

सदरील ऑफर वक्फ संस्थेस योग्य वाटली आहे. जे.एस.डब्ल्यु स्टील लि. डोलवी यांनी वक्फ संस्थेस अतिक्रमण हटविण्यात सहकार्य केल्याबद्दल व सदरील जागेचा वापर Non Commercial व फक्त ग्रीरीनरीसाठी करणार असल्याने सदर जागा जे.एस.डब्ल्यु स्टील लि. डोलवी यांना ३० वर्षे कालावधीसाठी भाडेपट्टयावर देण्याचे वक्फ संस्थेने प्रस्तावीत केले आहे. उपरोक्त मिळकत ३० वर्षे कालावधीसाठी जे.एस.डब्ल्यु स्टील लि. डोलवी यांच्या सोबत भाडेपट्टा करार करण्यासाठी परवानगी नाहरकत प्रमाणपत्र मिळणेस वक्फ संस्थेच्या विश्वस्तांनी सर्व प्रक्रिया पुर्ण करुन आवश्यक कागदपत्र सादर करुन नाहरकत प्रमाणपत्र देण्याची विनंती केली असुन प्रादेशिक वक्फ अधिकारी, कोण विभाग, मुंबई यांनी पत्रक्र.वक्फ/एसएनटी-५०/२०२२ दि.१७/०३/२०२२ अन्वये अहवाल सादर करुन शिफारस केली आहे.

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ५६ व वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम-२०१४ (सुधारीत नियम २०१५ व २०२०) मधील तरतुदीन नुसार ३ वर्षा पेक्षा जास्त व ३० वर्षापर्यंतच्या भाडेपट्टाकरारासाठी राज्य शासनाची मंजुरी आवश्यक आहे. सदर प्रस्ताव वक्फ मंडळासमोर सादर करण्यात येत आहे.

ठराव क्रमांक. ६: -

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ५६ व वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम-२०१४ (सुधारीत नियम २०१५ व २०२०) मधील तरतुदीनुसार व्यवसायीक वापरासाठी भाडेकरार करण्यासाठी प्रतिवर्ष बाजार भावाच्या २.५% इतके किमान भाडे असणे आवश्यक आहे. भाडेकरार करावयाची जागा व्यवसायीक वापरासाठी वापरण्यात येणार आहे या बाबत स्पष्टता नाही सबब, या बाबत संबंधीत कंपनीसमवेत वाटाघाटी करण्यात यावा. सदर कंपनी प्रतिवर्ष बाजार भावाच्या किमान २.५% दराने भाडे देण्यास तयार असल्यास त्यास मंडळाची सहमती प्रदान करण्यात यावी. व या बाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा.

विषय क्रमांक. ७: - उरुन इस्लामपुर ता. वाळवा जि.सांगली येथील मुस्लीम समाज इदगाह परिसरामध्ये बहुउद्देशीय हॉल बांधण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबत

मुस्लीम समाज इदगाह कब्रस्तान, इस्लामपुर ता.वाळवा जि.सांगली ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ नुसार क्र.MSBW/SGL/१६२/२०१४ दि.२६/०६/२०१४ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. इस्लामपुर येथील गट क्र.१११/१अ पैकी क्षेत्र ९९९२ चौ.मि. आणि क्षेत्र ६६३.९१ चौ.मि. अशी एकूण १०६५६ चौ.मि. जागा नव्याने खरेदी करुन इदगाहसाठी ठेवण्यात आली आहे.

अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्र.नाक्षेवि-२०२१/प्र.क्र.८१/का-९ दि.२१/०१/२०२२ अन्वये अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात विकास कार्यक्रम सन २०२१-२२ अंतर्गत उरुन इस्लामपुर येथील

मुस्लीम समाज इदगाह परिसरामध्ये बहुउद्देशीय हॉल बांधणेकरीता रक्कम रु.२ कोटी २५ लाख इतका निधी मंजुर झाला आहे. सदरील कामासाठी या कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र मिळणेस मुख्याधिकारी नगरपरिषद, इस्लामपुर यांनी त्यांचे पत्र क्र.इनपा/कार्या-१२/९९१/२०२२ दि.९/०३/२०२२ अन्वये विनंती केली आहे. तसेच मुस्लीम समाज इदगाह कब्रस्तान ट्रस्ट, इस्लामपुर चे अध्यक्ष श्री. मुबारक अब्बास जमादार यांनी दि.१०/०३/२०२२ च्या अर्जान्वये इदगाह परिसरात बहुउद्देशीय हॉल बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबत संमतीपत्र दिले आहे.

उपरोक्त शासन निधीतून इदगाह परिसरात बहुउद्देशीय हॉल, कंपाऊंड वॉल्, इदगाहचे सुशोभीकरण, रस्ते, इत्यादी कामामुळे मुस्लीम लोकांना सोई सुविधा उपलब्ध होणार आहे. वक्फ संस्थेच्या विश्वस्तांनी प्राप्त निधीच्या उपयोगासाठी सर्व अटी व नियमांची पुर्तता केली आहे. सदर विकास काम झाल्यानंतर विकसित इमारतीचा ताबा वक्फ संस्थेच्या नावाने राहतील या अटीच्या अधिन राहून सदर विकास कामासाठी नगर परिषद इस्लामपुर ता.वाळवा जि.सांगली यांना नाहरकत प्रमाणपत्र देण्याची शिफारस प्रादेशिक वक्फ अधिकारी, पुणे यांनी पत्र क्र.पी/एसएनटी-१३१/२०२२ दि.१७/०३/२०२२ अन्वये अहवाल सादर करुन केली आहे. सोबत खालील प्रमाणे कागदपत्रे सादर केली आहे.

१) वक्फ संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, आदेश, २) ७/१२, ३) शासन निर्णय दि.२१/१/२०२२ ४) योजना प्रस्ताव दाखल केलेली प्रोसेस फी पावती, ५) वक्फ संस्थेने सदर कामासाठी घेतलेले ठरावाची प्रत ६) प्रतिज्ञापत्र ७) प्रस्तावित जागाच्या फोटो ८) आधार कार्ड, ९) बांधकाम प्लॅन, ईस्टीमेटची प्रत

"महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या ६८ व्या बैठकीत झालेल्या ठराव क्र. ४२ (अ) नुसार मस्जीद, दर्गाह, कब्रस्तान, ईदगाह, आशुरखाना व इतर वक्फ संस्थांच्या दुरुस्ती/नुतनीकरण, संरक्षण भिंती, पेव्हर ब्लॉक, इदगाह वट्टा, जनाजा नमाज पठणसाठी शेड तसेच मोडकळीस आलेल्या वक्फाच्या अंदाज पत्रकीय खर्च रक्कम रु.२५ लाख पर्यंतच्या बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, यांना प्रदान करण्यात आले आहे." तथापि उपरोक्त इदगाह परिसरात बहुउद्देशीय हॉल बांधकामाचा खर्च एकुण रु.२ कोटी २५ लाख इतका असल्याने वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम २५(१)क मधील तरतुदीनुसार इदगाह परिसरात बहुउद्देशीय हॉल बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबतचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना नव्हता. तथापि, ३१ मार्च २०२२ पुर्वी सदर प्रस्तावास मान्यता न दिल्यास या साठीचा विकास निधी व्यपगत होईल. या करिता वक्फ मंडळाच्या आगामी बैठकीत प्रस्तावास मंजुरी मिळण्याच्या अटीच्या अधिन राहून/कार्योत्तर मंजुरी घेण्याच्या अटीच्या अधिन राहुन मा.अध्यक्ष यांच्या तोंडी पूर्व परवानगीनंतर नाहरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे. सदर प्रस्ताव वक्फ मंडळासमोर कार्योत्तर मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

ठराव क्रमांक. ७: -

या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या नाहरकत प्रमाणपत्रास वक्फ मंडळाची कार्योत्तर मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

विषय क्रमांक. ८: - वैशिष्टयपुर्ण योजने अंतर्गत मौ.मुदखेड जि.नांदेड येथील ईदगाह परिसराचे बांधकाम व सुशोभीकरण करणे करीता नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबत.

ईदगाह मुदखेड ता.जि.नांदेड ची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्र दि.३१/१०/१९७४ भाग-अ च्या अनुक्रमांक ९२ वर असुन २ एकर क्षेत्रफळाची नोंद आहे. सदर संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ नुसार क्र.MSBW/NDD/३३०/२०२२ दि.१०/०३/२०२२ अन्वये रितसर नोंदणीकृत वक्फ संस्था आहे.

मौजे मुदखेड येथील गट क्र.५६४ वर इदगाह क्षेत्र २ एकर ची नोंद असून सदर मिळकती बाबत श्री.जयबा होणाजी शेवटे व गोविंदराव होणाजी शेवटे यांनी रेग्युलर सिव्हील सुट नं.०५/२०१० सह दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर, नांदेड यांच्या न्यायालयात दाखल केला होता. सदरचा रेग्युलर सिव्हील सुट मा.न्यायालयाने दि.८/१/२०१८ रोजीच्या आदेशाने डिस्मिस केला आहे.

नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक नपावै/२०२१/प्र.क्र.९६(२२)/न.वि-१६ दि.२०/०८/२०२१ अन्वये नगरपरिषदांना वैशिष्टयपुर्ण कामासाठी विशेष अनुदान योजनेअंतर्गत मौजे मुदखेड जि.नांदेड येथील इदगाह परिसरात बांधकाम व सुशोभीकरण करणेसाठी रु.१.५० कोटी ऐवढा निधी नगर परिषद, मुदखेड यांच्याकडे प्राप्त झालेला आहे. सदरील कामासाठी या कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र मिळणेस मुख्याधिकारी नगरपरिषद, मुदखेड यांनी त्यांचे पत्र क्र.मुनपा/ताशा/विकास/२०२१-२२/१११४ दि.३/३/२०२२ अन्वये विनंती केली आहे.

उपरोक्त इदगाह परिसरात सुशोभीकरण बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबत जिल्हा वक्फ अधिकारी, नांदेड यांनी पत्र क्र.जिवअ/एसएनटी विभाग-४५/४८/२०२२ दि.४/३/२०२२ अन्वये अहवाल सादर देवून शिफारस केली आहे. सोबत खालील प्रमाणे कागदपत्रे सादर केली आहे.

१) शासन राजपत्र, २) वक्फ संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, आदेश, ३) ७/१२, ४) शासन निर्णय दि.२०/०८/२०२१ ५) मा.न्यायालयाचे RCS No.०५/२०१० मधील आदेशाची प्रत, ६) प्रस्तावित जागाच्या फोटो ७) बांधकाम प्लॅन, ८) ईस्टीमेट प्रत

"महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या ६८ व्या बैठकीत झालेल्या ठराव क्र. ४२ (अ) नुसार मस्जीद, दर्गाह, कब्रस्तान, ईदगाह, आशुरखाना व इतर वक्फ संस्थांच्या दुरुस्ती/नुतनीकरण, संरक्षण भिंती, पेव्हर ब्लॉक, इदगाह वट्टा, जनाजा नमाज पठणसाठी शेड तसेच मोडकळीस आलेल्या वक्फाच्या अंदाज पत्रकीय खर्च रक्कम रु.२५ लाख पर्यंतच्या बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, यांना प्रदान करण्यात आले आहे." तथापि उपरोक्त ईदगाह परिसरात सुशोभीकरण बांधकामाचा खर्च एकुण रु.१ कोटी ५० लाख इतका असल्याने वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम २५(१)क मधील तरतुदीनुसार ईदगाह परिसरात सुशोभीकरण बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबतचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना नव्हता. तथापि, ३१ मार्च २०२२ पुर्वी सदर प्रस्तावास मान्यता न दिल्यास या साठीचा विकास निधी व्यपगत होईल. या करिता वक्फ मंडळाच्या आगामी बैठकीत प्रस्तावास मंजुरी मिळण्याच्या अटीच्या अधिन राहून/कार्योत्तर मंजुरी घेण्याच्या अटीच्या अधिन राहुन मा.अध्यक्ष यांच्या तोंडी पूर्व परवानगीनंतर नाहरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे. सदर प्रस्ताव वक्फ मंडळासमोर कार्योत्तर मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

ठराव क्रमांक. ८: -

या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या नाहरकत प्रमाणपत्रास वक्फ मंडळाची कार्योत्तर मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

विषय क्रमांक. ९: - शाही मस्जीद देवस्थान ट्रस्ट, आणे ता.जुन्नर जि.पुणे च्या संबंधित वक्फ मिळकत मधुन टि.एस.विंड पॉवर कंपनी, सातारा यांना रस्ता उपयोगीसाठी १० वर्षासाठी भाडेतत्वावर देणे बाबत.

श्री.अकबर बनेमियॉ इनामदार : अर्जदार
रा.आणे ता.जुन्नर जि. पुणे

विरुध्द

अमीन हमीद इनामदार : हरकतदार
रा. मु.पो. आणे (आनंदवाडी)
ता.जुन्नर जि.पुणे
हा.मु.नेरुळ नवी, मुंबई

प्रस्तावना : -

शाही मस्जिद देवस्थान,आणे ता.जून्नर जि.पूणे. ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून त्याचा नोंदणी क्रमांक MSBW/PUN/४३८/२०१६ असा आहे. सदर संस्थेच्या मिळकतीची नोंद वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यात आलेली आहे.

दि.७/०९/२०२१ रोजी श्री अकबर बनेमिया इनामदार, विश्वस्त शाही मसजिद देवस्थान ट्रस्ट.आणे ता.जून्नर जि.पूणे यांनी अर्ज देवून विनंती केली आहे की, उपरोक्त वक्फ संस्थेच्या मालकीची मिळकत गट नंबर २७५,२७७ तसेच गट नंबर २७८ मध्ये ग्रीन इन्फ्रा कॉर्पोरेट सोलार लि. हरियाणा तर्फे कंत्राटदार टि. एस. विंड पॉवर डेव्हल्पर्स सातारा, या कंपनीने एकूण १८ विद्युत खांब बसविले आहेत वक्फ मिळकत मधील विद्युत खांब काढण्यासाठी वक्फ संस्थेच्या विश्वस्तांनी टी.एस.विंड पॉवर डेव्हलपर्स, सातारा यांच्या विरूध्द वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद येथे वक्फ सूट क्रमांक ५०/१६ दाखल केला होता त्यात न्यायाधिकरणाने वक्फ संस्थेच्या बाजूने निर्णय दिलेला आहे. तसेच विंड पॉवर कंपनी यांनी न्यायालयात कोणताही आक्षेप घेतलेला नाही. त्यांनी अनधितकृतपणे आणि बेकायदेशीरपणे बसविलेले १८ विद्युत खांब ३ महिन्याच्या आत काढून टाकण्याचे आदेश व कायमचा मनाई हूकूम दिलेला आहे. सदर वक्फ संस्थेच्या विश्वस्तांनी प्रकरणात खेड न्यायालयात दरखास्त नं.३३/२०१८ दाखल केली असुन सदर बाबत तडजोडीसाठी कंपनी तयार झाली आहे.

अर्जदार अकबर बनेमिया इनामदार यांनी असे कथन केले आहे की तडजोडी साठी विंड पावर कंपनी तयार असून सदर प्रकरणामध्ये विंड कंपनी, सातारा तर्फे सदरील पोल वक्फ संस्थाकडून नियमित करून देण्यात यावे व उपयोगी येणारे पोल व रस्त्याचे वहिवाटीसाठी नियमाप्रमाणे भाडे देण्यास कंपनीने संमती दर्शाविली आहे व विद्युत खांब नियमित देखभाल करण्यासाठी वरील वक्फ मिळकतीमध्ये येण्याजाण्यासाठी रस्त्याची परवानगी मागितली आहे. वक्फ संस्थेच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी पोलचे भाडे नियमित करून वक्फ बोर्डाकडून मान्यता मिळणेस विनंती केली आहे.

सदर प्रकरणात प्रादेशिक वक्फ अधिकारी, पूणे यांनी पत्र जा.क्र/पी/एसएनटी/५६२/२१ दि.२५/१०/२०२१ अन्वये अहवाल दिलेला आहे. त्यानुसार उपरोक्त वक्फ जमिनीवर ग्रीन इन्फ्रा सोलार लिमिटेड, हरियाणा या कंपनीने एकूण १८ विद्युत खांब बसविले आहेत सदर विद्युत खांबाची दुरूस्ती व देखभाल करण्यासाठी व ये जा करण्यासाठी रस्त्याची आवश्यकता आहे. तसेच मा न्यायाधिकरणाने सदरचे खांब काढण्याकरिता कंपनीला आदेश दिलेले आहेत. परंतु सदरील कंपनीने वक्फ मंडळ व विश्वस्तांकडे अर्ज देवून त्यांनी बसविलेल्या पोलच्या उपयोगात आणलेली जागा तसेच सदर पोलच्या दुरूस्ती व देखभाल करण्यासाठी ये जा करण्यासाठी जागा नियमानूसार भाडेतत्वावर मागितली आहे.

सदर वक्फ संस्थेची मिळकत कोरडवाहू व डोंगरवस्तीची जमीन आहे तसेच एकूण जागाच्या ५० टक्के जमीन ही पडीत व शेतीच्या उपयोगासाठी नाही सदर जागेपैकी एकूण ५२,००० चौरस फूट

जागा म्हणजेच ५२ आर एवढी जागा तीन वर्षे भाडे करारावर कंपनीस दिल्यास वक्फ संस्थेस लक्षणीय उत्पन्न मिळू शकेल. या प्रकरणी नियमानुसार पूढील आदेश पारीत करावे अशी विनंती केली आहे,

प्रकरण चालू असतांना हरकतदार श्री अमीन हमीद इनामदार रा.मु.पो. आणे (आनंदवाडी) ता.जुन्नर जि.पुणे हा.मु.नेरूळ नवी, मुंबई यांनी दिनांक १०.११.२०२१ रोजी हरकत दिलेली आहे त्यात त्यांनी खालील प्रमाणे कथन केलेले आहे.

हरकतदार :-

हरकदार यांनी त्यांच्या हरकतीमध्ये असे नमुद केले आहे की, विषयांकित वक्फ संस्थेची मिळकत सर्व्हे क्रमांक २७५,२७,२७८ हे सर्व क्षेत्र मु. पो. आणे -आनंदवाडी ता. जुन्नर येथे असून सदर जागेवर ग्रीन इन्फ्रा कार्पोरेट सोलार लि. हरियाना यांचा विद्युत प्रकल्प उभारला आहे. सदर कंपनीला प्रकल्पाच्या देखभाल व दूरूस्तीसाठी वरील सर्व्हे नंबर मधून रस्ता ये जा साठी पाहिजेत त्या करिता श्री. अकबर बनेमिया इनामदार यांनी वक्फ बोर्ड येथे अर्ज केला असून अर्जावरचा निर्णय अजून बाकी आहे पण वस्तुस्थिती वेगळी आहे वरील सर्वे मध्ये जाण्यासाठी अगोदर माझे पूर्वीचे वहिवाटदाराचे सर्व्हे नंबर २९९, ३०० येते सदर सर्व्हे नंबर या वर मी डेव्हलपमेंट साठी २० लाख रूपये खर्च करून सदर क्षेत्र लेवल केले आहे आणि आता कंपनीला या मधून रस्ता पाहिजे हे कसे शक्य आहे तरी कंपनीला रस्ता दयायचा असेल तर सन २०२० मध्ये जिल्हा परिषद पूणे यांनी नवीन रस्ता तयार केला आहे त्या रस्त्याला पूढे सर्व्हे क्रमांक २७५, २७७, २७८ हे क्षेत्र जोडून देता येऊ शकते तरी सर्व्हे क्रमांक २९९, ३०० मधुन कंपनीला रस्ता देण्यात येवू नये व त्यांची हरकत ची नोंद घेण्यात यावी.

सदर प्रकरणात केवळ रस्त्याच्या मुद्दयाच्या अनुषंगाने हरकतदार व अर्जदार यांना कार्यालयाचे पत्र जा.क्र. मरावमं/एसएनटी/७७४९/२१ दिनांक १/१२/२०२१ अन्वये नोटीसा काढून दि.१०/१२/२०२१ रोजी हजर होऊन कागद पत्रासह तसेच लेखी म्हणणे देण्यास सांगण्यात आले होते. त्यानंतर दि.१०/१२/२०२१ रोजी चौकशी झाल्यानंतर त्या चौकशी मध्ये श्री.अकबर बनेमिया इनामदार तसेच अमीन हमीद इनामदार हजर होते दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर सदरचे प्रकरण आदेशा करिता ठेवण्यात आले.

निष्कर्ष -

वरील विवेचनावरुन व संचिकेतील कागदपत्रांची काळजीपूर्वक पडताळणी केल्यानंतर असे स्पष्ट होते की, शाही मसजिद देवस्थान ट्रस्ट,आणे ता.जून्नर च्या संबंधित सर्व्हे नंबर २९९ व ३०० या मध्ये वक्फ संस्थेचे वहिवाटदार आमीन हमीद इनामदार यांनी विकासासाठी रु.२० लाख रूपये खर्च करून सदर क्षेत्र लेवल केले आहे. सदर जागा मधुन कंपनीने रस्त्याची मागणी केली आहे. सन २०२० मध्ये जिल्हा परिषद, पूणे यांनी नवीन रस्ता तयार केला आहे. सदर रस्ता सर्व्हे क्रमांक २७५, २७७, २७८ च्या जवळ असल्याने कंपनीला तो उपयोगी पडेल. आज पर्यंत सदर विदयुत प्रकल्पासाठी स्वतंत्र रस्त्याची आवश्यक्ता भासलेली नाही. विदयुत खांबावरिल नियमित तपासणी व दुरुस्तीसाठी सदर कंपनीचे कर्मचारी पायी जावून आवश्यक त्या दुरुस्तीचे, देखभालीचे काम करतात त्यामुळे कंपनीला स्वतंत्रपणे रस्ता आवश्यक नाही. या निष्कर्षाप्रत मी आलेलो आहे. सबब मी. अनिस शेख, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम २५ अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील प्रमाणे आदेश देत आहे.

आदेश-

१. अर्जदार यांचा अर्ज अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. अर्जदार यांनी सादर केलेला सर्व्हे क्रमांक २७५, २७७, २७८ मधील जागेचा भाडेपट्टा प्रस्ताव वक्फ संस्थेच्या उत्पन्न वाढविण्यासाठी योग्य आहे त्यावर वक्फ मंडळाच्या बैठकीत निर्णय घेता येईल. तथापि वक्फ संस्थेच्या इतर मिळकती सर्व्हे नंबर २९९ व ३०० मधून कंपनीला रस्ता देता येऊ शकत नाही. अर्जदार यांनी आवश्यक असल्यास भाडेपट्टासाठी सर्व्हे नंबर २९९ व ३०० मधून रस्ता वगळून रितसर प्रस्ताव दाखल करावा.

३. संबंधितांना सदरचा आदेश कळवावा.

उपरोक्त प्रकरणात केवळ रस्त्याच्या मुद्दयावर दि.१३/०४/२०२२ रोजी आदेश पारित झालेले आहे. सदर कंपनीला पर्यायी रस्ता उपलब्ध आहे. वक्फ संस्थेची शेतजमीन वापराचे भाडे व रस्ता वापराचे भाडे सन २०१५ पासुन ते २०१८ या तीन वर्षासाठी भाडे रु.१४,८७,६०४/- व सन २०१८ ते २०२१ या तीन वर्षासाठी भाडे रु.१६,३६,३६५/- असे एकूण रु.३१,२३,९६९/- मधून १८% जीएसटी वजा जाता निव्वळ रक्कम रु.२५,६१,६८४/- या प्रमाणे देण्यास कंपनी तडजोडीसाठी तयार आहे. तसेच सन २०२१-२२ साठी भाडे रक्कम रु.६,००,०००/- प्रमाणे देण्यास कंपनी तयार आहे. कंपनीने विद्युत खांब नियमित देखभाल करण्यासाठी वरील वक्फ मिळकतीमध्ये येण्याजाण्यासाठी रस्त्याची परवानगी मागितली असून अर्जदार अकबर बनेमिया इनामदार यांनी दि.८/२/२०२२ व दि.१५/२/२०२२ अन्वये अर्ज देवून सदर प्रकरणामध्ये कंपनीला विद्युत खांब नियमित देखभाल करण्यासाठी वरील वक्फ मिळकतीमध्ये येण्याजाण्यासाठी रस्त्याचे भाडे नियमित करुन भाडेकरार करण्यास परवानगी देण्याची विनंती केली आहे.

तसेच प्रादेशिक वक्फ अधिकारी, पुणे यांनी पत्र क्र.पी./एसएनटी/१४०/२०२१ दि.२३/०३/२०२२ अन्वये अहवाल सादर केला आहे त्यानुसार सर्वे नं. २७५, २७७, २७८ मधील जमीन कोरडवाहू व डोंगरवस्तीची जमीन असल्याने त्यापासून वर्षातून फक्त एक पीक घेता येते. सदर जमीनी मधील १८ विद्युत खांब व त्याच्या दुरुस्तीसाठी रस्ता उपयोगाकरीता एकूण ५५ आर एवढी जमीन कंपनीच्या उपयोगात असून त्याचे शासकीय मुल्यांकन फार कमी आहे. ग्रीन इन्फ्रा कॉर्पोरेट सोलार लिमिटेड, हरियाणा यांनी वक्फ संस्थेसोबत तडजोडीमध्ये मान्य केलेले भाडे प्रतिवर्ष रु.६,००,०००/- प्रमाणे एकूण क्षेत्र ५५ आर जमीन सन २०१६ ते २०२६ या १० वर्षाच्या कालावधीसाठी त्यांना भाडेपट्टयावर देण्याची शिफरस प्रादेशिक वक्फ अधिकरी, पुणे यांनी केली आहे.

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ५६ व वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम-२०१४ (सुधारीत नियम २०१५ व २०२०) मधील तरतुदीनुसार ३ वर्षा पेक्षा जास्त व ३० वर्षा पर्यंतच्या भाडेपट्टाकरारासाठी राज्य शासनाची मंजुरी आवश्यक आहे. सदर प्रस्ताव वक्फ मंडळासमोर सादर करण्यात येत आहे.

ठराव क्रमांक. ९: -

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ५६ व वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम-२०१४ (सुधारीत नियम २०१५ व २०२०) मधील तरतुदीनुसार असलेल्या किमान भाडेपेक्षा जास्त भाडे देण्यास कंपनी तयार असल्याने सदर प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदर भाडेकरार १० वर्षाचा असल्याने हा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनास सादर करण्यात यावा.

विषय क्रमांक. १०: -दर्गाह शाह बेरीया, सिटी चौक, औरगाबाद येथील वक्फ मालमत्तेवर अतिक्रमण करणाऱ्यांचे विरुध्द वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ५२-अ सह भा.द.वि. कलमान्वये फौजदारी गुन्हा दाखल करणे बाबत.

श्री. मो.अजहर खान अकबर खान रा.प्लॉट नं.९/बी आरिफ कॉलोनी, औरंगाबाद यांनी दि.२०/१०/२०२१ रोजी नोटीस देवून खालील प्रमाणे वक्फ मंडळाकडे निवेदन दिले होते.

दर्गाह हजरत शाह बेरीया, शाह साहेब आणि कब्रस्तान, सिटी चौक, औरंगाबाद च्या संबंधित वक्फ मिळकत सि.स.न.६०१५ क्षेत्र ३६० चौ.फुट जागेतील वक्फ मंडळाचे भाडेकरु श्री.विक्रमचंद सुराणा यांचे निधन झाल्यानंतर त्यांचे मुलाने कोटयावधी रुपये किमतीची मालमत्ता वक्फ मंडळास परत न करता मंडळाचा विश्वासघात करुन स्वत:चे फायदयासाटी लबाडीने शेजारचे दुकानदार ऑनेस्टी ड्रेसेस आणि जहीनी ड्रेसेसचे मालक अब्दुल अजीज आणि अब्दुल रज्जाक यांना हस्तांतरीत केली. वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम २०१४ नुसार लिजडीड संपल्यानंतर वक्फ मालमत्ता जशी आहे तशीच वक्फ मंडळाकडे परत करणे बंधनकारक आहे. वक्फ मालमत्ता परत न करता त्यावर कब्जा चालू ठेवणे हे वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम २०१४ चे नियम २४ नुसार अतिक्रमण समजले जाते आणि अशा प्रकारे स्वत:चे फायदयासाठी लबाडीने विश्वासघात करुन दुसऱ्या इसमास देणे हे कलम ४२०,४०६,४०९,४४८ भारतीय दंड विधानासह वक्फ अधिनियमाचे कलम ५२ अ अन्वये दखलपात्र गुन्हा ठरते तसेच ज्या इसमाने अशी मालमत्ता हस्तांतरित करुन घेतली तो पण याच कलमानुसार अतिक्रमणकर्ता म्हणुन गुन्हेगार ठरतो म्हणुन संबंधिता विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याची विनंती करुन दि.२६/४/२०२२ पासून आमरण उपोषण सुरु केले होते.

उपरोक्त अर्जावर नियमानुसार कार्यवाही सुरु असुन दि.१७/०३/२०२२ व १९/०४/२०२२ अन्वये मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना पत्र देवून दर्गाह शाह बेरीयाशी संबंधी सिटी चौक येथील वक्फ मालमत्ता वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ५२ अन्वये वक्फ मंडळाच्या ताब्यात देणे बाबत मागणी करण्यात आली आहे. सदर प्रकरणात नियमानुसार कार्यवाही सुरु असुन त्यामध्ये काही कालावधी लागणार असल्याने उपोषण मागे घेण्याची विनंती अर्जदारास दि.२२/४/२०२२ रोजी करण्यात आली होती तसेच उपरोक्त वक्फ मिळकत वक्फ मंडळाचे ताब्यात देण्याची कार्यवाही त्वरीत करणे बाबत जिल्हाधिकारी यांना दि.२२/४/२०२२ रोजी स्मरण पत्र देण्यात आले होते सदर प्रकरणात कार्यवाही जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्याकडे प्रलंबित आहे.

सदर प्रकरणात हाजी एजाज देशमुख, बीजेपी अल्पसंख्याक मोर्चा प्रदेश अध्यक्ष यांनी अर्जदार मो.अजहर खान अकबर खान यांची भेट घेवून मा. डॉ.वजाहत मिर्झा, अध्यक्ष महराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, तसेच मा. श्री. समीर काजी, व मा. श्री. खालीद बाबु कुरेशी, सदस्य महाराष्ट्र राज्य वक्फ यांच्याशी संपर्क करुन उपरोक्त प्रकरणात गुन्हेगाराविरुध्द वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ५२-अ सह भारतीय दंड विधानाचे कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात यावा म्हणुन चर्चा केली होती त्यावर मा.अध्यक्ष व सदस्य महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांनी आश्वासन दिले की सदर विषयावर वक्फ मंडळाच्या आगामी बैठकीत निर्णय घेण्यात येईल असे अर्जदारानी अर्जात नमुद केले आहे. या आश्वासनावरुन अर्जदार यांनी दि.२८/०४/२०२२ रोजी त्यांचे उपोषण मागे घेतले होते.

उपरोकत प्रकरणात मा.महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद येथे श्री. आयुष विक्रम प्रेमचंद सुराणा यांनी वक्फ मंडळाने दिलेल्या नोटीसला अव्हानीत करुन वक्फ अर्ज क्र.१७/२०२२ दाखल केला आहे. त्यात त्यांनी असे नमुद केले की, आम्ही कोणत्याही प्रकारचे हस्तांतर केले नसुन व वक्फ कायदयाचा उलंघन केलेला नाही. आमच्या विरुध्द खोटी तक्रार करण्यात आली आहे.

सदरचे प्रकरण मा. महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण औरंगाबाद येथे न्यायप्रविष्ठ असुन याचा विचार करुन श्री. आयुष विक्रम प्रेमचंद सुराणा, श्री.अब्दुल रज्जाक अब्दुल सत्तार जहिनी व श्री. अजीज भाई

यांच्याविरुध्द पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्याबाबत चर्चा करण्याच्या अनुषंगाने सदरचा विषय पुढील निर्णयासाठी वक्फ मंडळासमोर सादर करण्यात येत आहे.

ठराव क्रमांक. १०: -

सदर वक्फ मालमत्ता ताब्यात घेण्याबाबत स्वतंत्रपणे कार्यवाही सुरु आहे तसेच या बाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. सबब, या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यापुर्वी संबंधीत पक्षकारांची सुनावणी घेण्याचा निर्णय मंडळाने घेतला आहे.

विषय क्रमांक ११: - जिल्हा वक्फ कार्यालय, नांदेड ची इमारत जिर्ण झाली असल्याने कार्यालयाची नवीन इमारतीचे बांधकाम करण्यास खर्चासह मान्यता देणे बाबत.

जिल्हा वक्फ अधिकारी, नांदेड यांनी दि.६/५/२०२२ रोजी अहवाल सादर केला आहे की, मस्जीद जुनी ईदगाह, नांदेड ही संस्था वक्फ मंडळाच्या थेट नियंत्रणाखाली असुन वक्फ संस्थेच्या परिसरात मागील ५० वर्षापासून जिल्हा वक्फ अधिकारी, कार्यालय नांदेड अस्तित्वात असून कार्यालयाचे क्षेत्र १३x३५ फुट इतके आहे. सदर कार्यालयाच्या भिंती जिर्ण असून वर टाकलेले पत्रे पुर्णपणे खराब झालेले आहे. खराब झालेल्या पत्र्यामधून पावसाचा पाणी आत शिरत असल्याने कार्यालयातील संचिका, अभिलेख व इतर कागदपत्रास दिमक लागले आहे त्यामुळे संचिका पुर्णपणे नष्ट होत आहे त्याचे संरक्षण व जतन करण्यासाठी कार्यालयाची जुनी इमारत पाडून नवीन आर.सी.सी. इमारत बांधणे आवश्यक आहे. सदरील कार्यालयाचे G+१ इमारतीच्या बांधकासाठी अभियंताकडून तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकानुसार ग्राऊंड फ्लोरसाठी ९.०० लाख आणि पहिला मजला करिता ९.५० लाख इतका खर्च अपेक्षीत आहे. प्रस्तावीत इमारतीचे बांधकाम व त्यांचे खर्चास मान्यता देण्याचा प्रस्ताव वक्फ मंडळासमोर सादर करण्यात येत आहे.

ठराव क्रमांक. ११: -

जिल्हा वक्फ कार्यालय, नांदेड करीता नवीन इमारतीचे बांधकाम करण्यास व सदर बांधकामासाठी रु.१८.५० लाख इतका खर्च करण्यास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. कार्यालयातील सर्व नस्त्यांची स्कॅनींग करुन अभिलेख सुस्थितीत ठेवण्यात यावे.

विषय क्रमांक १२: - दर्गाह रजियोद्दिन मक्की रहे, बीड च्या संबंधित असलेली सर्वे नं.९५ जालना रोड येथील वक्फ मिळकतीच्या भाडेकरार करणे बाबत.

अ) दर्गाह हजरत रजियोद्दिन मक्की साहेब रहे. बीड ची नोंद शासन राजपत्र पार्ट-सी चे अनुक्रमांक ०७ वर असुन वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार क्र.MSBW/BED/२२/२००७ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. संदरील वक्फ

संस्थेच्या संबंधित सर्वे नं.९५ एकूण क्षेत्र १४ एकर ०९ गुंठे जमीन जालना रोड बीड येथे आहे. तत्कालीन मराठवाडा वक्फ बोर्डाचे आदेश क्र. एसएनटी/४०३२ दि. १८/१०/१९९४ नुसार सर्वे नं. ९५ पैकी क्षेत्र ७ एकर जमीन MSEB च्या ताब्यात आहे तसेच क्षेत्र २ एकर १२ गुंठे जमीन श्री.नारायण करमसी पटेल यांना लिजवर देऊन दि. १५/४/१९९५ च्या नाहरकत प्रमाणपत्रा अन्वये इतर लोकांना पोट भाडेकरु म्हणुन ठेवण्याची परवानगी देण्यात आली होती त्या आधारे श्री. नारायण करमसी पटेल यांनी सन २००२-०३ पर्यंत नुझुलची रक्कम भरली व त्यानंतर त्यांनी कोणतीही रक्कम वक्फ मंडळात जमा केलेली नाही.

सदर वक्फ मिळकत श्री. नारायण करमसी पटेल यांनी ८१ लोकांना पोटभाडेवर दिलेली आहे. सदर ठिकाणी सध्या गॅरेज, चहाच्या हॉटेल, व इतर व्यवसाय सुरु आहे. दर्गाह रजियोद्दिन मक्की रहे, बीड चे इनामदार हफिजोद्दिन महंमद जमालोद्दिन इनामदार व जिल्हा वक्फ अधिकारी बीड यांच्या तक्रारी अर्जावर केस क्र. ५४/८०/२०११ मध्ये कलम ५४ अन्वये दि. ११/६/२०१२ रोजी आदेश पारीत करुन कलम ५५ अन्वये गैरअर्जदारांना वरील जागेवरुन बेदखल करण्याची विनंती उप विभागीय अधिकारी, बीड यांच्याकडे करण्यांत आली होती त्या विरुध्द गैरअर्जदारांनी मा. महाराष्ट्र वक्फ न्यायाधिकरण, औरगाबाद येथे दावा क्र. ८१/२०१३ अब्दुल सलाम व इतर विरुध्द महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ व इतर दाखल केले होते त्या प्रकरणांत मा.न्यायालयाने वक्फ मंडळाचे दि. ११/०६/२०१२ रोजीचे आदेशास पुढील आदेशा पर्यंत स्थगीती दिली होती. सदर प्रकरण मा. न्यायालयात न्यायप्रविष्ठ असल्याने सर्वे नं. ९५ मध्ये अतिक्रमण केलेले लोकांना भाडेकरु करण्यांत येऊ नये किंवा किरायानामा करु नये म्हणुन श्री. मोहम्मद हफिजोद्दिन जमालोद्दिन इनामदार यांनी दि.१९/१२/२०१६ रोजी विनंती केली आहे.

वक्फ मिळकत सर्वे नं. ९५ बाबत मा. महाराष्ट्र वक्फ न्यायाधिकरण औरंगाबाद येथे दावा क्र. ९९/१३, ९८/१३, ७५/१२, ९९/९३, व ८१/१३ हे न्यायप्रविष्ठ असल्याने अर्जदार उपरोक्त एकूण ८१ लोकांचे भाडेकरार वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम २०१४-सुधारीत नियम २०१५ व २०२० मधील तरतुदीनुसार नियमित करणे तसेच थकीत भाडे बाजार मुल्यांकन प्रमाणे वसूल करण्यासाठी न्यायप्रविष्ठ प्रकरणांची सध्यास्थिती व त्यामधील आदेशानुसार वक्फ मंडळाचे विधी सल्लागार यांचे अभिप्राय घेवून पुढील कार्यवाही करण्याचे आदेशासाठी सदरचा विषय वक्फ मंडळासमोर सादर करण्यात येत आहे.

ब) दर्गाह रजियोद्दिन मक्की रहे, बीड च्या संबंधित सर्वे नं. ९५ पैकी क्षेत्र ६०x१०० (६००० चौ.फुट) जागा खुली असुन त्यावर अतिक्रमण होण्याची दाट शक्यता आहे. सदर जागा मध्ये व्यवसाय करण्यासाठी १० वर्षाच्या कालावधी करीता भाडेपट्ट्यावर मिळणेस एकूण ६ अर्ज या कार्यालयास प्राप्त झाले आहे त्यांची नांवे १) शेख मुजीब, २) शेख माजेद, ३) प्रमोद प्रभाकर मुळे, ४) शेख अजीम, ५) मोहम्मद कलीम ६) शेख वाजीद, सर्व रा.बीड अशी आहेत. अर्जदारांनी प्रत्येकी १२x१०० फुट (१२०० चौ.फुट) जागा भाडेपट्ट्यावर मिळणेस विनंती केली आहे.

जिल्हा वक्फ अधिकारी, बीड यांनी पत्र क्र.वक्फ/सियानत/७४५/२०२२ दि.२५/४/२०२२ अन्वये अहवाल सादर केला आहे की, सदरील जागा वक्फ मंडळाच्या थेट निगराणीत असुन यापुर्वी तत्कालीन मराठवाडा वक्फ बोर्डानी श्री.कासट यांना ५१ वर्षासाठी भाडेपट्ट्यावर दिली होती परंतु त्यांनी वक्फ मंडळात अद्याप पर्यंत भाडे भरले नाही सदर

जागा आजही खुली असुन अतिक्रमण होण्याची शक्यता आहे सदरील जागा नियमानुसार भाडेपट्टयावर देण्याची शिफारस जिल्हा वक्फ अधिकारी बीड यांनी केली आहे.

उपरोक्त प्रकरणात वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ५६ तसेच वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम-२०१४ (सुधारीत नियम २०१५ व २०२०) मधील तरतुदीनुसार ३ वर्षा पेक्षा जास्त व ३० वर्षापर्यंतच्या भाडेपट्टाकरारासाठी राज्य शासनाची मंजुरी आवश्यक आहे. सदर प्रकरणात भाडेपट्टा संदर्भातील आवश्यक सर्व प्रक्रिया पुर्ण करुन सविस्तर प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणे बाबतचा प्रस्ताव वक्फ मंडळासमोर सादर करण्यात येत आहे.

ठराव क्रमांक. १२: -

१) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या ताब्यात असलेल्या जमीनी भाडयाने देणे बाबत वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ५६ तसेच वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम-२०१४ (सुधारीत नियम २०१५ व २०२०) मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

२) सदर जमीनीवरील अतिक्रमण हटविण्याबाबत वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ५४ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

३) प्रलंबित न्यायालयीन प्रकरणांसाठी नामवंत अभियोक्त्याची/वकीलाची नेमणुक करण्यात यावी.

विषय क्रमांक १३: - तंबुवाला मस्जिद ट्रस्ट, (हुसैनी मस्जिद), सी.एस.क्रमांक ४२८८ भुलेश्वर विभाग, मुंबई च्या पुर्नविकास कामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबत.

तंबुवाला मस्जिद ट्रस्ट, (हुसैनी मस्जिद), मुंबई.०३ ही संस्था महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या तरतुदीनुसार बी-७३४ अन्वये नोंदणीकृत असुन वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ नुसार क्र. MSBW/MUM/१४/२००६ अन्वये रितसर नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. सदर मस्जीद ढब्बु स्ट्रीट, राऊदत्त ताहेरा स्ट्रीट, ७४/८६ हुसैनिया मार्ग, मुंबई येथील सी.एस क्र. ४२८८ (सी.एस क्र. ४२८७ चे क्षेत्र सामील करुन) एकूण क्षेत्र १३११.८९ चौ.मि. मध्ये अस्तित्वात आहे. म्हाडा विभागाने जागेचा वापर करण्यासाठी तयार केलेल्या सुची प्रमाणे एक भाग मध्ये एकूण १५ दुकाने, १ जमातखाना, दुसऱ्या भाग मध्ये शाळा/मदरसा, व तिसऱ्या भाग मध्ये मस्जीद Prayer Hall आहे. सदर मस्जीदची इमारत खुप जुनी असुन त्याच्या काही भिंत्या पडलेल्या आहेत व काही मध्ये भेगा पडले आहे जुने बांधकाम पडू नये म्हणुन त्याला टेके (supporter) लावण्यात आले आहे. सदर मस्जीद मध्ये बोहरा समाजातील लोक नमाज पठणसाठी हजारोंच्या संख्यने येतात मस्जीदचा जिर्ण भाग पडल्यास नमाजी लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होवू शकते त्यात जिवीत हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तसेच सदर मस्जीद इमारतीचे स्ट्रकचर ऑडीट रिपोर्ट दखल करण्यात आले आहे ज्या मध्ये सदर इमारत धोकादायक असल्याचे घोषीत करण्यात आले आहे. सदर मस्जीद ७० वर्षापुर्वी बांधलेली असल्याने त्याचे बांधकाम जिर्ण झाले आहे. सदर मस्जीदच्या पुर्व बाजुला १५ दुकाने आहेत. इमारत मधील दुसऱ्या

मजल्यावर मदरसा व शाळा चालते तसेच तिसऱ्या व चौथ्या मजल्यावर हॉल आहे. सदर इमारत जिर्ण आहे व पिल्लर मध्ये दरार असल्याने त्याला लोखंडी चॅनलचा सपोर्ट देण्यात आला आहे. वक्फ संस्थेची अर्थीक परिस्थिती चांगली नसल्याने ते स्वतः या इमारतीचे पुर्नविकास करु शकत नाही.

उपरोक्त सर्व दुकाने, मस्जिद व इतर मिळकतीचा समावेश SBUT च्या प्रकल्पामध्ये असल्याने या जागेवर त्यांचा काम चालू आहे. सदर पुर्नविकास कामासाठी SBUT च्या प्रस्तावास वक्फ संस्थेच्या मॅनेजर यांनी समर्थन दिला आहे. मस्जीद पुर्नविकासाचा सर्व खर्च SBUT स्वतः करणार आहे व दुकानदारांना पर्यायी व्यवस्था ते करुन देणार आहे. अर्जदार अबुअली झेड दारुखानावाला यांनी शपथ पत्र देवून पुर्नविकास कामाच्या प्रस्तावास या कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र मिळणेस दि.१७/१/२०२२ च्या अर्जान्वये विनंती केली आहे. तसेच अर्जामध्ये सपष्ट नमुद केले की SBUT ला मालमत्ता हस्तांतर करण्यात येणार नाही.

सदर वक्फ मिळकत मध्ये मस्जिद तळ+ चार मजली इमारत आहे ज्या मध्ये जमात खाना, मदरसा, शाळा, हॉल, दुकाने व कार्यालय आहे त्याच्या पुर्नबांधणी/पुर्नविकास करण्यात येणार आहे. उपरोक्त प्रस्तावामध्ये एकुण जागा फक्त मस्जीदसाठी उपयोगात येणार आहे किंवा कसे या बाबत वक्फ संस्थेच्या विश्वस्तांना बोलावून त्यांच्याकडून नकाशा व स्पष्टीकरण घेवून त्यानंतर पुर्नविकास कामासाठी ना हरकत प्रमाणपत्र देणे बाबतचा अहवाल प्रादेशिक वक्फ अधिकारी, मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र. वक्फ/एसएनटी/७२/२०२२ दि.९/५/२०२२ अन्वये सादर केला आहे.

उपरोक्त प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी सदरचा विषय वक्फ मंडळासमोर पुढील निर्णयासाठी सादर करण्यात येत आहे.

ठराव क्रमांक १३: -

सदर मालमत्ता कोणत्याही परिस्थितीत विकासकाच्या नावावर करण्यात येणार नाही या अटीच्या अधिन राहून तंबुवाला मस्जिद ट्रस्ट, (हुसैनी मस्जिद), सी.एस.क्रमांक ४२८८ भुलेश्वर विभाग, मुंबई च्या पुर्नविकास कामासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नाहरकत प्रमाणपत्र निर्गमित करावे.

पुर्नविकास कामाचा आढावा वेळोवेळी प्रादेशिक वक्फ अधिकारी, कोकण विभाग, मुंबई यांनी घ्यावा. नाहरकत प्रकरणपत्राच्या अटी व शर्तींचे उलंघन होत असल्याची बाब निदर्शनास आल्यास सदर नाहरकत प्रमाणपत्र रद्द करण्यात यावे.

सदर वास्तुच्या पुर्नविकासांतर्गत बांधकामाच्या अंदाजपत्रकानुसार किमतीच्या २% इतकी रक्कम वक्फ संस्थेने नजराना/देणगी म्हणुन सदर नाहरकत पत्र मिळाल्यापासुन १ महिन्याच्या आत वक्फ मंडळाकडे जमा करण्यात यावी. अशी अट या व यापुढे दिल्या जाणा-या सर्व नाहरकत प्रमाणपत्रामध्ये समावेश करण्यात यावा.

(अतियात विभाग)

विषय क्रमांक १४: - राज्यातील विविध वक्फ संस्थांवर मुतवल्ली नियुक्त करण्याबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेबाबत.

वक्फ संस्थेचे मुतवल्ली म्हणून घोषीत करण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्रमांक ९५८६/२०१० सह सिव्हील अपील क्रमांक ९५८८/२०१० व ९५८७/२०१० Aliyathammuda Beethathebiyyappura Pookoya & Anr. V/s. Pattakal Cheriyakoya & Ors. मध्ये दिनांक ०१.०८.२०१९ रोजी दिलेल्या निकालपत्रामध्ये अ. क्र. २२ व २४ येथील मुद्यामध्ये मुतवल्ली नियुक्तीच्या

पात्रतेबाबत स्पष्टपणे आदेश दिले आहेत. वक्फ संस्थेवर मुतवल्लीची नियुक्ती करतांना या आदेशानुसार कार्यवाही करणे अनिवार्य आहे.

अ) राज्यातील विविध वक्फ संस्थांवर मुतवल्ली म्हणून नियुक्ती मिळण्यासाठी प्राप्त झालेल्या ९४ प्रस्तावांची छाननी करण्यात येत आहे. त्यापैकी खालील ९ प्रस्ताव बैठकीत आदेशार्थ सादर करण्यात येत आहेत.

अनुसुची क्र. १

अ. क्र.	वक्फ संस्थेचे नाव	अर्जदार	शेरा
१	आशुरखाना नाले हैदर, मस्जिद मेहताब अलीशाह व कब्रस्तान, नक्कारखाना बारादरी परभणी	मोहम्मद मुश्ताक अहमद मोहम्मद अली शाह.	
२	दर्गाह हजरत बहाऊद्दीन लंगोटबंद अनसारी, मस्जिद, मुसाफीरखाना ईकामतखाना, माळीवाडा ता. व जि. औरंगाबाद.	१. शेख कासम शेख हुसैन, रा. औरंगाबाद. २. अब्दुल गनी मोहम्मद अतीक पिता अब्दुल हमीद मोहम्मद सालीम कादरी, रा. बदायुन, उत्तरप्रदेश.	
३	दर्गाह हजरत शेखन साहब, मस्जिद व कब्रस्तान लाल मंडई, नवाबपुरा औरंगाबाद.	१. सैय्यद फहिमुद्दीन शुत्तारी पिता सैय्यद इक्बाल अहमद शुत्तारी २. सैय्यद अतहरूद्दीन शुत्तारी पिता सैय्यद मजहरूद्दीन शुत्तारी	
४	दर्गाह हजरत सय्यद फकरुल्लाह शाह व सराए फकरुल्लाह शाह मस्जिद, कब्रस्तान, इतवारा नांदेड जि. नांदेड	सैय्यद शाहिद अली शाह पिता रहमतुल्लाह शाह	
५	ईदगाह औंढानागनाथ जिल्हा हिंगोली	रियाजुद्दीन जहुरूद्दिन खतीब	
६	दर्गाह हजरत नुरी शहीद बाबा कब्रस्तान मी. कळमनुरी तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली	श्री. सैय्यद फजलुल्लाह हुसैनी पिता सैय्यद अजिमुल्लाह हुसैनी.	
७	कब्रस्तान व मस्जिद अब्बास, सदर बजार, जालना	सैय्यद जमीर पिता सैय्यद मुकीद	
८	दर्गाह सय्यद शाह हुसैन साहब लक्कड छिल्ला यतीम शाह साहब, मस्जिद व कब्रस्तान, महालजी, नांदेड	सैय्यद फिरोज सैय्यद पिता कासीम सैय्यद, नांदेड	
९	निशान ए मुबारक, तकीया रोशन अली साहब व मजार शाह बजार औरंगाबाद	१. शेख नासेर शेख अब्दुल कादर, औरंगाबाद. २. इरशाद अहमद नसीम अहमद, औरंगाबाद.	

ब) अर्जदार मुतवल्ली यांनी कोणतेही पुरावे सादर न केलेल्या प्रकरणाची यादी खालील प्रमाणे आहे. या यादीतील सर्व २१ प्रकरणे रद्द करण्यात यावीत.

अनुसुची क्र. २

अनु.क्रं.	अर्जदाराचे नाव.	वक्फ संस्थाचे नाव व पत्ता	जिल्हा.
१	श्री.मिर मजहर अली हाजी मीर कैसर अली.रा.घर नं १-१२०-१८ जुना बाजार	अस्थाना महेबुब सुभाणी . पत्ता अत्तर गल्ली चौक	औरंगाबाद
२	श्री.सय्यद जियाउल्ला हुसैनी रा.बुल मार्केट मस्तानशाह नगर.	चिल्ला जींदा शाह मदार पत्ता. डि.वाय.एस.पी. ऑफीस जवळ	हिंगोली
३	श्री.काजी सादेख मोहयोदीन पी.गैस मोहयोदीन. रा. टाकळी निलावरण, ता,मानवत.	दर्गाह हजरत भोले शाह. पत्ता.टाकळी निलावरण ता.मानवत.	परभणी
४	सय्यद खालेद सय्यद जमीरोदीन. रा.पोलीस स्टेशन हनुमान चौक चिकलठाना.	मस्जीद सराय चिकलठाणा पत्ता.चिकलठाणा	औरंगाबाद
५	सय्यद बाबु सय्यद चांद रा.शेवता. ता.अंबड	दर्गाह सय्यद साहेब व ग्रेवयार्ड मस्जिद शेवता, ता.अंबड	जालना
६	श्री. मोहम्मद अय्युब हमीदोद्दीन अलीयास हफीसोद्दीन जागीरदार रा.हमीदीया कॉलनी, ता.मुदखेड.	इदगाह मुदखेड मुदखे, ता. मुदखेड	नांदेड
७	श्री.पठान नवीद खान हैदर खान रा.लेबर कॉलनी,ता.मुरुड	मस्जिद ए यासीन व कब्रस्तान पत्ता.मौजे. मरुड	लातुर
८	शेख चांद शेख दादा मिया. रा.मोमीनपुरा. बीड,	दर्गाह हजरत हुरमेन शाह वली पत्ता.मोमीनपुरा,	बिड
९	सय्यद हारुन सय्यद अबदुल्ला मार्फत जिल्हा वक्फ अधिकारी बीड.	मस्जिद न्यु रेल्वे स्टेशन परळी, पत्ता. परळी	बिड
१०	श्री.सय्यद अब्दुल करीम अब्दुल रहेमान रा.जामा मस्जिद झरी.	जामा मस्जीद पत्ता.झरी.	परभणी
११	माजीद खान महेबुब खान रा.आसेफीया कॉलनी	दर्गाह सय्यद सादात व ग्रेवयार्ड सुभेदारी गेस्ट हॉऊस	औरंगाबाद
१२	अबरार अहेमद असरार अहेमद रा.चेलीपुरा.	मस्जिद अफलातुन पत्ता.फाजिलपुरा	औरंगाबाद
१३	श्री.मणीयार कलीम ईमाइल रा.अहेमदपुर,	दर्गाह आशुरखाना नदारे दफन पत्ता. ता.अहेमदपुर	लातुर
१४	खाजा अली हसन अब्दुल रहेमान पीरजादे रा. पिरजादा मोहल्ला ता.वैजापुर	दर्गाह हजरत इनायत्तुल्ला बंदेनवाज मस्जिद व ग्रेवयार्ड पत्ता.वैजापुर.	औरंगाबाद
१५	श्री.कसजी जुबेर दाईद मु.पो.वाशी.ता.वाशी	इदगाह (निमाजगाह) वाशी पत्ता. ता. वाशी	उस्मानाबाद
१६	श्री.मोहम्मद इस्माईल मा.हुसेन. रा.मोमीन गल्ली देगलुर ता. देगलुर.	मस्जिद ए बुराक मोमीन गल्ली देगलुर ता.देगलुर.	नांदेड
१७	श्री.कय्युब खान महेबुब खान रा.वसरणी	दर्गाह सय्यद शाह मिर बाबा मुजामपेठ,वसरणी मुजामपेठ, वसरणी	नांदेड

१८	श्री.शेख वाहेद पिता शेख तुराब अली शाह, रा.दिलावर नगर.	दर्गाह सय्यद साहेब मौजे कुरण ता.अंबड	जालना
१९	जिल्हा वक्फ अधिकारी जालना.	मस्जिद दर्गाह शाह दावल चिल्ला महेबुब सुभानी व कब्रस्थान पत्ता.मौजे.हिसवन	जालना
२०	श्री.काझी जलीलोद्दिन पिता खलिलोद्दीन व काझी जमिलोद्दीन रा.रामदेव नगर,वलसा	मजार हजरत सय्यद सुलतान सहाब. मौजे बलसा ता.जिंतुर	परभणी
२१	शेख जाफर शेख मुन्नु रा.मोमीनपुरा.	ग्रेव मलंग शहा बाबा मस्जिद ॲण्ड ग्रेवयार्ड पत्ता. मौजे.नाळवंडी	बीड

ठराव क्रमांक १४:-

वक्फ अधिनियम १९९५ मधील कलम ६३ नुसार मुतवल्लींना तात्पुरते स्वरुपात नेमण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी धोरण/निकष निश्चित करावे. याकामासाठी या क्षेत्रातील अनुभवी व्यक्तींना घेवून समिती गठीत करण्यात यावी. सदर समितीमध्ये मा.डॉ.मुदस्सीर लांबे व मा.श्री.समीर काझी सदस्य महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, यांचा समावेश करण्यात यावा. समितीने निकष अंतिम केल्यानंतर सदर निकष वक्फ मंडळाच्या पुढील बैठकीत मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात यावे.

(आस्थापना विभाग)

विषय क्रमांक १५:- वक्फ अधिनियम १९९५ च्या विविध कलमाअंतर्गत वक्फ मंडळापुढे सुनावणीसाठी प्रकरणे सादर करण्यापुर्वी त्यांची पुर्तता करण्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अधिकार प्रदान करणेबाबत.

वक्फ अधिनियम १९९५ च्या विविध कलमाअंतर्गत वक्फ मंडळापुढे सुनावणीची प्रकरणे सादर केली जातात. मागील काही सुनावणीच्या वेळी असे निदर्शनास आले आहे की, अनेक प्रकरणी पक्षकारांनी दस्तावेज, लेखी म्हणणे सादर केलेले नसते, अपुर्ण माहितीसह वकील प्रकरणात उपस्थित होतात व सुनावणीसाठी पुढील तारिख मागुन घेतात. यामुळे वक्फ मंडळाच्या सदस्यांचा वेळ वाया जातो व फार कमी प्रकरणात अंतिम सुनावणी होवून प्रकरणे आदेशासाठी बंद केली जातात. हे टाळण्यासाठी सुनावणीच्या प्रत्येक प्रकरणात कागदपत्रे दस्तावेज घेणे, लेखी म्हणणे (Written Say), शपथपत्र, घेणे इत्यादी आवश्यक प्रक्रिया मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुर्ण कराव्यात व परिपुर्ण प्रकरण अंतिम सुनावणीसाठी तयार झाल्यानंतर वक्फ मंडळापुढे प्रत्यक्ष अंतिम युक्तीवादा करीता सुनावणीसाठी ठेवण्यात यावे. या करिता मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अशा प्रकरणात संबंधीत पक्षकारांना नोटिस देणे, कागदपत्रे, दस्तावेज, लेखी म्हणणे, शपथपत्र, स्विकारणे इत्यादी दस्तऐवजीकरणाचे काम (Documentation) करण्यास अधिकार प्रदान करण्यात यावेत.

ठराव क्रमांक १५:-

वक्फ संस्थांच्या प्रकरणात संबंधीत पक्षकारांना नोटिस देणे, कागदपत्रे, दस्तावेज, लेखी म्हणणे, शपथपत्र, स्विकारणे इत्यादी दस्तऐवजीकरणाचे काम

(Documentation) करण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहे.

विषय क्रमांक १६: - वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम २५ नुसार निश्चीत करण्यात आलेले मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकार व कर्तव्ये पार पाडण्यासाठी वक्फ मंडळाने त्यांना निदेश (Direction) देणे बाबत.

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम २५ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकार व कर्तव्ये याबाबत खालील प्रमाणे तरतूद आहे.

1) *Subject to the provisions of this Act and of the rules made thereunder and the directions of the Board, functions of the Chief Executive Officer shall include.*
   a. *Investigating the nature and extent of (auqafs) and (waqf) properties and calling whenever necessary, an inventory of (waqf) properties and calling, from time to time, for accounts, returns and information from mutawallis;*
   b. *Inspecting or causing inspection of (waqf) properties and account, records, deeds or documents relating thereto;*
   c. *Doing generally of such acts as may be necessary for the control, maintenance and superintendence of (auqafs).*
2) *In exercising the powers of giving directions under sub-section (1) in respect of any (waqf), the Board shall act in conformity with the directions by the (waqf) in the deed of the (waqf), the purpose of (waqf) and such usage and customs of the (waqf) as are sanctioned by the school of Muslim law to which the (waqf) belongs.*
3) *Save as otherwise expressly provided in this Act, the Chief Executive Officer shall exercise such powers and perform such duties as may be assigned to him or delegated to him under this Act.*

यानुसार अधिनियमातील व नियमातील तरतूदीनुसार आणि वक्फ मंडळाच्या निदेशानुसार (Direction of the Board) हे अधिकार वापरुन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्य पार पाडावयाचे आहे. अधिनियम व नियमातील तरतूदी या सुनिश्चीत केलेल्या आहेत. तथापि, या अधिनियमाच्या कलम २५ नुसार कार्यवाही करताना प्रत्येक वेळी प्रत्येक प्रकरणात वक्फ मंडळाचे निदेश घेणे अव्यवहार्य आहे. कारण असे निदेश वक्फ मंडळाच्या बैठकीत प्रकरण सादर केल्याशिवाय घेता येणार नाहीत. या कलमातील अधिकार वक्फ संस्थांची पडताळणी, तपासणी, वक्फच्या यादया तयार करणे, लेखे, लेखा परिक्षण, रेकॉर्डस् पडताळणी करणे अशा दैनंदिन कार्यालयीन स्वरुपाचे कामकाज आहे. त्यामुळे हे कामकाज करण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांना या कामाशी सिमीत स्वरुपाचे अधिकार प्रदान करण्यात यावेत.

ठराव क्रमांक १६:-

वक्फ मंडळाच्या पुर्व मान्यतेची अट शिथील करुन वक्फ अधिनियम १९९५ मधील कलम २५ (१) (a)(b)(c) मध्ये नमुद कर्तव्य व जबाबदाऱ्या पार पाडण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहे. सदर

अधिकाराचा वापर करुन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेली सर्व कामांची माहिती वक्फ मंडळासमोर सादर करावी.

सदर ठरावास मा.श्री. ॲडव्होकेट खालीद बाबु कुरेशी व मा.डॉ. मुदस्सीर लांबे यांनी विरोध दर्शविला असून सदर ठराव अवैध (Illegal) असल्याचे नमुद केले आहे.

विषय क्रमांक १७: - वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ५२ नुसार वक्फ संस्थेची मालमत्ता पुर्नप्राप्त करण्यासाठी (Recovery) अधिनियमातील तरतूदीनुसार कार्यवाही करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्याबाबत.

वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ५२ खालील प्रमाणे आहे.

1) *If the Board is satisfied, after making any inquiry in such manner as may be prescribed, that any immovable property of a (waqf) entered as such in the register of (waqf) maintained under section 36, has been transferred without the previous sanction of the Board in contravention of the provisions of section 51 (or section 56), it may send a requisition to the collector within whose jurisdiction the property is situate to obtain and deliver possession of the property to it.*
2) *On receipt of a requisition under sub-section (1), the Collector shall pass an order directing the person in possession of the property to deliver the property to the Board within a period of thirty days from the date of the service of the order.*
3) *Every order passed under sub-section (2) shall be served.*
    a. *By giving or tendering the order, or by sending it by post to the person for whom it is intended; or*
    b. *If such person cannot be found, by affixing the order on some conspicuous part of his last known place of abode or business, or by giving or tendering the order to some adult male member or servant of his family or by causing it to be affixed on some conspicuous part of the property to which it relates:*

    Provided that where the person on whom the order is to be served is a minor, service upon his guardian or upon any adult male member or servant of his family shall be deemed to be the service upon the minor.
4) *Any person aggrieved by the order of the Collector under sub-section (2) may, within a period of thirty days from the date of the service of the order, prefer an appeal to the Tribunal within whose jurisdiction the property is situate and the decision of the Tribunal on such appeal shall be final.*
5) *Where an order passed under sub-section (2) has not been complied with and the time for appealing against such order has expired without an appeal having been preferred or the appeal, if any, preferred within that time has been dismissed, the Collector shall obtain possession of the property in respect*

of which the order has been made, using such force, if any, as may be necessary for the purpose and deliver it to the Board.

6) *In exercising his functions under this section the Collector shall be guided by such rules as may be provided by regulations.*

वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ५२-अ खालील प्रमाणे आहे.

1) *Whoever alienates or purchases or takes possession of, in any manner whatsoever, either permanently or temporarily, any movable or immovable property being a waqf property, without prior sanction of the Board, shall be punishable with rigorous imprisonment for a term which may extend to two year:*

   Provided that the waqf property so alienated shall without prejudice to the provisions of any law for the time being in force, be vested in the Board without any compensation therefor.

2) *Notwithstanding anything contained in the Code of Criminal Procedure, 1973 (2 of 1974) any offence punishable under this section shall be cognizable and non-bailable.*

3) *No Court shall take cognizance of any offence under this section except on a complaint made by the Board or any officer duly authorized by the State Government in this behalf.*

4) *No Court inferior to that of a Metropolitan Magistrate or a Judicial Magistrate of the first class shall try any office punishable under this section.*

कोणत्याही कारणास्तव, कोणत्याही प्रकारे, वक्फ मालमत्तेच्या मालकी हक्कात बदल झाल्यास या कलमाद्वारे वक्फ मालमत्ता पूर्नप्राप्त (Recovery) करण्याची कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. अनेक वक्फ मालमत्तांच्या मालकी हक्कामध्ये बदल करण्यात आल्याच्या तक्रारी प्राप्त होतात. प्रत्येक प्रकरण निहाय ही बाब वक्फ मंडळापुढे सादर करुन मंजुरी घेवून कार्यवाही सुरु करण्यामध्ये वेळ जातो. कलम ५२ नुसार करावयाच्या कार्यवाहीचे स्वरुप हे नोटिस देवून लेखी म्हणणे मागविणे, त्याची तपासणी करणे व जिल्हाधिकारी यांना नोटिस पाठवून वक्फ मालमत्ता वक्फ मंडळाने ताब्यात घेणे, अथवा संबंधीत वक्फ संस्थेच्या ताब्यात देण्याइतपत कार्यवाही करणे असे आहे. ही सर्व नियमीत कार्यालयीन कामकाजाच्या स्वरुपाची कार्यवाही आहे. या प्रक्रियेत विलंब होवू नये यासाठी कलम ५२ नुसार कायदेशीर कार्यवाही करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात यावेत.

ठराव क्रमांक १७:-

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ५२ व ५२-अ नुसार वक्फ संस्थेची मालमत्ता पुर्नप्राप्त करण्यासाठी (Recovery) अधिनियमातील तरतूदीनुसार कार्यवाही करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहे.

सदर अधिकाराचा वापर करुन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेली सर्व कामांची माहिती वक्फ मंडळासमोर सादर करावी.

विषय क्रमांक १८:- वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ७० व ७१ नुसार वक्फ संस्थांच्या गैरव्यवहाराबाबत प्राप्त तक्रारींवर चौकशी करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अधिकार प्रदान करणेबाबत.

वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ७० व कलम ७१ नुसार वक्फ संस्थांची चौकशी करण्याचे अधिकार व त्याची कार्यपध्दती निश्चीत करण्यात आली आहे.

वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ७० खालील प्रमाणे आहे.

Any person interested in a (waqf) may make an application to the Board supported by an affidavit to institute an inquiry relating to the administration of the (waqf) and if the Board is satisfied that there are reasonable grounds for believing that the affairs of the (waqf) are being mismanaged, it shall take such action thereon as it thinks fit.

वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ७१ खालील प्रमाणे आहे.

1) *The Board may, either on an application received under section (70) or on its own motion,*
   a. *Hold an inquiry in such manner as may be prescribed; or*
   b. *Authorize any person in this behalf to hold an inquiry into any matter relating to a (waqf) and take such action as it thinks fit.*
2) *For the purposes of an inquiry under this section, the Board or any person authorized by it in this behlf, shall have the same powers as are vested in Civil Court under the Code of Civil Procedure, 1908, (5 of 1908) for enforcing the attendance of witnesses and production of documents.*

वक्फ संस्थाविरुध्द गैरव्यवहाराबाबतच्या तक्रारी वक्फ मंडळाकडे प्राप्त होत असतात. उपरोक्त कलमान्वये या तक्रारीवरील चौकशी होणे अभिप्रेत आहे. या कामी चौकशी करण्याचे अधिकार वक्फ मंडळ एखादया व्यक्तीस प्रदान करु शकतात अशी तरतूद आहे. वक्फ संस्थांच्या गैरव्यवहाराबाबत अंदाजे ३०० पेक्षा जास्त तक्रारी वक्फ मंडळाकडे प्रलंबित आहेत. या तक्रारींची चौकशी वेळीच होणे आवश्यक आहे अन्यथा, सर्वाधिक न्यायालयीन प्रकरणे यामुळे उद्‌भवतात हे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान केल्यास लेखा विषयक, लेखा परिक्षणाबाबतच्या किंवा सर्वसाधारण स्वरुपाच्या गैरव्यवहाराच्या तक्रारींची चौकशी उपलब्ध कर्मचारी वर्गाकडून किंवा या कामी सेवानिवृत्त अधिकाऱ्याकडून करुन घेता येईल. चौकशी नंतर वक्फ मंडळापुढे प्रकरणनिहाय चौकशीचा अहवाल सादर करण्यात येईल त्यावर वक्फ मंडळाच्या निर्णयानंतर वक्फ संस्थावर कारवाई करण्यात येईल.

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ७० नुसार कलम ७१ प्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करुन चौकशी करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात यावेत.

ठराव क्रमांक १८:-

पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

विषय क्रमांक १९:-वक्फ मंडळाचे उत्पन्न वाढविण्यासाठी सुधारीत शुल्क आकारण्यास मंजुरी मिळणेबाबत.

वक्फ मंडळाचे उत्पन्न वाढविण्यासाठी वेगवेळ्या शुल्कात सुधारणा व नविन शुल्क आकारणे खालील प्रमाणे प्रस्तावीत आहे.

S. No.	Head	Present Fee	Proposed Fee
1	Application Fee	30/-	30/-
2	Certified Copy Fee. A-4	40/-	40/-
3	Certified Copy Fee. A-3	50/-	50/-
4	Certified Copy Fee. Map	150/-	150/-
5	Inspection of file, per hour	30/-	50/-
6	File Searching fee in the branch, per hour	50/-	50/-
7	Search fee record section per file	1000/-	1000/-
8	Marriage Certificate	700/-	1500/-
9	Publication of Notification / Corrigendum in Government Gazette	2000/-	2000/-
10	No Objection Certificate fee	2000/-	2000/-
11	Registration fee Under section 36, 43	1500/-	2500/-
12	Change Report under section 42	2000/-	2500/-
13	Scheme under section 69	5000/-	5000/-
14	Under section 41	2000/-	2000/-
15	Objection in any matter	1000/-	1000/-
16	Schedule I under section 37	1000/-	1500/-
17	Under section 40	...	2500/-
18	Under section 51	500/- per person including applicant(s)	500/- per person including applicant(s)
19	Under section 54	500/- per person including applicant(s)	500/- per person including applicant(s)
20	Under section 70, per person	500/- per person including applicant(s)	500/- per person including applicant(s)
21	Audit submission fee		
	a. 50000/- to 99999/-	500/-	500/-
	b. 100000/- to 499999/-	1000/-	2000/-
	c. 500000 and above	3000/-	5000/-
	d. Late fee per year	500	1000

ठराव क्रमांक १९:-

उपरोक्त प्रस्तावास वक्फ मंडळाची सहमती प्रदान करण्यात येत आहे.

विषय क्रमांक २०:- महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळची स्वतःच्या जागेत कार्यालय मुंबई, पुणे, नाशीक व अमरावती येथे सुरू करण्यात येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या बळकटीकरणासाठी राज्य शासनाकडून रू ३.६९ कोटी इतका निधी सन २०२१-२२ या वर्षाकरिता उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. सन २०२२-२३ करिता वक्फ मंडळाच्या बळकटीकरणासाठी रू १० कोटी इतका निधी अर्थसंकलित करण्यात आला असून तो अद्याप वितरित करण्यात आलेला नाही.

वळकटीकरणासाठी उपलब्ध झालेल्या निधीच्या विनियोजनासाठी प्रथमतः वक्फ मंडळाची जिल्ह्यातील कार्यालये स्वतःच्या मालकीची असावी, या साठी मुंबई, पुणे, नाशीक व अमरावती या जिल्ह्यामध्ये कार्यालयासाठी Ready Possession मध्ये असलेल्या सदनिका/ गाळे मागील वर्षाच्या निधीतून खरेदी करण्यात यावीत व त्यानंतर सन २०२२-२३ करिता निधीच्या उपलब्धतेसाठी शासनाकडे मागणी करण्यात यावी.

उपरोक्त चार शहरांमध्ये वक्फ मंडळाच्या स्वतःच्या कार्यालयासाठी जागा खरेदी करणे कामी गाळे/ सदनिका निश्चित करणे संबंधीत जागामालकाशी बोलणी करणे, वाटाघाटी करणे साठी मा. अध्यक्ष यांना अधिकार प्रदान करण्यात यावेत, असे प्रस्तावीत आहेत.

ठराव क्रमांक २०:-

मुंबई, पुणे, नाशीक व अमरावती येथे महाराष्ट्र राज्य वक्फ मडळाच्या जिल्हा कार्यालयासाठी स्वत:ची जागा खरेदी करण्यास वक्फ मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदर जागेची खरेदी करण्यापुर्वी जागा मालकाशी वाटाघाटी करण्याचे अधिकार मा.अध्यक्ष व संबंधीत जिल्हयाचे पालक सदस्य यांना प्रदान करण्यात येत आहे.

वक्फ मंडळाच्या मुख्यालयासाठी ओरंगाबाद जिल्हयामध्ये मालकी हक्का बाबत कोणतीही वाद नसलेली किमान २ एकर जागा अंतिम करण्याची कार्यवाही १५ दिवसाच्या आत पुर्ण करण्यात यावी.

(ऑडीट विभाग)

दि. २७/०२/२०२२ च्या बैठकीत पुढे ढकलण्यात आलेले विषय

विषय क्रमांक २१: - वक्फ संस्थाच्या इनामी जमिनीवरील वक्फ फंडाच्या रक्कमेत वाढ करणे बाबत.

सद्यःस्थितीत वक्फ मंडळाच्या इनामी जमिनीवर रु.६०/- प्रति एकर जिरायत जमीनीसाठी व रु.१००/- प्रति एकर बागायत जमीनीसाठी इतकी अकारणी वक्फ फंड म्हणून करण्याबाबत दि. २६/०७/२००९ झ ालेल्या बैठकीतील ठराव क्र. ६९/२००९ मंजूर करण्यात आला होता. सदर दर निश्चित झाल्यापासून सुमारे १२ वर्षाचा कालावधी उलटुन गेला असल्याने या दरामध्ये वाढ करण्यात यावी असे प्रस्तावित आहे. यामुळे वक्फ मंडळाच्या उत्पन्नात वाढ होईल.

वक्फ मंडळाच्या इनामी जमिनीवर रु.५००/- प्रति एकर जिरायत जमीनीसाठी व रु.१०००/- प्रति एकर बागायत जमीनीसाठी इतकी अकारणी वक्फ फंड म्हणून करण्यात यावी असे वक्फ मंडळाच्या बैठकीत प्रस्तावित करण्यात येत आहे.

ठराव क्रमांक २१:-

वक्फ मंडळाच्या इनामी जमिनीवर रु.५००/- प्रति एकर जिरायत जमीनीसाठी व रु.१०००/- प्रति एकर बागायत जमीनीसाठी इतकी अकारणी वक्फ फंड म्हणून वक्फ मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

(भंडार विभाग)

विषय क्रमांक २२:- वक्फ मंडळाच्या बळकटीकरण करण्यासाठी वक्फ मंडळाचे संगणकीकरण व डिजिटायझेशन करणे बाबत.

अ) वक्फ मंडळाच्या कार्यालायासाठी खालील प्रमाणे संगणक, प्रिंटर, लॅपटॉप, यु.पी.एस. झेरॉक्स मशीन, स्कॅनर इत्यादी खरेदी करणे आवश्यक आहे. या कार्यालयासाठी उपयोगात असलेले सर्व संगणक, प्रिंटर्स, लॅपटॉप, झेरॉक्स मशीन हे सन २०११ मध्ये व त्यापुर्वी खरेदी करण्यात आलेले आहेत. या खरेदीसाठी रुपये १,२६,२५,५००/-इतका खर्च अपेक्षीत आहे. ही खरेदी टप्या टप्याने करण्यात येईल. सदयस्थितीत ६० कंप्युटर व युपीएस, २७ प्रिंटर, १७ झेरॉक्स मशीन. व ४ लॅपटॉप इतकी आवश्यक्ता आहे. सद्यस्थितीत खरेदी करावयाच्या उपकराणांसाठी अंदाजे रु. ७९,२५०००/-इतका खर्च अपेक्षीत आहे. सदर खरेदी जेम्स पोर्टलवरुन करण्यात येईल. सदर प्रस्तावास मान्यता द्यावी. हा खर्च शासनाने दिलेले मागील वर्षाच्या सहाय्यक अनुदानातून करण्यात येईल.

Statement showing the list of used computers Hardware and to be purchase for Maharashtra State Board of Waqfs, Aurangabad

[Used Computers, Printers, Xerox & etc:]

Sr. No.	Name of Hardware	Section	Year of purchase	Value
1	Server		2009	1
2	Lenovo Laptop		2012	1
3	HCL Computer	C.E.O. Chamber	2012	1
	Canon All in One Printer 244		2012	1
4	HCL Computer	Dy. C.E.O.	2012	1
	HP LaserJet P1108 Printer		2012	1

[Item to be purchase]

Item Name	Section	Quantity to be purchased	Remark
Server		1	
Laptop		4	
Computer	C.E.O. Chamber	1	
All in One Printer (Duplex)		1	
UPS		1	
Computer	Dy. C.E.O.	1	
All in One Printer (Duplex)		1	
UPS		1	

5	HCL Computer	Qazat	2012	1	Computer	Qazat	3	
	HP LaserJet P1108 Printer		2012	1	All in One Printer (Duplex)		1	
	Ricoh Xerox Machine 3352		2012	1	UPS		3	
6	HCL Computers	Account / ESTT	2012	3	Computer	Account / ESTT	5	
	HP LaserJet P1108 Printer		2012	1	All in One Printer (Duplex)		2	
	Canon All in One Printer 4750		2012	2	UPS		5	
7	HCL Computer	REG	2012	3	Computer	REG	3	
	HP LaserJet P1108 Printer		2012	2	All in One Printer (Duplex)		1	
	EPSON L 210 Printer			1	Xerox Machine		1	
	Canon All in One Printer 4750		2012	1	UPS		3	
8	HCL Computer	SNT	2012	3	Computer	SNT	3	
	HP LaserJet P1108 Printer		2012	3	All in One Printer (Duplex)		1	
					Xerox Machine		1	
					UPS		3	
9	HCL Computer	ENQ	2012	1	Computer	ENQ	3	
	Acer Computer		2009	3	All in One Printer (Duplex)		1	
	Canon LBP 2900			1	Xerox Machine		1	
	Canon All in One Printer 4750		2012	1	UPS		3	
	HP LaserJet P1108 Printer		2012	1				
	Ricoh Xerox Machine 3352		2012	1				
10	HCL Computer	Audit	2012	2	Computer	Audit	3	
	HP LaserJet P1108 Printer		2012	2	All in One Printer (Duplex)		1	
					UPS		3	
11	HCL Computer	Cases	2012	1	Computer	Cases	3	
	HP LaserJet P1108 Printer		2012	1	All in One Printer (Duplex)		1	
	Canon All in One Printer 4750		2012	1	Xerox Machine		1	
	Ricoh Xerox Machine 3352		2012	1	UPS		3	
12	HCL Computer	Store	2012	1	Computer	Store	3	

	EPSON L280			1	All in One Printer (Duplex)		1	
					UPS		3	
13	HCL Computer	Recoed	2012	1	Computer	Recoed	3	
	Canon All in One Printer 4750		2012	1	All in One Printer (Duplex)		1	
	HP LaserJet P1108 Printer		2012	1	Xerox Machine		1	
	Keyocera Ecosys M2040dn		2021	1	Scanner (Size 12x18)		2	
					UPS		3	
14	HCL Computers	Atiyat	2012	1	Computer	Atiyat	3	
	HP LaserJet P1108 Printer		2012	1	All in One Printer (Duplex)		1	
					UPS		3	
15	HCL Computers	C.C.F.	2010	8	Computer	C.C.F.	8	
	HP LaserJet M3027		2010	2	All in One Printer (Duplex)		1	
	EPSON Scanner GT-20000		2010	2	Xerox Machine		1	
	HP LaserJet P1108 Printer		2012	1	Scanner (Size 12x18)		2	
	Keyocera Ecosys M2040dn		2021	1	UPS		8	
	Ricoh Xerox Machine 3352		2012	1				
16	HCL Computers	OSD	2012	2	Computer	OSD	3	
	HP LaserJet P1108 Printer		2012	2	All in One Printer (Duplex)		1	
					UPS		3	
17	HCL Computers	R.W.O Mumbai	2012	2	Computer	R.W.O Mumbai	3	
	HP LaserJet P1108 Printer		2012	1	All in One Printer (Duplex)		1	
	Canon All in One Printer 4750		2012	1	Xerox Machine		1	
					UPS		3	
18	HCL Computers	R.W.O. Pune	2012	1	Computer	R.W.O. Pune	3	
	HP LaserJet P1108 Printer		2012	1	All in One Printer (Duplex)		1	
					Xerox Machine		1	
					UPS		3	
19	HCL Computer	R.W.O Nashik	2012	1	Computer	R.W.O Nashik	3	
	HP LaserJet P1108 Printer		2012	1	All in One Printer (Duplex)		1	

	Canon All in One Printer 4750		2012	1
20	Acer Computer	R.W.O Nagpur	2009	1
	Canon All in One Printer 4750		2012	1
21	HCL Computers	D.W.O. Abad	2012	1
	HP LaserJet P1108 Printer		2012	1
22	Acer Computer	D.W.O. Beed	2009	1
	HP LaserJet P1108 Printer		2012	1
23	HCL Computer	D.W.O. Jalna	2012	1
	HP LaserJet P1108 Printer		2012	1
24	HCL Computer	D.W.O. Latur	2012	1
	HP LaserJet P1108 Printer		2012	1
25	HCL Computer	D.W.O. Nanded	2012	1
	HP LaserJet P1108 Printer		2012	1
26	HCL Computer	D.W.O. OSD	2012	1
	HP LaserJet P1108 Printer		2012	1
27	HCL Computer	D.W.O. Parbhani	2012	1
	HP LaserJet P1108 Printer		2012	1
28	Ricoh Xerox Machine 3352	Waste	2012	1

Xerox Machine		1	
UPS		3	
Computer	R.W.O Nagpur	3	
All in One Printer (Duplex)		1	
Xerox Machine		1	
UPS		3	
Computer	D.W.O. Abad	3	
All in One Printer (Duplex)		1	
Xerox Machine		1	
UPS		3	
Computer	D.W.O. Beed	3	
All in One Printer (Duplex)		1	
Xerox Machine		1	
UPS		3	
Computer	D.W.O. Jalna	3	
All in One Printer (Duplex)		1	
Xerox Machine		1	
UPS		3	
Computer	D.W.O. Latur	3	
All in One Printer (Duplex)		1	
Xerox Machine		1	
UPS		3	
Computer	D.W.O. Nanded	3	
All in One Printer (Duplex)		1	
Xerox Machine		1	
UPS		3	
Computer	D.W.O. OSD	3	
All in One Printer (Duplex)		1	
Xerox Machine		1	
UPS		3	
Computer	D.W.O. Parbhani	3	
All in One Printer (Duplex)		1	
Xerox Machine		1	
UPS		3	

Old Abstract	
Server	1

Abstract	
Particular	Quantity

Lenovo Laptop	1
HCL Computers	39
Acer Computers	5
Printer Laserjet B&W (P1108)	25
Printer Canon All in One (MF4750)	9
Printer LaserJet M3027	2
EPSON Scanner GT-20000	2
Printer Canon LBP 2900	1
Colour Printer EPSON L 210	1
Colour Printer EPSON L 280	1
Ricoh Xerox Machine 3352	5

Server	1
Lenovo Laptop	4
Computers	78
All in One Printer (Duplex)	26
Xerox Machine	17
UPS	78
Scanner 12 x 18 (Duplex)	2
Online UPS	13
Colour Printer	3

Final statement:

Particular	Quantity	Rate	Expenditure	Specification	Remark
Server	1	350000	350000	IBM	
Laptops	4	95000	380000	16 GB DDR4, 512 SSD, 4GB Graphis, Windows 11, Office 365, 1 TB HDD, 15.6 Moniter	
Computers	80	66000	5280000	12th Gen Intel® Core™ i5-12400 Windows 11 Home Single Language Intel® UHD Graphics 730 8 GB, 1 x 8 GB, DDR4, 3200 MHz 256 GB, M.2, PCIe NVMe, SSD + 1 TB, 7200 RPM, 3.5-inch, SATA, HDD **(5 Years onside warranty)**	
All in One Printer (Duplex)	30	33000	990000	Kyocera Ecosys 2040dn	
Xerox Machine	20	150000	3000000		
UPS	80	2400	192000		
Scanner A3 (Duplex)	2	270000	540000	Epson WorkForce DS-70000 A3 Flatbed Scanner with Duplex ADF	
Online UPS	1	250000	250000	10 KVA (1 Unit with 16 battries)	
Online UPS	12	40000	480000	1 KVA (1 Unit with 4 battries)	
Colour Printer	3	16000	48000	Epson EcoTank L3210 A4 All-in-One Ink Tank Printer	
DG Set	1	350000	350000		

Projector	1	70000	70000	BenQ 1080p Business & Education Projector MH560	
Rack (For Network System)	1	250000	250000		
Smart TV 55 inch	1	45000	45000		
WebCam 1080p	1	4500	4500		
Mic	1	2000	2000		
Tower Speaker	1	17000	17000		
Gigabyte Managable Network switch	1	200000	200000		
Paper Shredder	1	30000	30000		
Wifi Router (Gigabyte + Fibre)	2	6000	12000		
Note Counting Machine	1	25000	25000		
Smart TV 32 inch (CCTV)	2	20000	40000		
Cables, Hub & etc		70000	70000		
			1,26,25500		

ब) रजिस्ट्रेशनच्या फाईल्स स्कॅनिंग करणेबाबत:-

धर्मदाय आयुक्तांकडील नोंदणीच्या ५५०० संचिका, तसेच कार्यालयातील महत्वाच्या दस्तावेजांच्या अंदाजे ५ लाख कागदांचे स्कॅनिंग करणे आवश्यक आहे. यासाठी बाह्ययंत्रणेद्वारे इ टेंडर ने निविदा मागवुन कार्यवाही करण्यास मंजुरी द्यावी. यासाठी अंदाजे १० लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. हा खर्च शासनाने दिलेले मागील वर्षाच्या सहाय्यक अनुदानातून करण्यात येईल.

ठराव क्रमांक २२:-

उपरोक्त अ) आणि ब) प्रस्तावास वक्फ मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

विषय क्रमांक २३:-

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर
वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३२ व ६९ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर

आदेश

संचिका क्र. ३२/१९८/२०१२ व ६९(४)/३८८/२०१७

अब्दुल रहेमान गनी मुजावर
रा. खेड शिवापूर, ता. हवेली. जि. पुणे ----- प्रथम योजना अर्जदार

सिराज रशीद मुजावर ----- व्दितीय योजना
अर्जदार
रा. खेड शिवापूर, ता. हवेली. जि. पुणे

विरूध्द

तंजीम मकसुद मुजावर व इतर ६
रा. खेड शिवापूर, ता. हवेली. जि. पुणे ----- गैरअर्जदार

शकील एस. मुजावर ----- हस्तक्षेप अर्जदार

प्रकरण - दर्गाह पीर कमरअली दरवेश व गुडजी बाबा, खेड शिवापूर, ता. हवेली. जि. पुणेच्या दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३२ व ६९ नुसार योजनेस मान्यता देणे बाबत.
नोंदणी क्र.. MSBW/PUN/१०९/२००९ मुबंई सार्वजनिक ट्रस्ट कलम १९५०अन्वये नोदंणी क्र. B-१९ Pune.

प्रारंभिक (विवेचन) -

दर्गाह पीर कमरअली दरवेश व गुडजी बाबा, खेड शिवापूर, ता. हवेली. जि. पुणे ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून त्याचा नोंदणी क्र. MSBW/PUN/१०९/२००९ असा आहे.

दि. २०/०८/१९७१ रोजी मा. धर्मदाय आयुक्त महाराष्ट्र राज्य मुबंई यांनी जिल्हा न्यायालय पुणे यांच्या समोर दिवाणी दावा क्र. ८/७१ हा दाखल करुन योजना मंजुरी करीता अर्ज दाखल केलेला होता. त्या दाव्यामध्ये योजनेकरिता सय्यद अब्दुल रहेमान चांद मुजावर व इतर १९ लोक प्रतिवादी म्हणुन या सामील होते. ती योजना मा. जिल्हा न्यायाधीश पुणे यांनी दि. ३०/०३/१९९० रोजी फाईनल डीक्री द्वारे प्रकरणात मंजुर केलेली आहे. सदर योजना मंजुर करताना मा. धर्मादाय आयुक्त मुंबई यांनी योजनेचा सविस्तर आडाखडा दिलेला आहे.

सदरची योजना मा. न्यायालयाकडुन मंजुर झाल्यानंतर त्या योजनेमध्ये काही बदल करण्याकरीता प्रथम अर्जदार अब्दुल रहेमान गनी मुजावर व इतर १३ रा. खेड शिवापुर ता. हवेली जि. पुणे यांनी दि.२०/०९/२०१७ रोजी कलम ३२(D)/६९ वक्फ कायदा १९९५ अन्वये योजना दाखल केलेली होती व असे नमुद केले आहे की मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अधिकार असल्यामुळे त्यांनी वरील कलमान्वये योजना दुरुस्ती करीता अर्ज सादर केला आहे. त्यांची अशी मागणी आहे की न्यायालयाच्या संपुर्ण निकाल पत्रामध्ये असे कोठेही म्हटलेले नाही की, मुजावर घराण्याच्या ४ शाखा आहे. परंतु मंजुर झालेल्या योजनेमध्ये मुजावर घराण्याचे ४ शाखा दाखवलेले आहे. त्यांनी असे नमुद केले आहे की मुजावरांच्या फक्त २ शाखा आहे १. सय्यद चांद बालेशाहा व २. सैदु नबिशाहा. सबब मुजावर घराण्यामधुन भरावायाचे ४

मुतवल्ली हे वरील २ शाखामधुनच भरावे म्हणजे प्रत्येक शाखे मधुन २ मुतवल्लीची वर्णी लागेल २ मुजावर घराण्यामध्ये नबिशाहा यांच्या घराण्याच्या वतीने अर्जदार १ ते १३ व दुसरे मुजावर च्या वतीने हे बालेंशहा जे गैरअर्जदार १ ते ६ मधून आहे.

मा. दिवाणी न्यायालयाच्या न्यायनिर्णयात प्रत्येक ठिकाणी मुजावरच्या दोन घराणी असा उल्लेख केलेला आहे परंतु मंजुर योजनेमध्ये प्रत्येक ठिकाणी ४ शाखा असा उल्लेख आलेला आहे. वरील चुकीच्या दर्शवीलेल्या लिखाणामुळे अर्जदारच्या कोठयातुन ४ सदस्य कमिटी मध्ये पाहीजे असता फक्त एकच सदस्य कमिटीमध्ये आहे त्यामुळे अर्जदाराचे मोठे नुकसान होत आहे सबब योजना दुरुस्ती साठी अर्ज दाखल केलेला आहे.

त्यांनी पुढे असे नमुद केले आहे की, सदर मालमत्ता ही वक्फ मालमत्ता आहे व ती मालमत्ता मुतवल्ली यांना देण्यात आलेली आहे. सदरची बाब कायदयाच्या विरोधात आहे, मुतवल्ली ही मालमत्ता विकु शकतात, गहाण ठेवु शकतात किंवा कराराने देवु शकताता असे नमुद केले आह. सदरची बाब देखील कायदेशीर नाही. दावा क्र. २३०/४९ निकाल दि.२५/१०/१९६२ अन्वये सदरची योजना दुरुस्त करण्यात यावी. अर्जदाराने पुढे असे देखील सांगीतले आहे की मुजावर लोकांच्या ताब्यात वक्फ संस्थेचे घरे, दुकाने आहेत परंतु दुकाने, घरे यांच्या हक्का बाबत काहीही नमुद केलेले नाही. सबब योजनेमध्ये दुरुस्ती करावी अशी विनंती केलेली आहे.

योजनेकरीता दिलेल्या अर्जावर श्री. मुश्ताक अब्दुल रहेमान मुजावर व इतर ७ यांनी दि. ०२/०३/२०१९ रोजी म्हणणे सादर करुन असे कथन केले आहे की, दुरुस्ती करीता दाखल झालेले अर्ज हा सर्व मुतवल्लीच्या वतीने दाखल झालेले नाही सबब तो टेनेबल नाही सबब अर्ज रद्द करण्यात यावा.

त्यांनी पुढे असे नमुद केले आहे की, योजनेच्या कलम २८(A) नुसार जिल्हा न्यायालयाने मुजावरांच्या ४ शाखा असे नमुद केले आहे परंतु दुरुस्ती अर्जामध्ये चौथ्या शाखेला पार्टी बनविण्यात आलेली नाही. मुजावर घराण्यांच्या चौथ्या शाखेला ऐकल्याशिवाय त्यांच्या विरुध्द कोणतेही आदेश पारीत करण्यात येवु नये कारण त्यांना या अर्जात पार्टी करण्यात आलेले नाही अर्जदार हा मुद्दाम मुजावर घराण्याच्या चौथ्या शाखेला वंशपंरपंरागत पणात कमी करु इच्छितो चौथ्या मुजावर घराण्यामध्ये एकुण १८ सदस्य आहे.

दिनांक २८/१/१९८९ रोजी बॉडं पेपर वर संमतीपत्र करुन दिलेले आहे त्यात ४ शाखेमधून प्रत्येक खालील प्रमाणे एकएक मुजावराची निवड केलेली आहे. व त्याला सर्वांची मान्यता असून ४ ही शाखेच्या संपूर्ण कूटूंबाने त्यावर सम्मती दर्शवून सहया केलेल्या आहे.त्या शाखा खालील प्रमाणे आहे.

शाखा क्र. १. मकसूद अब्दुल रहिमान मुजावर
शाखा क्र. २ रफीक अब्दुल करीम मुजावर
शाखा क्र. ३ बशीर इब्राहीम मुजावर
शाखा क्र. ४ हारून बावूलाल मुजावर

जिल्हा न्यायालयाने दि. ३०/०३/१९९० च्या आदेशान्वये योजना मंजुर केलेली असल्याने वक्फ मंडळाला त्यात हस्तक्षेप करता येणार नाही. त्याकरीता सध्या वक्फ न्यायाधिकरण अस्तित्वात आहे . अर्जदाराने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सदर अर्जामध्ये गैरअर्जदार क्र. ७ असे दाखवलेले आहे. मुळातच योजनेची चौकशी त्यांच्या समोर होणार व निकाल देखील तेच देणार असे असंताना त्यांना पार्टी करण्याचे काहीच कारण नसताना पार्टी करण्यात आलेले आहे. सबब अर्जदारने गैरअर्जदार यांना वरील कारस्थान करुन मानसिकदृष्टया त्रास दिलेल्या असल्याने ५०,०००/- कॉस्ट करुन त्यांचा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली आहे.

दि. १८/०६/२०१२ रोजी अर्जदार क्र. ९,१०,११,१३A व १३B यांनी योजने दुरुस्तीसाठी अर्ज दिलेला आहे तो प्रलंबीत आहे असे असंताना हा अर्ज दिलेला असल्याने तो नामंजुर करावा.

दि. ०६/११/२०२० रोजी गैरअर्जदार यांनी अर्ज देवुन वरील हकीकत तसेच मा. उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्र. १३६२२/१८ मधील दिलेल्या आदेशाचा उहापोह केलेला आहे.

दि. ०२/०३/२०१९ रोजी हस्तक्षेप अर्जदार शकिल एस. मुजावर रा. खेड शिवापूर, ता. हवेली. जि. पुणे यांनी अर्ज देवुन असे कथन केले आहे की, वक्फ मंडळाकडुन दि ०८/१२/२०१४ रोजी वृत्तपत्रात प्रकाशित झालेली नोटीस मला बजावण्यात आलेली नाही कारण मी देखील येथील मुजावर आहे व माझा देखील सारखा हिस्सा त्या संस्थेत आहे. अर्जदाराने त्याची पूर्तता केलेली नसल्याने त्याचा अर्ज रद्द करण्यात यावा. अर्जदाराला हे माहित आहे की माझा संस्थेत १/४ हिस्सा आहे तरी देखील त्यांनी मला प्रकरणात पार्टी केले नाही. सबब त्यांचा अर्ज रद्द करण्यात यावा व मला पार्टी करण्यात यावे व माझा हस्ताक्षेपाचा अर्ज मंजुर करण्यात यावा.

प्रादेशिक वक्फ अधिकारी यांचे पत्र क्र. चौकशी/११२/२०१७ दि. १७/१०/२०१७ अन्वये महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे आदेश क्र. चौकशी/ २१७९/२०१८ दि. ०१/०६/२०१८ अन्वये दर्गाह हजरत कमरअली दरवेश व गुडजी बाबा खेड शिवापूर या संस्थेच्या दैनदिन व्यवस्थापनासाठी ॲडहॉक बॉडी तात्पुरत्या रित्या पुढील आदेशापर्यंत मंजुर करण्यात आलेली आहे. सदर बॉडी मध्ये खालील लोकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

१. प्रादेशीक वक्फ अधिकारी पुणे, पर्यवेक्षक
२. आरेफ चौधरी, सदस्य
३. मोहम्मद मुक्तार बराया, सदस्य
४. फेरोज सय्यद मुजावर, सदस्य

दि. २४/१२/२०१८ रोजी ॲड इनामदार यांनी ६७(२ व ६) वक्फ ॲक्ट अन्वये अर्ज देवुन कमेटी बदलण्याबाबात व त्यांना पदावरुन काढुन टाकण्याबाबत अर्ज दिलेला आहे. त्यांनी त्यांच्य अर्जात असे नमुद केले आहे की, कमेटीमध्ये सध्या असणा-या लोकांनी वक्फ संस्थाचे नुकसान केले आहे, मनमानी कारभार केलेला आहे, वक्फ संस्थेमध्ये त्यांचा इंटरेस्ट आहे. भक्तासाठी बांधलेले ५ ब्लॉक तोडुन टाकलेले आहे. बोर्डाच्या परवागी शिवाय कमेटी मेबंर दर्गाहचे डोनेशन बॉक्स फोडतात, तसेच कमेटी मेबंर कोणत्याही प्रकारचे खाते सांगत

नाही. फिरोज मुजावर नावाचा माणुस वक्फ संस्थेच्या विरोधात काम करतो त्यांनी वक्फ मिळकतीमध्ये बंगला बांधलेला आहे सबब त्या लोकांना कमेटी मधुन कमी करुन सुचविलेल्या लोकांना कमेटी वर घेण्यात यावे. तसेच दि. १४/०९/२०२१ रोजी श्री. इनमादार यांनी अर्ज देऊन असे कथन केले आहे की बोर्डाच्या आदेशानुसार तात्पुरत्या देखभालीसाठी ॲडॅहॉक कमेटीची नेमणुक केलेला होती. परंतु सदर कमेटी सदस्याने दर्गाहच्या पैश्याचा ५२ लाख रुपयाचा अपहार केले आहे व चार वर्षाचा हिशोब न दिल्यामुळे त्यांच्या विरुध्द रायगड पोलीस स्टेशन येथे एफ.आर. क्र. १२६/१५ दाखल केलेली आहे. सबब वरील कमेटी कायदयाने बरखास्त करण्यात यावी.

वक्फ अर्ज क्र. ४२/२०११ मध्ये अर्जदार मकसुद रहेमान अब्दुल मुजावर यांनी वक्फ न्यायाधिकरणाकडे अर्ज दाखल केला होता सदचा अर्जाचा निकाल दि. १०/०२/२०१२ रोजी होऊन न्यायालयाने सदरचा अर्ज रद्द करुन बोर्डाला आदेश दिलेले की संपूर्ण मुतवल्ली बोर्डाची नेमणुक दि. ३०/०२/१९९० च्या मंजुर योजनेच्या नुसार लवकरात लवकर करावी.

दि. १६/०४/२०१५ रोजी अर्जदार अखलाक अहेमद शेख यांनी वक्फ न्यायाधिकरणाकडे अर्ज क्र १७/१५ दाखल करुन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि. १२/०९/२०११ च्या आदेश अन्वये अस्तित्वात असलेली ॲडॅहॉक कमेटी दि. ०६/०४/२०१५ च्या आदेशान्वये बरखास्त केलेली आहे त्यांस आव्हान दिलेले आहे. सदर आदेशाला मा. वक्फ न्यायाधिकरण न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे. सदरच्या न्यायाधिकरणाच्या आदेशाला मंडळाने मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे सि.आर.ए. १५६/१५ अन्वये आव्हान दिलेले आहे. मा. उच्च न्यायालयने असे आदेश दिलेले आहे की वक्फ संस्थेमध्ये गैरअर्जदार यांनी गंभीर घोटाळा केलेला आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कलम २५ अन्वये केलेली कार्यवाही उचित स्वरुपाची आहे सबब वक्फ न्यायाधिकरणाचा आदेश रद्द केलेला आहे.

त्यांनतर अर्जदार मकसुद अब्दुल रहेमान मुजावर यांनी उच्च न्यायालय औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र. ३०३५/१६ दाखल करुन असे कथन केले होते की, मा. वक्फ न्यायाधिकरणाने दि. १०/०२/२०१२ रोजी वक्फ बोर्डाला आदेश देऊन पुर्ण मुतवल्ली बोर्डाची नेमणुक करावी असे निर्देश दिलेले होते परंतु आदयापपावेतो पुर्ण मुतवल्ली बोर्डाची नेमणुक करण्यात आलेली नाही. सदर अर्जावर मा. उच्च न्यायालयाने अर्जदारास असे आदेश दिले की वक्फ न्यायाधिकरण हे सक्षम अधिकारी आहे जे काही सांगायचे असतील ते त्यांच्या पुढे सांगा असे नमुद करुन अर्ज दि. १४/०३/२०१६ रोजी निकाली काढलेला आहे.

त्यानंतर अर्जदार शब्बीर अब्दुल करीम मुजावर यांनी रिट पिटीशन क्र. १३६२२/१८ तसेच हमजा हुसैन यांनी रिट पिटीशन क्र. ६५४/१८ दाखल केले होते त्यावर गैरअर्जदार २ व ३ यांनी उच्च न्यायालया पुढे असे विधान केले होते की त्यांनी दाखल केलेल्या अर्जावर चौकशी घेऊन गुणदोषावर निकाली काढण्यात येतील सबब वरील दोन्ही रिट पिटीशन दि. ०७/१२/२०१८ रोजी मा. उच्च न्यायालयाने निकाली काढलेले आहे.

ठराव क्रमांक २३ :-

पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

विषय क्रमांक २४:-

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर
वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३२ व ४२ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर
आदेश

संचिका क्र. ३२/१४१/२०१३ & ४२/१०९/२०१३

हबीबुर रहेमान अब्दुल सत्तार मालानी
रा. यवतमाळ, ता.जि. यवतमाळ ----- अर्जदार

विरूध्द

सय्यद खलील सय्यद हैदर
रा. यवतमाळ, ता.जि. यवतमाळ ----- गैरअर्जदार

प्रकरण - गौसीया मस्जिद यवतमाळच्या दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३२ व ४२ नुसार योजनेस व फेरफारास मान्यता देणे बाबत.
वक्फ नोंदणी क्र.. MSBW/YTM/१२५/२०१३ मुबंई सार्वजनिक ट्रस्ट कलम १९५०अन्वये नोदंणी क्र. B-१५ YTM

प्रारंभिक (विवेचन) -

गौसीया मस्जिद यवतमाळ ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून त्याचा नोंदणी क्र. MSBW/YTM/१२५/२०१३ असा आहे.

अर्जदार हबीबुर रहेमान अब्दुल सत्तार मालानी यांनी दि. २६/०३/२०१३ रोजीच्या प्रस्तावानुसार गौसीया मस्जिद यवतमाळ नोंदणी क्र. MSBW/YTM/१२५/२०१३ ही संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५०च्या तरतुदीनुसार B-१५ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था आहे या वक्फ संस्थेच्या हित संबंधीत अर्जदाराने दाखल केलेल्या वरील संस्थेचे व्यवस्थापन संबंधीत योजना मंजूरी करिता वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३२(६९) अन्वये सादर केलेले आहे.

तसेच श्री. हबीबुर रहेमान अब्दुल सत्तार मालाणी यांनी दि. २५/०२/२०१३ रोजी कलम ४२ अन्वये व्यवस्थापकीय विश्वस्तांमध्ये विश्वस्तांच्या बदलास मान्यात मिळेणेबाबत अर्ज दाखल केले होता.

त्यानुसार कलम ३२ नुसार जाहिरप्रगटन पारित करण्या करीता दि. १६/०४/२०१३ रोजी जाहिरनोटीस काढण्यात आली व त्यामध्ये असे नमुद करण्यात आले वरिल व्यवस्थापनासंबंधी कोणाची काही तक्रार असल्यास त्यांनी ही नोटीस मिळाल्यापासुन १५ दिवसाच्या आत आपले म्हणणे/आक्षेप दाखल करावे सदरची नोटीस दि. ०२/०५/२०१३

रोजीच्या दैंनिक नवभारत या वृत्तपत्रात देण्यात आली तसेच जिल्हा/विभागीय वक्फ अधिकारी यांनी पंचनामा व वृत्तपत्राची एक प्रत व अहवाल या कार्यालयास त्यांचे दि. २१/०५/२०१३ च्या पत्रान्वये सादर केले आहे. दि. ३०/०५/२०१३ पर्यंत कोणाचेही म्हणणे/आक्षेप आलेले नव्हते सबब सदरचे प्रकरण हे मंजुरीसाठी ठेवण्यात आले.

कलम ४२ नुसार जाहिर प्रगटन या कार्यालयाचे पत्र जावक. क्र. चौकशी/३५०/१०३२/२०१३ दि. ०६/०३/२०१३ अन्वये निरगमीत करण्यात आले दि. ०२/०५/२०१३ रोजी दैंनिक नवभारत या वृत्तपत्रात जाहिरनोटीस देण्यात व त्यामध्ये असे नमुद करण्यात आले की वरिल व्यवस्थापणातील विश्वस्तांच्या बदलास मान्याता मिळणे बाबात कोणाची काही तक्रार असल्यास त्यांनी ही नोटीस मिळाल्यापासुन १५ दिवसाच्या आत आपले म्हणणे/आक्षेप दाखल करावे सदरची नोटीस दि. ०२/०५/२०१३ रोजीच्या दैंनिक नवभारत या वृत्तपत्रात देण्यात आली तसेच जिल्हा/विभागीय वक्फ अधिकारी यांनी पंचनामा व वृत्तपत्राची एक प्रत व अहवाल या कार्यालयास त्यांचे दि. २१/०५/२०१३ च्या पत्राअन्वये सादर केले आहे. दि. ३०/०५/२०१३ पर्यंत कोणाचीही म्हणणे/आक्षेप आलेले नव्हते सबब सदरचे प्रकरण हे मंजुरीसाठी ठेवण्यात आले.

दि. ३१/०५/२०१३ रोजी ३२/१४१/२०१३ या संचिकेमध्ये कार्यालयाचे पत्र जा.क्र. मरावम/चौकशी/४९२८/२०१३ अन्वये वक्फ संस्था गौसिया मस्जिद यवतमाळच्या व्यवस्थापनासाठी श्री. हबीबुर रहेमान अब्दुल सत्तार मालाणी यांनी सन १९९५ चे कलम ३२ अन्वये दि. २६/०३/२०१३ रोजी सादर केलेली योजना मरावम ठराव क्र. ०५/११ दि. १०/०६/२०११ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. एन.डी. पठाण यांनी मंजुर केली.

सदर आदेशाला श्री. सय्यद खालीद सय्यद हैदर व मयत श्री. हाजी मोहम्मद मोबीन मोहम्मद सुलेमान रा. यवतमाळ यांनी वक्फ न्यायाधिकरणात वक्फ अर्ज क्र. ९७/१३ दाखल करुन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाला आव्हान दिले. सदरील अर्जाचा मा. वक्फ न्यायाधिकरण न्यायालयाने दि. २९/०९/२०१५ रोजी निकाल देऊन सदरचा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा आदेश रद्द केला व पुन्हा प्रकरण फेर चौकशी करीता मंडळाकडे पाठवन पुन्हा चौकशी घेऊन त्यानुसार गुणदोषावर निकाल दयावा असे आदेशित केलेले आहे.

त्यांनतर वेळोवेळी पक्षकांराना बोलावुन चौकशी घेण्यात आलेली आहे. दि. २५/०२/२०२२ रोजी हबीबुर रहेमान मालाणी यांनी म्हणणे सादर करुन असे कथन केले की ते वक्फ संस्थेच्या रोजच्या रोजचे व्यवस्थापन स्वत: करतात, विदयुत बील भरणे, पेशइमामचे पगार करणे इ. कामे ब-याच दिवसापासुन ते करतात. त्यानी व्यवस्थापकीय समितीसाठी अर्ज दिला होता तो मंजुर करण्यात आला होता परंतु सय्यद खलील सय्यद हैदर यांनी न्यायालया मार्फत त्यांनी पुन्हा चौकशी आणली. नंतर हरकतदाराने दाखल केलेल्या हरकत योग्य स्वरुपाच्या नसुन त्यांची हरकत रद्द करण्यात येऊन व्यवस्थापकीय समितीसाठी त्यांनी दिलेला अर्ज मंजुर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केलेली आहे.

ठराव क्रमांक २४ :-

सदर वक्फ संस्थेची योजना धर्मादाय आयुक्त यांनी सन १९६६ साली मंजुर केलेली आहे. या योजनेनुसार कार्यरत असलेल्या विश्वस्तांनी नविन विश्वस्तांची निवड करावयाची आहे. सद्यास्थितीत शेडयुल एक वरिल सर्व सदस्य मयत झालेले आहेत. महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरणाने वक्फ अर्ज क्र.९७/२०१३ मध्ये दि.२९/५/२०१५५ रोजी दिलेल्या ओदशामध्ये या संस्थेकरीता वक्फ मंडळाकडून मंजुर करण्यात आलेल्या फेर बदल अर्जाच्या आदेशास रद्द बातल ठरवले आहे. त्यामुळे सद्यस्थितीत कोणतीही व्यवस्थापन समिती अस्तित्वात नाही असे असल्याने श्री.हबीबुर रहेमान अब्दुल सत्तार मालानी व सय्यद खलील सय्यद हैदर या दोन्ही व्यक्तीकडून सद्यस्थितीत या वक्फ संस्थेचे काही प्रमाणात स्वतंत्रपणे व्यवस्थापन केले जात आहे. सन१९६६ च्या योजनेनुसार व्यवस्थापकीय सदस्यांची नियुक्ती करता येत नसल्यामुळे या वक्फ संस्थेमध्ये सध्या स्वंतत्रपणे व्यवस्थापन करीत असलेल्या दोन गटामध्ये सामंजस्याने ११ व्यक्तींची निवड करण्याबाबत प्रादेशिक वक्फ अधिकारी अमरावती यांना निर्देश देण्यात यावेत. सामंजस्याने निवड करणे शक्य नसल्यास या वक्फ संस्थेच्या व्यवस्थापन समितीसाठी निवडणुकीने व्यवस्थापन समिती निवडण्याची कार्यवाही करण्याबाबत प्रादेशिक वक्फ अधिकारी अमरावती यांना निर्देश देण्यात यावे.

विषय क्रमांक २५:-

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश

संचिका क्र. ४२/४३/२०१३

मोहम्मद शफी उस्मान नाईक
रा. वावे वडखल, ता. पेन, जि. रायगड ----- अर्जदार

विरूध्द

इरफान अब्दुला नाईक
रा. वावे वडखल, ता. पेन, जि. रायगड ---- हरकतदार

प्रकरण - जामा मस्जिद वावे वडखल ता. पेन, जि. रायगडच्या दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ नुसार फेरफार अर्जास मान्यता देणे बाबत.
नोंदणी क्र. MSBW/RDG/३५/२००८ बी.पी.टी.कलम १९५० नुसार B-७२

प्रारंभिक - (विवेचन)

जामा मस्जिद वावे वडखल ता. पेन, जि. रायगड ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून त्याचा नोंदणी क्र. MSBW/RDG/३५/२००८ असा आहे. सदर संस्थेच्या मिळकतीची नोंद वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यात आलेली आहे.

अर्जदार मोहम्मद शफी उस्मान नाईक -

अर्जदार यांनी दि. १७/०८/२०१३ रोजी सदर संस्थेच्या व्यवस्थापकीय समितीचे फेरबदल अर्ज वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ अन्वये या कार्यालयास दाखल केला होता व सदरचा अर्ज मंजुर करावा अशी त्यांनी विनंती केला होता.

सदरच्या अर्जाला इरफान अब्दुल्लाह नाईक रा. वावे वडखल, ता. पेन, जि. रायगड , यांनी हरकत घेतली होती की हरकतदाराचा अर्ज मंजूर करावा व अर्जदाराची फेरफार अर्ज नामंजूर करावा. सदरच्या दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकल्यानंतर दि. २१/०१/२०१४ रोजी या कार्यालयाचे पत्र क्र. ४४८/१४ अन्वये महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे ठराव क्र. ५४/१३ दि. ०३/१०/२०१३ अन्वये वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४२ अन्वये वक्फ संस्था जामा मस्जिद, वावे वडखल ता. पेन, जि. रायगड च्या व्यवस्थापकीय विश्वस्तांचा फेर फार अर्ज खालील प्रमाणे स्विकृत करुन नोंदविण्यात आला होता. त्यामध्ये एकुण समाविष्ट विश्वस्तांची संख्या ७ एवढी होती तसेच नियमानुसार त्यांना कलम २२ अन्वये अटी घालण्यात आल्या होत्या.

सदरच्या आदेशा विरुध्द हरकतदार श्री. इरफान अब्दुल्लाह नाईक व दिलावर हमीद पटेल यांनी महाराष्ट्र राज्य वक्फ प्राधिकरण येथे वक्फ अर्ज क्र. १२/०४ दि. ०६/०१/२०१४ रोजी दाखल करुन दि. २१/०१/२०१४ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केस क्र. चौकशी-/४२/४३/२०१३ या मध्ये झालेल्या आदेशाला आव्हान दिले होते. दि. २४/०७/२०१७ रोजी मा. वक्फ न्यायाधिकरण यांनी अर्ज क्र. १२/२०१४ मध्ये निकाल देऊन अर्जदाराचा अर्ज मंजुर केला व सदरच्या संचिकेमध्ये पुन्हा नव्याने चौकशी घेऊन गुणदोषावर निकाल देण्याबद्दल आदेशीत केले. तसेच पक्षकारांना कलम ४२ च्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे हजर राहणे बाबत आदेंशित केले होते.

त्यानंतर वेळोवेळी सदरच्या प्रकरणामध्ये चौकशी घेऊन अर्जदार व गैरअर्जदार यांना चौकशी कामी बोलावुन व दि. २५/०२/२०२२ रोजी अंतिम चौकशी घेऊन दोन्ही पक्षकारांचे युक्तीवाद ऐकुण घेण्यात आले. या मध्ये अर्जदार मोहंमद शफी व इतर यांच्या वतीने एस.ए.जी. कूरेशी हे हजर होते तसेच इरफान अब्दूल्ला गैरअर्जदार यांच्या वतीने ॲड एनए.खान हे हजर होते. दोन्ही पक्षकारांचा यूक्तीवाद ऐकल्यानंतर सदरचे प्रकरण आदेशाकरिता ठेवण्यात आले.

ठराव क्रमांक २५:-

पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

विषय क्रमांक २६:-

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश

संचिका क्र. ४२/२११/२०१८ व ४२/४०६/२०१८

मोहम्मद निसार वजीर खान पठाण
रा. कोल्हापुर, ता. जि. कोल्हापुर ----- प्रथम
अर्जदार

मलिक गुलाब मोकाशी
रा. शाहुपुरी कोल्हापुर ता. जि. कोल्हापुर -----व्दितीय
अर्जदार

विरूध्द

१. जाफर खान अब्दुल शेख
रा. शाहुपुरी कोल्हापुर, ता.जि. कोल्हापुर
२. फिरोज कादर जमादार
रा. शाहुपुरी कोल्हापुर, ता.जि. कोल्हापुर
३. मैनोद्दीन खुतोबोद्दीन मोकाशी
रा. शाहुपुरी कोल्हापुर, ता.जि. कोल्हापुर
४. अब्दुल सत्तार वजीर खान पठान
रा. शाहुपुरी कोल्हापुर, ता.जि. कोल्हापुर ---- सर्व हरकतदार

प्रकरण - शाहुपुरी थोरले मस्जिद कोल्हापुरच्या दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ नुसार व्यवस्थापकीय समितीच्या फेरबद्दलास मान्यता देणे बाबत.
नोंदणी क्र. MSBW/KPR/१४३/२०१८

प्रारंभिक - (विवेचन)

शाहुपुरी थोरले मस्जिद कोल्हापुर ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून त्याचा नोंदणी क्र. MSBW/KPR/१४३/२०१८ असा आहे. सदर संस्थेच्या मिळकतीची नोंद वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यात आलेली आहे.

प्रथम अर्जदार मोहम्मद निसार वजीर खान पठाण -

अर्जदार यांनी दि. ०५/०६/२०१८ रोजी सदर संस्थेच्या व्यवस्थापकीय समितीच्या फेरबदल अर्ज वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ अन्वये या कार्यालयास दाखल केला आहे. सदरचा अर्ज मंजुर करावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

द्वितीय अर्जदार मलिक गुलाब मोकाशी -

अर्जदार यांनी दि. १०/१०/२०१८ रोजी सदर संस्थेच्या व्यवस्थापकीय समितीच्या फेरबदल अर्ज वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ अन्वये या कार्यालयास दाखल केला आहे. सदरचा अर्ज मंजुर करावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

१. हरकतदार जाफर खान अब्दुल शेख -

अर्जदारांने दि. १०/०९/२०१८ रोजी हरकत अर्ज दाखल केलेला आहे व असे नमुद केले आहे की, सदरचा बदल अर्ज वक्फ संस्थेच्या घटनेप्रमाणे झालेला नाही. त्यास समाज व जमातीची मान्यता नव्हती व नाही. सदरचे वक्फ संस्था नोंदणी करणेकमी जमातीने पुढाकार घेतला असुन त्यानुसार प्रस्ताव आपल्या कार्यालयात दाखल केला आहे. जमातीने नोंदणी प्रस्ताव दाखल करणार असल्याची चाहूल लागल्याने या वक्फ संस्थेचे स्वयंघोषित चेअरमन महमंद निसार वजीरखान पठाण यांनी खोटी कागदपत्रे तयार करुन घाईघाईत मंजुर करुन घेण्याच्या तयारीत आहेत.

२. सदर महंमद निसार वजीरखान पठाण हे खोटया कागदपत्रांच्या आधारे फेरफार मंजुर करुन घेत आहेत. यास या अर्जदारास हरकत असुन सदरचा बदल अर्ज ना मंजुर करण्यात यावा.

३. प्रस्तुत स्वयंघोषित चेअरमन पठाण यांनी वक्फ मिळकतीत दुकानगाळे व फलॅट बेकादेशीर बांधकाम करुन टेंडर न मागवता वक्फ मंडळाची पुर्वपरवानगी न घेता कोणतेही (नाहरकत दाखला) वक्फ मंडळाची परवानगी घेतली नाही व आपल्या हितचिंतकांना सदरची करोडो रुपयाची जागा मोफत वाटल्या आहेत. त्याची चौकशी होणे अत्यंत गरजेचे आहे. त्याबाबत हरकतदार वेगळा अर्ज देणार आहेत.

४. प्रस्तुत स्वयंघोषित चेअरमन यांनी आपल्या मुलाला व नातेवाईकांना गाळे कायमस्वरुपी भाडयाने दिलेले आहेत. सदर भाडेकरु सोबत बोगस कारारपत्र केलेले आहेत. तसेच मस्जिद पार्किंगच्या जागेत बेकादेशीर बांधकाम केले आहेत. तसेच २००० स्क्वे फुट जमीन स्वयंघाषित चेअरमन कोल्हापुर महापालिकेस मोफत दिलेली असुन त्या बाबत चौकशी व्हावी. बदल अर्जास ब-याच सभा सदस्यांची हरकत असुन आमचे हरकत दाखल करुन घेण्यात यावी.

२. हरकतदार फिरोज कादर जमादार व इतर ५-

अर्जदारांने दि. १०/०९/२०१८ रोजी हरकत अर्ज दाखल केलेला आहे व असे नमुद केले आहे की, सदरचा बदल अर्ज वक्फ संस्थेच्या घटनेप्रमाणे झालेला नाही. त्यास समाज व जमातीची मान्यता नव्हती व नाही. सदरचे वक्फ संस्था नोंदणी करणेकमी जमातीने पुढाकार घेतला असुन त्यानुसार प्रस्ताव आपल्या कार्यालयात दाखल केला आहे. जमातीने नोंदणी प्रस्ताव दाखल करणार असल्याची चाहूल लागल्याने या वक्फ संस्थेचे

स्वयंघोषित चेअरमन महमंद निसार वजीरखान पठाण यांनी खोटी कागदपत्रे तयार करुन घाईघाईत मंजुर करुन घेण्याच्या तयारीत आहेत.

सदर महंमद निसार वजीरखान पठाण हे खोटया कागदपत्रांच्या आधारे फेरफार मंजुर करुन घेत आहेत. यास या अर्जदारास हरकत असुन सदरचा बदल अर्ज ना मंजुर करण्यात यावा.

प्रस्तुत स्वयंघोषित चेअरमन पठाण यांनी वक्फ मिळकतीत दुकानगाळे व फलॅट बेकादेशीर बांधकाम करुन टेंडर न मागवता वक्फ मंडळाची पुर्वपरवानगी न घेता कोणतेही (नाहरकत दाखला) वक्फ मंडळाची परवानगी घेतली नाही व आपल्या हितचिंतकांना सदरची करोडो रुपयाची जागा मोफत वाटल्या आहेत. त्याची चौकशी होणे अत्यंत गरजेचे आहे. त्याबाबत हरकतदार वेगळा अर्ज देणार आहेत.

प्रस्तुत स्वयंघोषित चेअरमन यांनी आपल्या मुलाला व नातेवाईकांना गाळे कायमस्वरुपी भाडयाने दिलेले आहेत. सदर भाडेकरु सोबत बोगस कारारपत्र केलेले आहेत. तसेच मस्जिद पार्किंगच्या जागेत बेकादेशीर बांधकाम केले आहेत. तसेच २००० स्क्वे फुट जमीन स्वयंघाषित चेअरमन कोल्हापुर महापालिकेस मोफत दिलेली असुन त्या बाबत चौकशी व्हावी. बदल अर्जास ब-याच सभा सदस्यांची हरकत असुन आमचे हरकत दाखल करुन घेण्यात यावी.

३. हरकतदार मैनोद्दीन खुतोबोद्दीन मोकाशी व इतर ४-

अर्जदारांने दि. १०/०९/२०१८ रोजी हरकत अर्ज दाखल केलेला आहे व असे नमुद केले आहे की, सदरचा बदल अर्ज वक्फ संस्थेच्या घटनेप्रमाणे झालेला नाही. त्यास समाज व जमातीची मान्यता नव्हती व नाही. सदरचे वक्फ संस्था नोंदणी करणेकमी जमातीने पुढाकार घेतला असुन त्यानुसार प्रस्ताव आपल्या कार्यालयात दाखल केला आहे. जमातीने नोंदणी प्रस्ताव दाखल करणार असल्याची चाहूल लागल्याने या वक्फ संस्थेचे स्वयंघोषित चेअरमन महमंद निसार वजीरखान पठाण यांनी खोटी कागदपत्रे तयार करुन घाईघाईत मंजुर करुन घेण्याच्या तयारीत आहेत.

सदर महंमद निसार वजीरखान पठाण हे खोटया कागदपत्रांच्या आधारे फेरफार मंजुर करुन घेत आहेत. यास या अर्जदारास हरकत असुन सदरचा बदल अर्ज ना मंजुर करण्यात यावा.

प्रस्तुत स्वयंघोषित चेअरमन पठाण यांनी वक्फ मिळकतीत दुकानगाळे व फलॅट बेकादेशीर बांधकाम करुन टेंडर न मागवता वक्फ मंडळाची पुर्वपरवानगी न घेता कोणतेही (नाहरकत दाखला) वक्फ मंडळाची परवानगी घेतली नाही व आपल्या हितचिंतकांना सदरची करोडो रुपयाची जागा मोफत वाटल्या आहेत. त्याची चौकशी होणे अत्यंत गरजेचे आहे. त्याबाबत हरकतदार वेगळा अर्ज देणार आहेत.

प्रस्तुत स्वयंघोषित चेअरमन यांनी आपल्या मुलाला व नातेवाईकांना गाळे कायमस्वरुपी भाडयाने दिलेले आहेत. सदर भाडेकरु सोबत बोगस कारारपत्र केलेले आहेत. तसेच मस्जिद पार्किंगच्या जागेत बेकादेशीर बांधकाम केले आहेत. तसेच २००० स्क्वे फुट जमीन स्वयंघाषित चेअरमन कोल्हापुर महापालिकेस मोफत दिलेली असुन त्या बाबत चौकशी व्हावी. बदल अर्जास ब-याच सभा सदस्यांची हरकत असुन आमचे हरकत दाखल करुन घेण्यात यावी.

४. हरकतदार अब्दुल सत्तार वजीर खान पठाण-

दि. ०८/१०/२०२१ रोजीचा अर्जदारांनी असा अर्ज दिला की, त्यांना दि. ०५/१०/२०२१ रोजी नोटीस मिळालेली आहे. अर्जदारानी दाखल केलेल्या कोणत्याही कागदपत्राच्या प्रती त्यांना मिळालेल्या नाही. त्यामुळे व हरकतदार यांना कायदेचे न्यान कमी असल्यामुळे वकीलाची नेमणुक करीत आहे.

५. तक्रार अर्जदार मैनोद्दिन खुतबोद्दिन मोकाशी यांचा फेरफारकरिता तक्रार-

अर्जदार यांनी दि. ०४/१२/२०१८ रोजी तक्रार अर्ज देऊन असे नमुद केले आहे की, स्वंयघोषित चेअरमन निसार वजीरखान पठाण हे गेली ३४ वर्षे कार्यरत आहेत व मनमानी कारभार करत आहात. वक्फ मंडळाची परवानगी न घेता चॅरीटी कमिशनरच्या नावाखाली चेअरमन यांनी लाखो रुपये घेऊन दुकानगाळे व प्लॅटस यांचे कायमस्वरुपी बेकादेशीरपणे वाटप केलेले आहे. वक्फ मंडळाची परवानगी न घेता श्री. निसार पठाण यांनी वक्फची कोटी रु. किंमतीची जमीन कोल्हापुर महानगरपालिकेस जागा मालक म्हणून मोफत दिलेली आहे. वक्फ बोर्डाची परिपत्रक असताना देखील श्री. निसार पठाण व त्यांच्या विश्वस्त मंडळातील इतर सदस्यांनी स्वत:ला व आपल्या नातेवाईकाला वक्फ मालमत्तेस दुकानगाळे नाममात्र भाडयावर घेतलेले आहेत. सन २००४ रोजी श्री. निसार पठाण यांनी बांधकामासाठी आवश्यक असणारी प्रोव्हीजन NOC वक्फ मंडळाकडून घेतली होती. त्याची मुदत संपलेली असताना देखील त्या प्रोव्हिजन NOC चा वापर करुन महानगरपालिकेची व लोकांची फसवणुक करत आहेत. श्री. निसार पठाण यांच्या हलगर्जीपणामुळे बांधकामाची आनामत रक्कम ४,७२,८३० रु. महानगरपालिकेने मुदतीने बांधकाम करुन भोगवटा प्रमाणपत्रक न घेतल्यामुळे जप्त केलेली आहेत.आमच्यातील जागृत सभासदाने पुढाकार घेऊन ट्रस्टची अदयावत नोंदणी वक्फ मंडळाकडे दि. ०७/०९/२०१८ रोजी केली आहे. त्याचा अदयावत नोंदणी क्रं. MSBW/KPR/१४३/२०१८ आला आहे. व तदनंतर सर्व जमातीने जनरल सभा बोलावुन नवीन कार्यकारी मंडळाची निवड करुन त्याचा फेरफार अर्ज आपल्या कार्यालयाकडे दि. १०/१०/२०१८ रोजी दाखल करण्यात आलेला आहे. जमातीने नोंदणीसाठी पुढाकार घेतल्याची चाहुल लागताच श्री. निसार पठाण यांनी आपला फेरफार अर्ज खोटी कागदपत्रे तयार करुन आपल्या कार्यालयाकडे पाठवली आहे. व त्यास असंख्य सभासदांची हरकत आहे. त्यामुळे, आपणास विनंती आहे की श्री. निसार पठाण यांचा फेरफार अर्ज नामंजुर करण्यात यावा. व जमातीने दाखल केलेला दि. १०/१०/२०१८ रोजीचा फेरफार अर्ज मंजुर करण्यात यावा.

आमच्यातील सभासद जाफरखान अब्दुल शेख यांच्यावर निव्वळ अकसापोटी व राजकीय द्वेषापेटी बिनबुडाचे आरोप करुन राजकीय ताकद वापरुन वक्फ चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. एस.सी.तडवीसो यांच्याकडुन कार्यवाहीसाठी दि. १०/१०/२०१८ रोजी पत्र घेण्यात आलेले आहेत. त्यांची संपुर्ण चौकशी करण्यात यावी. तरी आमच्यावरील तक्रारींचा आपल्याकडुन विचार व्हावा व श्री. निसार पठाण व त्यांच्या विश्वस्त मंडळाची चौकशी लावण्यात यावी. हि विनंती.

मलिक गुलाब मोकाशी (दुसरे अर्जदार) यांची हरकतदार व लेखी युक्तीवाद -

हरकतदार यांनी तक्रार अर्ज देऊन असे नमुद केले आहे की, थोरली मस्जिद, शाहूपुरी, कोल्हापुर ही मस्जिद महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांच्याकडे नोंदणीकृत असुन त्यांचा नोंदणी क्र. MSBW/KPL/१४३/२०१८ असा आहे. सदरचा न्यास पुर्वी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या तरतुदीनुसार नोंणीकृत होता त्याचा नंबर बी- १९ असा होता. यातील अर्जदार जमात यांनी सदरचे संस्थेची नोंदणी रीतसर आपल्या कार्यालयात करुन घेऊन नोंदणी क्रमांक घेतला आहे त्यात देखील हरकतदार यांनी हरकत घेतली आहे. सदरचे नोंदणी क्रं. MSBW/KPL/१४३/२०१८ मे. वक्फ न्यायाधिकरण यांच्याकडे आव्हानीत केलेले आहे. तसेच सन १९९८ पासुन आजपर्यंत या संस्थेचे तथाकथित स्वयंघोषित चेअरमन यांनी कधीही सभा घेतली नाही. त्यामुळे ०७/१०/२०१८ रोजी या मशीदी संदर्भात आयु विन ख्रिश्चन हॉलमध्ये सभा आयोजित केली त्यानुसार कार्यकारी मंडळाची निवड केली. यातील संचालक मंडळाने संस्थेचे कामाज सुरु करण्याबाबत कारवाई करतात जाबदार यांनी घाईगडबडीने बदल अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर कामातील बदल अर्ज योग्य व बरोबर आहे. थोरली माझी परिसरातील व शाहुपुरी परिसरातील सर्व लोक प्रस्तुत मिटींगला हजर होते त्यांच्या सहया प्रोसिडिंग वरती आहेत. त्यांच्यानुसार त्या सर्व सभासदांच्या समोर नवीन कार्यकारी मंडळाची निवड केलेली आहे. त्याप्रमाणे सदरचा बदल अर्ज दाखल केलेल्या आहे. प्रस्तुत कामातील हरकतदार यांनी कधीही मस्जिद च्या सभासदांची मिटिंग घेतली आहे. तसेच अचानकपणे याकामी ७५४ सभासदांची यादी हजर केले आहे कामातील कधीही सर्वसाधारण सभेची नोटीस वर नमुद सभासदांचा दिलेली नाही. त्यामुळे बोगस कागदपत्रांच्या आधारे दाखल केलेले बदल अर्ज/पार अर्ज क्रमांक ४२/२११/२०१८ हा नामंजुर करण्यात यावा. सदर कामातील अर्जदार यांनी १७/०९/२०१७ दाखवलेली सभा बनावट बोगस अशी आहे कारण सदर सभेस मोहम्मद निसार खान पठाण राज मोहम्मद ताजमोहम्मद ट्रेनर, हसिम मनगुळीसाब, खालील अन्सारी हे कधीही हजर नव्हते असे अर्जदार यांच्या दाखल केलेल्या सभा इतिवृत्तांत वरुन दिसुन येते. त्यामुळे बोस बनावट प्रोसिडिंग बुकाच्या आधारे अर्जदार यांचा फेरफार अर्ज/बदल अर्ज मंजुर करण्यात येऊ नये. तसेच सदर सभेस केवळ ८८

सभासद हजर दाखवण्यात आलेले आहेत. उर्वरित ६६६ सुचना/नोटीस दिलेले नाही करुन देखील सदरचे बद्दल अर्ज बोगस बनावट असल्याचे स्पष्ट होते.

सदर कामातील तथाकथित चेअरमन मोहम्मद निसार वजीर खान पठाण यांची निवड सन १९८४ पासुन आजतागायत म्हणजे जवळजवळ ३८ वर्ष या संस्थेचे चेअरमन असल्याचे दर्शवीत आहेत. वास्तविक पाहता सन १९९८ रोजी त्यांचा कार्यकाल संपलेला आहे. तसेच या न्यासाच्या मंजुर नियम नियमावलीनुसार अध्यक्षपद/चेअरमनपद केवळ एका वर्षासाठीच आहे. यातील अर्जदार मोहम्मद निसार वजीर खान पठाण यांनी ३८ स्वत: बेकायदेशीररित्या अध्यक्ष/चेअरमन म्हणुन घेत आहेत. अर्जदार मोहम्मद निसार वजीर खान पठाण यांनी बेकादेशीर रित्या वक्फ मालमत्तेचे स्वार्थासाठी स्वत:च्या फायदयासाठी नुकसान केले आहे. सदर वक्फ संस्थेस जंगम स्थावर मालमत्ता आहे त्याची नोंद आपल्या वक्फ बोर्डाकडे आहे. अशी परिस्थिती असताना तथाकथित स्वयंघोषित तहयात चेअरमन मोहम्मद निसार वजीर खान पठाण यांनी वक्फ मंडळाच्या पुर्वपरवानगीशिवाय बेकादेशीर रित्या दहा कोटी रुपये मालमत्तेचा परस्पर अपहार केले आहेत.

<u>मोहम्मद निसार वजीर खान पठाण अर्जदार यांचा लेखी युक्तीवाद -</u>

दि. १७/११/२०२१ रोजी अर्जदाराने लेखी युक्तीवाद खालील प्रमाणे मांडलेला आहे. संस्थेचे दर ५ वर्षाने कार्यकारी मंडळाचे पदासाठी निवडणुक होते २०१७ मध्ये नियमानुसार व घटनेनुसार रितसर निवडणुक झालेली आहे अर्जदार ट्रस्टची दि. १०/१२/२०१६ रोजी वार्षीक सभा झाली या सभेमध्ये योजनेमधील कलम २ मध्ये नमुद केलेल्या विश्वस्तांच्या संख्येनुसार ३ ट्रस्टीची निवड करण्यात आली व राहीलेले ४ ट्रस्टीची नियुक्ती करण्याकरिता कोअर कमेटीची स्थापना करुन त्यांच्या माध्यमातुन नियुक्ती करण्याकरिता सभेत ठराव झाला त्यानंतर अर्जदारांनी सदर संस्थेचे संभासदा मार्फत निवडुण आलेल्या कार्यकारी मंडळाचा फेरफार मंजुर होऊन मिळण्याकरिता अर्ज दाखल केलेला आहे. दि. १०/१२/२०१६ व १७/०९/२०१७ रोजी वार्षीक सभा झाली या सभेमध्ये हरकतदार हजर होते त्यांनी निवडुन आलेले विश्वस्त मंडळाला मान्यता दर्शविली होती तसेच सभेमध्ये हजर होते म्हणुन प्रोसेडिग मध्ये सही केलेली आहे. वरिल दोन्ही सभेमध्ये मलिक मोकाशी मोसीन शेख मोहम्मद खान फेरोज कादर जमादार व इतर सर्व हरकतदार हजर होते. व त्यांनी मंजुर झालेल्या ठरावास मान्यता दिली होती त्यामुळे हरकती घेण्याचा त्यांना कोणताही कायदेशीर हक्क व अधिकार नाही.

हरकतदार यांनी जो फेरफार अर्ज दाखल केला आहे. त्या फेरफार मध्ये नमुद लोकांनी संस्थेची वर्गणी जमा केलेली नाही. त्यामुळे घटनेतील कलम ८ नुसार हरकतदार यांचा फेरफार अर्ज हा कादयाने चालण्यास पात्र नाही हरकतदार यांच्या फेर फार अर्जामधील लोक संस्थेचे घटनेतील कलम ८ नुसार ट्रस्टी पदासाठी पात्र उमेदवार

नाही. फेरोज जमादार यांच्याकडे संस्थेचे ३३,६०० रुपये थकलेले आहे त्यांनी संस्थेच्या पार्कींगचे नुकसान केले आहे नुकसानीचे रक्कम व भाडयाची रक्कम मागणी केली असता तो भाडु लागला व त्यांनी चीडुन खोटी हजरकत दाखल केली सबब हरकतदार हे संस्थेचे व घटनेतील कलम ८ नुसार अपात्र असल्याने व त्यांची हरकत कायदयाने चालनेस पात्र नसल्याने त्यांचा अर्ज नमंजुर करण्यात यावा. व अर्जदारचा फेर फार अर्ज मंजुर करण्यात यावा.

ठराव क्रमांक २६:-

पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

विषय क्रमांक २७:-

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३२ व ४२ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश

संचिका क्र. ६९ (३२)/१४/२०१३
संचिका क्र. ६९ (३२)/९४/२०१३
संचिका क्र. ६१/४३०/२०१३
संचिका क्र. ४२/२१/२००७

प्रकरण - हजरत पिर शकर गंज रहे. दर्गा, मिरज, ता. मिरज, जि. सांगलीच्या दैनंदिन व्यवस्थापनासाठी योजना मंजुर करणे बाबत. (B-२२४) MSBW/SGL/२९/२००७.

संदर्भ - १. जनाब आसीफ अ. रहेमान शेख व इतर यांचा कलम ६९ अन्वये अर्ज दि. २६.१२.२०१२
२. जनाब आसीफ अ. रहेमान शेख व इतर यांचा कलम ६९ अन्वये अर्ज दि. २२.०२.२०१३
३. जनाब हसन महंमद अ. करीम इनामदार व इतर यांचा कलम ६१ अन्वये अर्ज दि. १९.०९.२०१३
४. वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४२ नुसार जनाब एफ.जी. इनामदार यांचा अर्ज दि. ०६.०९.२०१३

जनाब आसीफ अ. रहेमान शेख व इतर
रा. मिरज, ता. मिरज,
जि. सांगली — अर्जदार

विरूध्द

जनाब घुडूलाल हसन इनामदार व इतर,
(वारस फरदीन घुडूलाल इनामदार व इतर)
रा. मिरज, ता. मिरज, — गैरअर्जदार

जि. सांगली

प्रारंभीक:-

हजरत पिर शकर गंज रहे दर्गा, मिरज, ता. मिरज, जि. सांगली ही संस्था महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या तरतुदीनुसार बी-२२४ (सोलापुर) अन्वये नोंदणीकृत संस्था आहे.

दि. ०१.०१.१९९६ पासुन वक्फ अधिनियम १९९५ संपुर्ण महाराष्ट्रात लागु करण्यांत आलेला असून सदर संस्था कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून ही MSBW/SGL/२९/२००७ अन्वये रितसर नोंदणी करण्यात आलेली आहे. मा.धर्मादय आयुक्ताकडील अनुसूचि-१ व योजनेमधील सदर संस्थेच्या संबंधीत असलेली वक्फ मिळकतीची व विश्वस्तांची नोंद कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यात आलेली आहे.

जनाब आसीफ अ. रहेमान शेख व इतर, रा. मिरज, ता. मिरज, जि. सांगली यांनी संदर्भ क्र. १ व २ अन्वये हजरत पिर शकर गंज रहे, दर्गा मिरजच्या दैनंदिन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ६९ अन्वये योजना (घटना) मान्यतेसाठी सादर केलेली आहे.

सदर संस्था दि. २४.०९.१९६६ रोजी नोंदणी करता वेळी समाजातील श्रीमती सरदारबी भ्र. इब्राहिम मुल्ला यांचे नावाची नोंद विश्वस्त व व्यवस्थापक म्हणुन नोंद दिलेली आहे. धर्मदाय आयुक्ताकडील अर्ज क्र. ४/७७, ११/७७ मधील आदेश दि.३०.०७.१९७९ प्रमाणे जनाब घुडूलाल हसन साब इनामदार, जनाब हसन महमंद अ. करीम इनामदार यांचे नावांची नोंद अनुसूचिवर दिसत असून जनाब घुडुलाल हसन इनामदार हे मयत झालेले आहे. नविन विश्वस्त घेण्यांची रित वंशपरंपरागत असल्याचे नमुद करण्यांत आलेले आहे परंतु सदर संस्थेच्या दैनंदिन व्यवस्थापनासाठी आज पर्यंत योजना मान्यतासाठी कोणत्याही सक्षम प्राधिकारी कडे सादर करण्यांत आलेली नाही.

सदर संस्थेच्या संबंधीत असलेली जंगम मालमत्ताची नोंद कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यं ात आलेली आहे.

प्रकरणांत या कार्यालयाचे पत्र क्रमं ाक मरावंम/चौकशी-३१६/८७५/२०१३ दिनांक २६.०२.२०१३ अन्वये संबंधीतांना नोटीस निर्गमित करून दि.०४.०४.२०१३ रोजी सुनावणी ठेवण्यांत आली.

प्रकरणांत जनाब घुडुलाल हसन इनामदार तर्फे वारस फरदीन घुडुलाल इनामदार, मलीम घुडूलाल इनामदार फरोजीबी घुडूलाल इनामदार सर्व रा. मिरज यांनी दि.११.०६.२०१३ रोजी आपले खालील प्रमाणे आक्षेप सादर केलेले आहे.

१. वरनमुद न्यास/वक्फ हा नोंदणीकृत असून त्याचा मु.सा.वि.व्य. अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असून त्याचा ने ा ंदणी क्र. बी-२२४ (सांगली) असा असुन सदरचा न्यास वक्फ अधिनियम १९९५ नुसारसुध्दा नोंदणीकृत असून त्याचा नोंदणी क्र. MSBW/SGL/२९/२००७ असा आहे.

२. सदर न्यासास/वक्फास नियम नियमावली आहे. वक्फाच्या घटनेनुसार मुख्य विश्वस्त म्हणुन घुडुलाल हसनसो ा इनामदार यांच्या मृत्युपश्चात त्यांचा ज्येष्ठ मुलगा आम्हापैकी फरदीन घुडुलाल इनामदार हे कार्यरत आहेत. घुडुलाल इनामदार हे वरनमुद दर्गाहचे कामकाज पाहात आहेत.

३. अलीकडेच वक्फ संस्थेशी काडीमात्रसंबंध नसणारे आसिफ अब्दुल रहेमान शेख, सुलेमान युसुफ मुल्ला, नबीसो। महीबुब मुजावर, आयुब अब्दुलकादर नालबंद यांनी वरनमुद न्यासासंदर्भात योजना/स्कीम दाखल केली असल्याचे नुकतेच कळुन आले आहे. सदर इसमांनी दाखल केलेले स्कीम अर्ज हा बनावट व बोगस असा आहे. त्यांना वंशपरंपरागत पध्दीतीने चालत आलेल्या न्यासाच्या संदर्भात स्कीम अर्ज दाखल करण्याचा अधिकार नाही.

४. न्यासाच्या/वक्फच्या मंजुर घटनेनुसार विश्वस्तपद हे वंशपरंपरागत असून घुडुलाल हसनसो। इनामदार हे दि. १९.११.२०१२ रोजी मयत झालेले असून त्यांना आम्ही हरकतदार कायदेशीर सरळ वारस आहोत.

५. घुडुलाल हसनसो। इनामदार हे मुख्य विश्वस्त (Sole Trustee) होते. त्यांच्या जागी नियमानुसार व घटनेच्या तरतुदीनुसार आम्हापैकी घुडुलाल हसनसो। इनामदार यांचा ज्येष्ठ मुलगा फरदीन घुडुलाल इनामदार हे पदसिध्द (वंशपरंपरागत) (Hereditary) मुख्य विश्वस्त (Sole trustee) आहेत. त्याबाबतचा बदल अर्ज या मे. कार्यालयात लवकरच दाखल करीत आहोत. तथापि मुख्य विश्वस्तांच्या आपरोक्ष स्कीमअर्जदारांनी सदरचा अर्ज दिलेला असून सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

-:सुनावणी व संबंधीतांचा युक्तीवाद:-

सर्व संबंधीतांना नोटीस पाठविण्यांत आलेली आहे, प्रकरणांत दि.०४.०४.२०१३, ०४.०६.२०१३, २६.०३.२०१३, ०२.०७.२०१३, ०७.०५.२०१४, १८.०२.२०१९, ०२.०३.२०१९, २६.०२.२०२२, २७.०४.२०२२ रोजी सुनावणी घेण्यांत आली.

प्रकरणांत दि. २१.०७.२००७ रोजीचे जनाब हसन महमंद अ. करीम इनामदार यांनी शपथपत्राद्वारे जनाब घुडुलाल यांचे विरूध्द खालील प्रमाणे कथन केलेले आहे.

१) अर्ज कलम २ मध्ये सदरचा ट्रस्ट वक्फ कायद्यानुसार नोंद झाल्याने अर्जदार व जाबदार नं. १ हे सदरच्या वक्फचे मुतवल्ली झालेले आहेत. सदरच्या दर्ग्याच्या जमिनीतुन दर्गाची व्यवस्था पहाणे अपेक्षीत आहे. सदरचा दर्गा अतिशय पुरातन आहे. नवीन ट्रस्टी येण्याची रित वंशपरंपरा आहे. वगैरे मजकुर, चुकिचा, खोटा, बेकायदेशीर व अनाधिकाराचा आहे. जाबदार त्याचा पुर्णत्वाने इन्कार करतात.

२) अर्ज कलम ३ मध्ये सदरच्या दर्गाची नर्व व्यवस्था देखभाल अर्जदार व तिन्हाईत इसम करीत आलेले आहेत, जाबदार नं. १ हे दर्ग्याची व्यवस्था पहात नाहीत व त्यांनी दुर्लक्ष केलेले आहे. जाबदार नं. १ यांना वयोमानामुळे बुध्दीभ्रष्ट झालेली आहे. त्यामुळे त्यांना त्यांचे हित, अनहित, जबाबदारी समजत नाही. वगैरे मजकुर धादं ात खोटा, साधणुकिचा, मतलबीपणाचा आहे, तो मुळ अर्जदार इसनमहमंद अ.करीम इनामदार यांना मदत करणेसाठी खुद्द हसनमहमंद अ.करीम इनामदार यांनीच तिन्हाईत इसमाना पुढे करून सदरचा मजकुर नमुद करणेस भाग पाडले आहे. सबब जाबदार यांना मुळीच मान्य व कबुल नाही.

३) खरी वस्तुस्थिती अशी आहे की, जाबदार नं. १ हे वक्फ चे Sole Trustee असून अशी P.T.R. उतारेस नोंद आहे. सदरील जाबदार गेली सुमारे ६०-६२ वर्षापासुन या दर्गाहची सर्वपरितो देखरेख, व्यवस्था, मुतवल्ली, मॅनेजर या नात्याने आजही करीत आलेले आहेत. या वक्फाची कोणतीही, कसल्याही प्रकारची व्यवस्था या अर्जातील मुळ अर्जदार हसनमहंमद इनामदार अगर सदरील तिऱ्हाईत इसमानी केलेली नव्हती व नाही. तसेच सदरील तिऱ्हाईत इसम या दर्गाहच्या जागेत अगर या परिसरातही राहणेस नाहीत.

सदरील तिऱ्हाईत इसम हे गेली सुमारे ५०/५५ वर्षापासुन या जाबदारपासुन विभक्त अन्य दुसररीकडे राहतात. या काळात या जाबदारची या तिऱ्हाईत इसमाना कधीही आठवण आली नाही. अगर कधीही विचारपुसही केलेली नाही, व आता या वक्फाचा व्यवस्थित चाललेला कारभार यात व्यत्यव आणुन मला या मिळकतीमधुन हाकलुन देणेसाठी या अर्जात काही मतलबीपणाचा द्वेपमुलक मजकुर नमुद केलेला आहे.

४) त्याचाच एक भाग, तिऱ्हाईत इसमापैकी नं. १ मलीक याने या जाबदारची बोगस व डुप्लीकेट सही करून मा. पोलीस आयक्त, कोल्हापुर यांचेकडे या जाबदारचे नांवे अर्ज करून माझी बुध्दी भ्रष्ट झाली आहे. अशी बतावणी केली. तसेच दिनांक १७.०१.२००९ रोजी तिऱ्हाईत इसमानी मी राहत असलेल्या घरांमध्ये गुंड लोकांच्या मदतीने मला व जबादार नं. २ यांना बेदम मारहण करून या देवस्थानच्या मिळकतीमधुन हुसकावुन लावणेचा प्रयत्न केला, म्हणुन मी त्वरीत मिरज शहर पोलीस स्टेशनला तक्रार/वर्दी दिली, त्यानुसार पोलीसानी सदरील तिऱ्हाईत इसमांना अटक करून पोलीस व्हॅनमध्ये घालुन पोलीस स्टेशनमध्ये आणुन कडक शब्दात ताकीद दिलेली आहे.

इतकेच नव्हे तर मुळ अर्जदार हसन महंमद अ.करीम इनामदार यानेच सदरची रचना करून तिऱ्हाईत इसमांना चिथावणी देवुन दुसऱ्या दिवशी मला पुन्हा मारहण केलेली आहे व मलीक याने तुला भोसकून खलास करणार अशी भाषा बोलुन दाखवुन धमकी दिली आहे, या सर्व बाबतीत पोलीस तपास सुरू असून मलीक व फिरोजाबी यांचा पोलीस शोध घेत आहे.

५) वर नमुद केलेप्रमाणे सदरील तिऱ्हाईत इसमापासुन मला धोका असलेने जाबदार नं.२ यांनी मला संरक्षण देवुन माझी व वक्फाची व मिळकतीची रक्षा केलेली आहे. मारहणीमुळे मला औषधोपचारही जाबदार नं. २ यांनी व त्यांच्या कुटुंबियानी केला आहे.

६) वरील प्रमाणे सर्व मार्ग खुंटलेने फिरोजाबी व मलीक यांने जिल्हाधिकारी, सांगली यांचेसमोर उपोषण करणेचा प्रयत्न केला याबाबत पोलीसांनी सखोल चौकशी करून तथ्य नसलेने पोलीसानी त्यांना जिल्हाधिकारी यांचे कार्यालयाचे समोरून हुसकाबुन लावले आहे.

७) सदरील जाबदार हे शरीराने व ताब्येतीन चांगले धडधाकट असून आपल्या नित्याची सर्व कामे स्वत:चा पार पाडतात, बुध्दी भ्रष्ठ झालेली नाही, बुध्दी व विचार करणेची नैसर्गिक क्षमता चांगली आहे, कोणतीही गोष्ठ करावयाची झाल्यास पुर्ण विचार करून वाचून समजुन व सद्या वाचुन करतात.

८) रि.स.नं. १९९ व २०० या दोन्ही शेतजमिनी व त्यातील घर मिळकती म्हणजे ५३५०/१ व ५३५०/२ अशा मिळकती वक्फाच्या कब्जेत असून मुख्य व्यवस्थापक, मुतवल्ली Sole Trustee या नात्याने सदरील जबादार यानीच सदरच्या मिळकती जाबदार नं. २ यांना कसणुकीस दिलेल्या आहेत. त्याबाबत कोणतेही अतिक्रमण अगर घुसखोरी झालेली नव्हती व नाही, व कायद्यानेच होवु शकत नाही.

९) रि.स.नं. १९९ व २०० तसेच घर नं. ५३५०/१ व ५३५०/२ या सर्व मिळकती खाजगी मिळकती नाहीत, त्या सर्व वक्फच्या मिळकती आहेत. त्यामुळे या तिऱ्हाईत इसमांचा या मिळकतीशी, दर्गाहशी कायद्याने कसलाही हक्क संबंध येत नाही व येणार नाही, त्यामुळे या तिऱ्हाईत इसमांना याकामी पार्टी करून घेणेचे कारणच नाही.

१०)तिऱ्हाईत इसमांना अशा प्रकारचा अर्ज करणेचे LOCUS-STANDI नाही, सबब अर्ज चालणेस पात्र नाही, तो नामंजुर करणेत यावा.

११)जाबदार नं. २ यांनी या जबादार नं.१ यांन अगर त्यांचे कुटुंबियातील कोणीही माझे कडुन कोणतेही कसलेही बनावट कागदपत्र तयार करून घेतलेले नव्हते व नाही, अगर माझ्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव वगैरे आणलेला नाही. सदर वक्फाचा कारभार मी चांगल्या रितीने व उत्तम प्रकारे कायद्यास अनुसरून दखरेख व्यवस्था वगैरे सर्व काही करीत आहे. त्यामध्ये कोणत्याही प्रकारे गैरप्रकार अगर बेकायदेशीरपणा कधीही नव्हता व नाही.

१२)वर कलम १ ते १३ मध्ये नमुद केलेल्या कारणाचा विचार होवुन माझा (जाबदार नं. १) तिऱ्हाईत इसमाशी अगर वक्फ प्रॉपर्टी व दर्गाहशी काहीही तसेच वाद विषयाशी कोणताही हक्क हितसंबंध पोचु शक्त नाही त्यामुळे या अर्जाचे कामी थर्ड-पार्टी करून घेणेचे कोणतेही कारण नाही.

१३) सबब जबाबदार नं.१ यांची विनंती

अ. तिऱ्हाईत इसमांना सदरचा पार्टी करून घेणेचा अर्ज REJECT नामंजुर करणेत यावा.

ब. इतर अन्य न्यासाचे हुकुम व्हावेत, म्हणुन वगैरे मजकुराचे सवस्तिर म्हण्णे दिले आहे, त्यातील व या ॲफिडेव्हीट मधील सर्व मजकुर खरा व बरोबर आहे.

प्रकरणांत जनाब हसन महमंद अ. करीम इनामदार यांनी दि.२०.०९.२०१३ रोजी खालील प्रमाणे कथन केलेले आहे-

वरील संदर्भातील दर्गा मिरज येथे असुन त्या दर्ग्याच्या मालकी वहीवाटीच्या रि.स.नं. ११९, २००, १६१/१, १६१/२/अ/१/अ, १६१/२/अ/२, १६१/२/अ/१+/२/ब व १६२ या अदमासे ११.२३ हेक्टर जमिनी आहेत सदर ट्रस्टचे १) श्री. हसन महंमद हसनसो। इनामदार, २) श्री.

घुडुलाल हसनसो । इनामदादर हे दोन ट्रस्टी होत व आहेत. त्यातील श्री. घुडुलाल हसनसो । इनामदार हे दि. १९.११.२०१२ रोजी मयत झाले आहेत. घुडुलाल हसनसो । इनामदार व त्यांचे चुलत बंधु हसन बाबासो मुल्ला या जमिनी मधील घरामध्ये रहात होते. मे. चॅरिटी कमीशनर सो ।, मे. डेप्युटी चॅरिटी कमीशनरसो । पुणे व असिस्टंट चॅरिटी कमीशनरसो । सांगली यांनी त्या दोघावर ट्रस्टच्या मिळकतीचा अपहार करतो असे आरोप निश्चित केले आहेत. मी ट्रस्टी हसन महंमद अ.करीम इनामदार व माझा भाऊ नुर महंमद अ.करीम इनामदार असे दोघानी मिळुन ट्रस्टचे रेकार्ड निरनिराळया कोर्टात जानुन बरोबर करून घेतले आहे. त्यावेळी घुडूलाल हसनसो । इनामदार यांचे सोबत त्याची बायको फैरोजाबी व मुले १) श्री. फरदीन, २) श्री. मलीक घुडूलाल इनामदार यापैकी कोणीही नव्हते. वरील जमिनीच्या भोगवटादार सदरी, इब्राहिम मुल्ला सरदारबी मुल्ला, शहजादबी मुल्ला अशी व पिक पाणी सदरी इसुब बाबासो । मुल्ला अशी नांवे नोंद होती ती नांवे १९८० साला पर्यंत होती. ती कमी करण्याचा प्रयत्न आम्हा भावंडानी केला त्यावेळी घुडुलाल हसनसो । इनामदार हे ट्रस्टी असूनही त्यानी त्यासाठी मदत केली नाही व इसुब बाबासो । मुल्ला यांचे संगनमताने या जमिनीतील उत्पन्न ७/१२ वरील नोंदीचा आधार घेत अपहार करीत राहीले.

बारामाही पिकाच्या जमिनी १९० रू. खंडाने अशा पावत्या ते दाखवित राहीले. सदर मिळकतीतील १कचिंचेच्या झाडाचे उत्पन्न चार ते पांच हजार येते याची जरादेखील जाणीव त्यानी ठेवली नाही. इसुब बाबासो । मुल्ला यांचे पीक पाण्यावरल नांव मे. अप्पर आयुक्तासो । पुणे यांचे निकालानंतर २००२ साली कमी झाले तरी पण हसनसो । इनामदार यांच्या आडोशाने त्यांच्या मृत्यु पर्यंत सदर जमिनीतील मिळकती तो हडप करीत राहीला.

आज त्याचा मुलगा सुलेमान इसुब मुल्ला, आपल्या कडे, आपल्या चार साथीदारासह वक्फ अधिनियम १९९५ कलम ३२, ६९ अन्वये केस क्र. ३२(६९)/९४/२०१३ दाखल करून राहीला आहे. केस क्र. मरावंम/चौकशी/३१६/८७५/२०१३. यातील सर्वजण १) सुलेमान इसुब मुल्ला, २) आसीफ अ. रहेमान शेख, ३) गैबीसो । महीबुब मुजावर, ४) आयुब अ.कादर नालबंद, यांचा या ट्रस्टची कसल्याही प्रकारचा संबंध नाही. सदर ट्रस्ट हा आमच्या कुटुंबा मध्ये पुरातन काळापासुन चालत आला आहे. आमच्या वंशखेरीज या मध्ये कोणीही ट्रस्टी बनु शक्त नाही. याची नोंद PTR सदरी असून मे. डेप्युटी कमीशनर मुंबई यांच्या दि.१५.१०.१९७६ च्या निकालात मे. एक्ट्रा असिज्ज सांगली यांच्या दि.३०.०७.१९७९ च्या निकाला प्रमाणे मे. हायकोर्ट मुंबई यांनी दि. ०१.०७.१९८३ रोजी दिलेल्या निकालाने त्यावर शिक्का मोर्तब झाले आहे.

असे असताना आपल्या ऑफीस कडुन केस क्र. मरावंम/चौकशी/३१६/८७५/२०१३ दाखल करून घेतला गेला हे आश्चर्य आहे. PTR सदरी असणाऱ्या नोंदी डावलुन आमच्या कुटुंबाच्या मुलभुत हक्कावर हा एक प्रकारचा धालोच आहे, कोणीही उठावे व स्कीम दाखला करावी व ती करवुन ध्यावी हे कायद्याचे सरळ सरळ उल्लघन आहे.

सदर ट्रस्टशी सुलेमान इसुब मुल्ला ज्याच्या वडीलाने गेली ३० वर्षा अपहार कले । कसलाही संबंध नाही, त्याच प्रमाणे आसीफ अ. रहेमान शेख, गैबीसो । महीबुब मुजावर, आयुब अ.कादर नालबंद यांचाही काडीमात्र संबंध नव्हता व नाही.

या ट्रस्टच्या पाच एकर व्यतिरिक्त २३ एकर जमिनीची केस रेग्युलर सिव्हील अपील २५७/४ हि सांगली कोर्टामध्ये अंतिम सुनावणीस नंबरला आहे, त्यामुळे ट्रस्टला भरपुर जमिनी

येणार आहेत, यांची चाहुल वरील चौघाना आहे म्हणुन येण केन प्रकारे स्कीम दाखल करण्याचा त्याचा पुसका प्रयत्न आहे.

तरी मेहरबाना कडे विनंती की, त्यांना कोणत्याही प्रकारे सदर ट्रस्टच्या कारभारात हस्तक्षेप करण्यास प्रतिबंध करणेत यावा.

श्री. घुडूलाल हसनसो ा इनामदार यांची बायको फैरोजबी मुले फरदीन, व मलीक घुडुलाल इनामदार यांना घुडुलालच्या मृत्युने सुवर्ण संधी मिळाली आहे, त्यानीही विनासायास या जमिनीच्या ७/१२ सदरी आपली नांवे महसुल कर्मचारी तलाठी व सर्कल मंडल अधिकारी यांच्या संगमनमताने पैशाचा वापर करून लावुल घेतली आहे. त्यासाठी उपजिल्हाधिकारी प्रांतसो ा यांचेकडे रितसर अर्ज ट्रस्टी म्हणुन हसन महमंद अ.करीम इनामदार यांनी केली आहे. सदर फेरे ाजबी हिने महीला बाल कल्याण कड अर्ज करून घुडुलाल यांचे ७/१२ वरल नांव दाखवुन दुसरे ट्रस्टी म्हणुन माझ्ञी सम्मती न घेता बाल कल्याण कडुन तीन राहत्या खोल्या तिच्या वैयक्तीक कारण्यासाठी सील करवून घेतल्या आहेत. यामध्ये कोर्टाची दिशाभुल केली आहे.

याची रितसर माहिती आपणाकडे पाठविलेली आहे, महाशयाकडे विनंती की, श्री. आसीफ अ. रहेमान शेख यांच्या कारवाया थांबाव्यात म्हणुन योग्य दखल घ्यावी तसचे फैरोजबी व त्यांची मुले याच्या कारवाई लावण दुर करण्यास योग्यते आदेश घ्यावेत. हि विनंती.

प्रकरणांत जनाब हसन महमंद अब्दुल करीम इनामदार मिरज यांनी जनाब घुडुलाल हसन इनामदार (मयत) वारस श्रीमती फैरोजाबी भ्र. घुडूलाल इनामदार फरद्दीन, मलीक पिता घुडुलाल इनामदार यांचे विरूध्द आर.टी.एस. अपील नं. २७३/२०१३ अन्वये मिरज येथील मे. उपविभागीय अधिकारी सो/- यांचे न्यायालयात महाराष्ट्र लॅन्ड रेव्हेन्यु कोड कलम २४७ अन्वये सदर संस्थेच्या संबंधीत असलेली वक्फ मिळकतीत फेर क्र. ४७२७० अन्वये घेतलेली नोंद रद्द करण्यांत यावी असा विनंती.

प्रकरणांत दि. २५.०३.२०१३ रोजी रूपये ३००/- च्या स्टॅम्प पेपर क्र. जी.आर ६८५५९९ वर जनाब युसूफ बाबासाहेब मुल्ला, रा. मिरज, यांनी प्रतिज्ञापत्र देवुन असे निदर्शणांस आणून दिले की, मी सदर संस्थेची जमिन मागील ५० ते ६० वर्षापासुन विश्वस्ता कडुन खंडावर घेतलेली आहे. सदर संस्थेचे नविन विश्वस्तांची निवड झाल्यास मी सदर जमीन वक्फ संस्थेस परत देण्यास तयार आहेत.

प्रकरणांत विविध गैरअर्जदारं ानी वेळोवेळी सक्षम प्राधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल करण्यांत आलेली आहे त्याचे प्रति संचिकेत आहेत.

प्रकरणांत जनाब घुडूलाल हसन साहेब इनामदार (विश्वस्त) यांनी दि.०३.०६.२००९ रोजी पोलीस आयुक्त, कोल्हापुर, जिल्हाधिकारी सांगली, पोलीस अधिक्षक, सांगली यांना अर्ज करून जनाब हसन महमंद अ. करीम इनामदार यांच्या विरूध्द गं ुडगिरी, दमदाटी, दादागिरी व धमकी याचा बंदोबस्त होणे बाबत तक्रार अर्ज दिला आहे त्याची प्रत संचिकेत आहे प्रथम तपास अहवाल (FIR) क्र. ७७ ची प्रत ही जोडलेली आहे.

जनाब हसन महमंद इनामदार यांचा अर्ज दि. १२.०९.२००७ अन्वये तक्रार केल्याप्रमाणे जनाब घुडूलाल हसन, युसूफ बाबासाहेब मुल्ला यांचे विरूध्द प्रकरणांत वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ५४(१) नुसार या कार्यालयाचे केस क्र. ५४/३२/२००७ मध्ये नोटीस क्र.

मरांवम/चौकशी/१६३२२/२००७ दि. ०५.१२.२००७ अन्वये नोटीस देवुन दि. २९.१२.२००७ रोजी सुनावणी ठेवण्यं ात आली होती प्रकरणांत अद्याप निर्णयही झालेला नाही.

ठराव क्रमांक २७:-

पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

विषय क्रमांक २८:-

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ व ४२ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश

संचिका क्र. ६९/२८/२०१५ व ४२/२९७/२०१२
व ४२/११५/२०२० व ४२/११९/२०२०

सय्यद बडे साहाब पापामिया जागिरदार
रा. कोठला ता.जि. अहमदनगर ----- अर्जदार

विरूध्द

सय्यद इलियास इसामोद्दीन पिरजादे व इतर २
रा. कोठला ता.जि. अहमदनगर ----- गैरअर्जदार

विरुध्द

सैय्यद निसार बडेसाब जहागिरदार
रा. कोठला ता. जि. अहमदनगर ----- गैरअर्जदार

प्रकरण - दर्गाह हजरत पिर बारा इमाम ट्रस्ट, कोठला, अहमदनगरच्या दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ व ४२ नुसार योजनेस मान्यता देणे बाबत.
नोंदणी क्र. MSBW//ADR/१३३/२००८ चॉरिटी कश्मिन रजि. B-११६ ADR

प्रारंभिक - (विवेचन)

दर्गाह हजरत पिर बारा इमाम ट्रस्ट, कोठला, अहमदनगर ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून त्याचा नोंदणी क्र. MSBW//ADR/१३३/२००८ असा आहे. सदर संस्थेच्या मिळकतीची नोंद वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यात आलेली आहे.

सदर संस्थेच्या हिताकरिता वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नूसार योजनेस मान्यता देण्याकरिता अर्जदार सय्यद बडे साहाब पापामिया जागिरदार, रा. कोठला ता.जि. अहमदनगर यांनी दिनांक ०५/०९/२०१२ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे अर्ज

सादर केलेला आहे. सदर अर्जामध्ये अर्जदाराने असे कथन केले आहे की ते वक्फ संस्थेच्या रोजचे रोज देखभाल व व्यवस्थपना करतात. वक्फ संस्थेच्या उज्जवल भविष्यासाठी व उत्तम देखभालीसाठी त्यांनी दाखल केलेली व्यवस्थापन समितीची प्रस्तावित योजना मान्य करावी असे त्यांनी नमुद केले आहे.

सदर संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या बदल अर्ज वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४२ अन्वये श्री. सय्यद निसार बडे साहेब रा. कोठला, अहमदनगर यांनी दि. ०३/०७/२०२० रोजी फेरफार अर्ज दाखल केलेला आहे.

सय्यद इलियाज इसामोद्दीन पिरजादे रा. कोठला, अहमदनगर यांनी नवीन दुसरा फेरफार अर्ज संचिका क्र. ४२/११९/२०२० दि. ०२/०७/२०२० रोजी सदर संस्थेच्या व्यवस्थापन समिती करिता दाखल केलेला आहे.

अर्जदारांनी सादर केलेल्या अर्जाची पडताळणी करण्यात आली आहे. सदर प्रकरणासंबंधीत सर्व कागदपत्राची पुर्तता अर्जदारांनी केली आहे.

सदर प्रकरण हे वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ६९ व ४२ अन्वये व्यवस्थापन समितीची एक प्रस्तावित योजना व दोन फेरफार अर्ज दाखल झाल्यामुळे योजना व फेरफार अर्ज मंजुर करण्यापुर्वी प्रादेशिक वक्फ अधिकारी, नाशिक विभाग नाशिक, यांच्या कडुन सदर संस्थेची चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्याकरिता या कार्यालयाचे पत्र जा.क्र. मरावम/चौकशी/२०२८/२०२० दि. ०७/०९/२०२० अन्वये पाठविण्यात आले व त्याच्या कडुन वरिल प्रकरणात व्यवस्थापकीय विश्वस्ताबाबत स्वंयस्पष्ट अहवाल व नविन विश्वस्त घेण्याचीरित या बाबत अहवाल मागविण्यात आला होता त्यानुसार प्रादेशिक वक्फ अधिकारी नाशिक यांनी त्यांचे पत्र जा.क्र. चौकशी/१२१/२०२० दि. ०५/१०/२०२० अन्वये अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालात त्यांनी असे नमुद केले आहे की दर्गाह हजरत पिर बारा इमाम ट्रस्ट, कोठला, अहमदनगरची व्यवस्थापन समिती व फेरफार मंजुरीबाबतचा अहवाल तसेच त्यांनी स्थळ पाहणी व चौकशी करिता दि. २२/०९/२०२० रोजी घटना ठिकाणी भेट दिलेली होती. चौकशी दरम्यान त्यांनी दोन्ही अर्जदारांची भेट घेऊन त्यांचे जवाब नोंदविले.

कलम ४२ चे अर्जदार सय्यद इलियाज इसामोद्दीन पिरजादे यांनी त्यांचे जवाबात असे कथन केले की, वरिल वक्फ संस्थेमध्ये पुर्वी ५ ट्रस्टी होते. वरिल पैकी ४ विश्वस्तांचा मृत्यु झालेला आहे आणि एक विश्वस्ताने राजीनामा दिलेला आहे. वरिल संस्थेचे देखरेख व दिवाबती ट्रस्टी नसताना दस्तगीर बडे साहाब जागीरदार व रफा सय्यद अली हे अनाधिकृत पणे वरिल संस्थेची सेवा करित आहे. संस्थेच्या मिळकतीमध्ये ब-याच लोकांनी अतिक्रमण केलेले आहे. धर्मादाय आयुक्त यांच्या कडुन मंजुर झालेल्या घटनेच्या परिच्छेद क्र. ०९ नुसार वक्फ बोर्डा कडुन संस्थेचे फेरफार मंजुर करणे योग्य होईल.

अर्जदार सय्यद निसार दस्तगीर बडे साहाब जागिरदार यांनी असा जवाब दिला की, वक्फ संस्थेच्या मंजुर घटना प्रमाणे नविन ट्रस्टी घेण्याची रित हि जुन्या कार्यरत विश्वस्तांस आहे. जुन्या विश्वस्ता पैकी सय्यद बडेसाहाब हे हयात असतांना दि. १४/०१/२०२० रोजी ठराव घेऊन नविन विश्वस्तांची निवड केली. व त्यानंतर माझे वडिल दि. ०२/०३/२०२० रोजी मृत्यु झ

ाल्याने आम्हाला नविन फेरफार दाखल करण्यास उशिर झाला. व संपुर्ण राज्यात लॉकडावुन मुळे आम्हाला वक्फ कार्यालयात येता आले नाही. व नंतर कार्यलय चालु झाल्यानंतर दि. ०३/०७/२०२० रोजी फेरफार अर्ज दाखल केला व त्यानंतर आमचे विरोधी सय्यद इलियास यांनी पण त्यांचा फेरफार अर्ज दाखल केला त्यानंतर आम्ही दि. ०२/०९/२०२० रोजी इलियाजचा अर्ज चुकीचा असल्यामुळे आक्षेप दाखल केले. विभागीय वक्फ अधिकारी यांनी घटने ठिकाणचा पंचनामा व जवाब दाखल केले आहे.

अर्जदार सय्यद दस्तगिर बडेसाहाब यांचा इलियास यांच्या फेर अर्जाला आक्षेप -

अर्जदार यांनी दि. ०३/०९/२०२० रोजी अर्ज देऊन असे म्हटले आहे की, वरिल संस्थेचा सर्व कार्यभार व व्यवस्थापन सय्यद बडेसाहाब यांच्याकडे होती. तसेच जुन्या ट्रस्टीने सरव्हायवींग ट्रस्टीने नविन ट्रस्टीची निवड करायची असते त्यानुसार बडेसाहाब हे दि. ०२/०३/२०२० रोजी मृत्यु झालेले आहे. त्यांनी त्यांच्या हयातीमध्ये नविन ट्रस्टीची निवड केलेली आहे. ते एकच जुन्या ट्रस्टी पैकी एकमेव ट्रस्टी हयात होते म्हणुन त्यांना नविन ट्रस्टी निवड करण्याचा अधिकार होता. त्यानुसार नविन फेरफार अर्ज दाखल केलेला आहे. आमच्या फेरला इलियास यांनी आक्षेप घेतला त्याला संस्थेमध्ये ट्रस्टी म्हणुन कधीही निवडलेले नाही तो आमच्या ट्रस्टचा भाडेकरु आहे व भाडेकरुस ट्रस्टच्या व्यवस्थापनात अस्ताक्षेप करण्याचा कोणताही अधिकार नाही हे वक्फ कायदयात स्पष्ट नमुद केलेले आहे सबब त्याचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

गैरअर्जदार यांचा युक्तीवाद -

अर्जदार यांनी दि. ०९/११/२०२१ रोजी लेखी युक्तीवादात असे कथन केले आहे की, त्यांचे वडिल बडेसाहाब यांनी दि. १५/०१/२०१५ रोजी योजना दाखल केली आहे. हरकतदाराने दि. २०/०२/२०१८ रोजी त्यास हरकत घेतलेली आहे. १९५४ साली संस्थेच्या नोंदणी नंतर एकुण ५ विश्वस्त नेमण्यात आले होते. त्यापैकी अर्जदार यांनी दि. ०७/११/२००८ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे कलम ७० अन्वये तक्रार दाखल केली. सदर प्रकरण नामंजुर करण्यात आलेले आहे. त्या विरुध्द वक्फ न्यायाधिकरणाकडे अर्ज दाखल केला. तो अर्ज देखील नामंजुर करण्यात आला त्या नंतर त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली सदर प्रकरण तेथे प्रलंबीत आहे. श्री. सय्यद बडेसाहाब हे बेकादेशीरपणे संस्थेचे कार्य करित होते त्यांनी संस्थेच्या उत्पन्नाचे अपहार केलेले आहे. वरिल सर्व परिस्थितीचा विचार करुन व त्यांचा अर्ज नामंजुर करण्यात यावा व इलियास यांचा अर्ज फेरबदल मंजुर करण्यात यावा.

ठराव क्रमांक २८:-

पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

विषय क्रमांक २९:-

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश

संचिका क्र. ६९/४४/२०१८

शेख मुजीबोद्दीन शेख शमशोद्दीन व इतर ११
रा. रांजनी ता. घंनसागवी, जि. जालना ----- अर्जदार

विरूध्द

तैसीफ अहमद सुल्तान अहमद इतर ३
रा. जालना, ता.जि. जालना ----- गैरअर्जदार

अहमद अनीस हामीद महेमुद
रा. जालना ता.जि. जालना ----हरकतदार

जहिरुद्दिन सैफुद्दिन फारुकी
रा. जालना, ता.जि. जालना ----हरकतदार

प्रकरण - दर्गाह हजरत जानुल्ला शाह व खानका मस्जिद जालनाच्या दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नुसार योजनेस मान्यता देणे बाबत.
नोंदणी क्र. MSBW/JLN/१०९/२०१२

प्रारंभिक - (विवेचन)

दर्गाह हजरत जानुल्ला शाह व खानका मस्जिद जालना ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून त्याचा नोंदणी क्र. MSBW JLN/१०९/२०१२ असा आहे. सदर संस्थेच्या मिळकतीची नोंद वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यात आलेली आहे.

सदर संस्थेच्या हिताकरिता वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नूसार योजनेस मान्यता देण्याकरिता अर्जादार शेख मुजीबोद्दीन शेख शमशोद्दीन व इतर ११, रा. रांजनी ता. घंनसागवी, जि. जालना यांनी दिनांक ०३/०१/२०१८ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जामध्ये अर्जदाराने असे कथन केले आहे की ते वक्फ संस्थेच्या रोजचे रोज देखभाल व व्यवस्थपना करतात, सुरुवाती पासुन सदर वक्फ संस्थेस कोणत्याही प्रकारची योजना नसल्याने त्यांनी सदरचा योजना अर्ज दाखल केलेला आहे. तसेच योजना मंजुरीला बराच कालावधी लागणार असल्याने तात्पुरत्या स्वरुपात ॲडहाक कमेटी नेमणूकी बाबत विनंती केलेली आहे.

अर्जदारांनी सादर केलेल्या अर्जाची पडताळणी करण्यात आली आहे. सदर प्रकरणासंबंधीत सर्व कागदपत्राची पुर्तता अर्जदारांनी केली आहे

सदर अर्जदाराचा योजना मंजुरीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर या कार्यालयाचे पत्र जा.क्र. १९८२/२०१८ दि. १९/०५/२०१८ अन्वये जिल्हा वक्फ अधिकारी जालना यांना पाठवुन त्याच्या कडुन वरिल प्रकरणात व्यवस्थापकीय विश्वस्ताबाबत स्वंयस्पष्ट अहवाल व नविन विश्वस्त

घेण्याचे रित या बाबत अहवाल मागविण्यात आला होता त्यानुसार जिल्हा वक्फ अधिकारी जालना यांनी त्यांचे पत्र जा.क्र. चौकशी/४०५/१८ दि. २५/०५/२०१८ अन्वये अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालात त्यांनी असे नमुद केले आहे की दर्गाह हजरत जानुल्ला शाह जालनाची व्यवस्थापन समितीबाबतचा अहवाल दि. ०५/०२/२०१३ रोजी सादर केलेला आहे सदरील प्रस्ताव प्रलंबीत आहे या बाबत कार्यवाही करण्यासाठी दि. २२/०५/२०१७ रोजी दुरुस्ती प्रस्ताव मान्यतासाठी विनंती केली आहे खूददाम कमेटीचे माजी चेअरमन मोहम्मद जियाओदीन यांनी नवीन खूददाम व्यवस्थापन समिती स्थापन संबंधी एक ठराव दि. ११/११/२०१२ रोजी आम सभा घेण्यात आली व दर्गाह परिसरातील लोकांनी आम सभेत आपले मत दर्शविले आहे तसेच नविन विश्वस्त घेण्याची रित बद्दल त्यांनी त्यांच्या अर्जात नमुद केलेले आहे. जिल्हा वक्फ अधिकारी जालना यांनी कलम ६९ अन्वये योजना मंजुर करण्या करिता दि. १८/१२/२०२०च्या दैनिक राजसमार्ट या वृत्तपत्रात जाहिरात देऊन याची एक प्रत वक्फ संस्थेच्या बोर्डावर डक्वि वण्यात येऊन त्याचा फोटो काढण्यात आलेला आहे तसेच त्यांनी सोबत पंचमाना व जाहिर नोटीसचे फोटो सादर केले आहे.

१. <u>हरकतदार - श्री.अहमद अनीस हामेद महेमुद यांचे हरकत -</u>

हरकतदार यांनी दि. ०३/०८/२०२१ रोजी हरकत अर्ज दाखल केलेला आहे त्यांनी त्यांच्या अर्जात असे नमुद केले आहे की सदर संस्थेचे खादीम म्हणुन मंडळाने नियुक्ती केलेले पेशइमाम व मोआजीम हे खिदमत कार्य करीत आहे. समितीची गठणन चौकशीची कोणतीही माहिती दिलेली नाही. जिल्हा वक्फ अधिकारी दि. २७/०१/२०२१ रोजी सादर केलेलार अहवाल बेकायदेशीर आहे. या वक्फ संस्थेवर अशा प्रकारचे समितीचे गठण योग्य नाही जे डॉ. जाकीर नाईक यांच्या विचार धाराचे आहे व ते सुफीसंताच्या विचार धाराच्या लोकांचे भावनेला ठेच पोहचत आहे. सबब सदर योजना मंजुरीला आमची हरकत आहे.

२. <u>हरकतदार - जहीरदयोदीन सैफीदयोदीन फारुकी यांचे हरकत -</u>

अर्जदार यांनी दि. २४/०६/२०१९ रोजी हरकत दाखल करुन असे नमुद कले आहे की ते सदर संस्थेचे खादीम व मुजावर आहे व दर्गाहची सेवा मुजावर या नात्याने आज पर्यंत करीत आहे अर्जदाराने दाखल केलेली योजना ही पुर्णत: खोटी व बनावट असुन ती फेटाळण्यात यावी. योजना दाखल केलेले अर्जदार हे जालना मध्ये राहत नाही व त्यांचा सदरील दर्गाह संबंधीत कोणताही संबंध नसुन ते लालसे पोटी व्यवस्थापनामध्ये येऊ पाहत आहे सबब व्यवस्थापन समिती योजनेचा अर्ज ना मंजुर करावा.

<u>अर्जदाराचा युक्तीवाद :-</u>

अर्जदाराने असे कथन केले आहे की या पूर्वी सदर संस्थेची कोणतीही योजना मंजूर झालेली नाही करिता त्यांनी नवीन योजना दाखल केलेली आहे ती मंजूर करण्यात यावी. तसेच हरकतदार जहीरोदीन सैफोदीन फारुकी हे पुर्वी सदर संस्थेमध्ये स्वच्छतेचे काम करत होते. ते संस्थेच्या कामात ढवळाढवळ करित होत म्हणुन त्यांना नोटीस दिली असता त्यांनी त्यांची चुक कुबुल केली होती व तसा त्यांनी माफीनामा लिहुन दिला होता परंतु त्यांनंतर देखील ते कोर्ट

कचे-याच्या केसमध्ये गुंतलेले होते व त्यांचे कट कारस्थान चालूच होते सबब त्यांनी आक्षेप दाखल केले आहे. तसेच इमाम व इतर लोकांनी मशीदीच्या नावावर लाखो रुपय लोंकांकडुन जमा केले होते त्यांसंबंधीत एकुण ३२ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. योजना मंजुर झाल्यानंतर त्यांचे काळेकर्तुत बाहेर काढण्यात येतील या भिती पोटी त्यांनी सदर आक्षेप दाखल केलेला आहे त्यांना आक्षेप दाखल करण्याचा कोणताही अधिकार नाही सबब त्यांचा आक्षेप अर्ज नामंजुर करण्यात यावा.

गैरअर्जदार श्री. तैसीफ अहमद सुल्तान अहमद यांची योजना बददल यूक्तीवाद -

दि. ०९/०८/२०१७ रोजी गैरअर्जदार यांनी अर्ज देऊन असे सांगितले आहे की, दर्गाह हजरत जानुल्ला शाह जालन्याची सेवा इनाम मिळकत सर्वे नं. २३२ मध्ये अनाधिकृतपणे के.जी.एन फंक्शन हॉल बांधण्यात आलेला आहे. सदरील हॉलचे भाडे अनाधिकृतपणे काही लोक वसुल करतात या बाबतची माहिती व उत्पन्नाची कोणतीही माहिती जिल्हा वक्फ अधिकारी जालना किंवा वक्फ मंडळ औरंगाबाद यांच्याकडे नाही. सदरील जागा दर्गाहची असुन यामध्ये गैरव्यवाहार चालु आहे आणि या फंक्शन हॉलची समिती मंजुर करण्यासाठी काही लोक कार्यवाही करीत आहे. तरी विनंती की सदरील जागेवर बांधलेले फंक्शन हॉल वक्फ मंडळाने आपल्या ताब्यात घेऊन याची देखरेख मंडळाकडु होऊन वरच्या मंजल्यावर जिल्हा वक्फ अधिकारी यांचे कार्यलयासाठी जागा उपलबंध करुन देणे योग्य होईल.

ठराव क्रमांक २९:-

पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

विषय क्रमांक ३०:-

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ व ४२ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश

संचिका क्र. ६९/१६६/२०२१ व ४२/३७०/२०१५

जफर खान जोरावर खान व इतर ११
रा. काजीपुरा गंगापुर, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद ----- अर्जदार

विरूध्द

मोहम्मद इम्रानूल्लाह सिद्दिकी
रा. मिल कॉनर जि. औरंगाबाद ----- गैरअर्जदार

वाहेद अली मुमताज अली -----तक्रारदार

प्रकरण - जामा मस्जिद, काजीपुर गंगापुर, जि.औरंगाबादच्या दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ व ४२ नुसार योजनेस मान्यता देणे बाबत.
नोंदणी क्र. MSBW/ABD/१४३/२००९

प्रारंभिक - (विवेचन)

जामा मस्जिद, काजीपुर गंगापुर, औरंगाबद ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून त्याचा नोंदणी क्र. MSBW/ABD/१४३/२००९ असा आहे. सदर संस्थेच्या मिळकतीची नोंद वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यात आलेली आहे.

सदर संस्थेच्या हिताकरिता वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नूसार सदर संस्थेच्या व्यवस्थापकीय समितीच्या प्रस्तावित योजनेस मान्यता देण्याकरिता अर्जदार जफर खान जोरावर खान व इतर ११, रा. काजीपुरा गंगापुर, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद यांनी दिनांक २२/०४/२०२१ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जामध्ये अर्जदाराने असे कथन केले आहे की ते वक्फ संस्थेच्या रोजचे रोज देखभाल व व्यवस्थपना करतात. वक्फ संस्थेच्या उज्जवल भविष्यासाठी व उत्तम देखभालीसाठी त्यांनी दाखल केलेली व्यवस्थापन समितीची प्रस्तावीत योजना मान्य करावी असे त्यांनी नमुद केले आहे. अर्जदार हे मुळ मुतवल्ली यांचे वारस तसेच नातु आहे व त्यांची योजना मंजुर करण्यास कोणाचीही हरकत नाही. संस्थेचे नमाजी नागरिकानी दि. २६/०३/२०२१ च्या आमसभेतील ठरावानुसार अर्जदाराची मुतवल्ली म्हणुन नियुक्तीला मान्यता दिलेली आहे. वक्फ संस्थेला कोणतीही योजना नसल्यामुळे सदरची योजना दाखल केलेली आहे.

सदर संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या बदल अर्ज वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४२ अन्वये श्री. मोहम्मद इम्रानूल्लह सिद्दिकी, रा. मिल कॉर्नर, जि.औरंगाबाद यांनी दि. २७/०५/२०१५ रोजी फेरफार अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदारांनी सादर केलेल्या अर्जाची पडताळणी करण्यात आली आहे. सदर प्रकरणासंबंधीत सर्व कागदपत्राची पुर्तता अर्जदारांनी केली आहे.

सदर प्रकरण हे वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ६९ व ४२ अन्वये व्यवस्थापन समितीची एक प्रस्तावीत योजना व फेरफार अर्ज दाखल झाल्यामुळे योजना व फेरफार अर्ज मंजुर करण्यापुर्वी दि. २२/०९/२०२१ च्या दैनिक नवभारत टाईम मध्ये कलम २१ अन्वये जाहिरनोटीस निर्गमित करण्यात आली होती तसेच या पत्राची एक पत्र वक्फ संस्थेच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आली होती. सय्यद मुसतकीम सय्यद कय्युम दि. ११/१०/२०२१ रोजी त्यांच्या अहवाला सह पंचनामा व वृत्तपत्राची एक प्रत दाखल केलेली आहे.

अर्जदाराचे जफर खान जोरावर खान यांचे म्हणणे -

सदर संस्थेच्या हिताकरिता वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नूसार सदर संस्थेच्या व्यवस्थापकीय समितीच्या प्रस्तावित योजनेस मान्यता देण्याकरिता अर्जदार जफर खान जोरावर खान व इतर ११, रा. काजीपुरा गंगापुर, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद यांनी दिनांक २२/०४/२०२१ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जामध्ये अर्जदाराने असे कथन केले आहे की ते वक्फ संस्थेच्या रोजचे रोज देखभाल व

व्यवस्थपना करतात. वक्फ संस्थेच्या उज्ज्वल भविष्यासाठी व उत्तम देखभालीसाठी त्यांनी दाखल केलेली व्यवस्थापन समितीची प्रस्तावीत योजना मान्य करावी असे त्यांनी नमुद केले आहे. अर्जदार हे मुळ मुतवल्ली यांचे वारस तसेच नातु आहे व त्यांची योजना मंजुर करण्यास कोणतेही हरकत नाही. संस्थेचे नमाजी नागरिकानी दि. २६/०३/२०२१ च्या आमसभेतील ठरावानुसार अर्जदाराची मुतवल्ली म्हणुन नियुक्तीला मान्यता दिलेली आहे. वक्फ संस्थेला कोणतीही योजना नसल्यामुळे सदरची योजना दाखल केलेली आहे. सबब योजनेला मान्यता देण्यात यावी हि विनंती.

हरकतदार इम्रानूल्लह यांची योजनेला हरकत-

दि. १२/०४/२०२१ रोजी योजनेला हरकत दाखल केले आहे. व असे नमुद केले आहे की, ते संस्थेचे वंशपंरपरागर मुतवल्ली आहे संस्थेचे व्यवस्थापन ते करतात. तसेच पेश इमाम, मॉजन यांचे पगार ते ब-याच दिवसापासुन करतात म्हणजे त्यांचे वडील दि. २४/१२/२००९ ला मृत्यु झाले तेव्हा पासुन ते वेळोवेळी देतात. न्यायालयाने त्यांच्या वडिलाला दावा क्र. ४२२/८९ मध्ये वंशपंरपरागत मुतवल्ली घोषित केले होते. त्या निकाला कोणीही आव्हान दिले नव्हते अर्जदाराने फेर दाखल केलेला आहे. तसेच नियम असा आहे की, जर वंशपरंपरागत रित असेल तर वक्फ मंडळाला व्यवस्थापन समितीची नेमणुक करता येत नाही. सबब योजनेचा अर्ज रद्द करावा व त्यांचा फेरफारचा अर्ज मंजुर करावा.

योजनेमध्ये तक्रारदार वाहेद अली मुमताज अली यांची हरकत-

दि. २४/०२/२०२२ रोजी हरकतदाराने असे कथन केले आहे की, योजने मान्यतासाठी दिलेला अर्ज बेकायदेशीर असुन चुकीची माहितीच्या आधारे दाखल केले आहे. मुळ इनामदार हे वंशपंरपरागत मुतवल्ली असतांना हेतूपूरस्सर सदरचा योजनेचा अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्ज मेनटेनेबल नसल्याने तो फेटाळण्यात यावा. तक्रारदार वंशपंरपरागत मुतवल्ली व इनामदार असताना व तो सेवा बजावत असतांना मस्जिद गंगापुरचे मॅनेजीग कमेटी तयार करुन दाखल केलेले योजनेस मान्यता मिळुन घेण्याचा अर्जदाराचा कट आहे. तक्रारदार मागील पाच वर्षापासुन दरवर्षी दिवाबत्ती पोटी पाच हजार प्रमाणे खालीद नहादी चाऊश यांच्याकडे रक्कम देत आहे. अशा परिस्थितीमध्ये योजना मंजुरीचा अर्ज फेटाळण्यात यावा.

ठराव क्रमांक ३०:-

पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

विषय क्रमांक ३१:-

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६३ तसेच ६९ अंतर्गत तसेच मा. उच्च न्यायालयाच्या CRA २२/२०१८ मधील आदेशानुसार झालेल्या सुनावणी नंतरचा आदेश

संचिका क्र. ६९/४४९/२०१५

सलीम अब्दुल कादर शेख
रा. पुणे, जि. पुणे ----- अर्जदार

विरूध्द

शरफोददीन शमशुददीन उर्फ रोशन दिलशान सरगूरू
रा. पुणे, जि. पुणे

----- हरकतदार

विरुध्द

अय्याज अब्दुल कादर शेख व इतर ५
रा.भवानीपेठ, जि. पुणे ----- अर्जदार

शरफोददीन शमशुददीन उर्फ रोशन दिलशान सरगूरू
रा. पुणे ता. जि. पुणे -----हरकदार

प्रकरण - अंगड शाह तकीया व आशुरखाना, भवानी पेठ, पुणे या वक्फ संस्थेच्या दैंनदिन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६३ नुसार मुतवल्ली घोषित करणे कलम ६९ नुसार योजनेस मान्यता देणे तसेच मा. उच्च न्यायालयांच्या सी.आर.ए. २२/२०१८ मधील आदेशानुसार झालेल्या सुनावणीनंतरच्या आदेश बाबत.
नोंदणी क्र.. MSBW/PUN/६७/२००८

प्रारंभिक (विवेचन) -

अंगड शाह तकीया व आशुरखाना, भवानी पेठ,पुणे ही संस्था मानीव नोंदणीकृत संस्था असून त्याचा वक्फ मंडळ,औरंगाबाद येथे नोंदणी क्र. MSBW/PUN/६७/२००८ असा आहे.

सदर संस्थेची पुर्वी धर्मदाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी होवुन त्यास नोंदणी क्रमांक बी-३५७ पुणे असा दिलेला आहे

सदर संस्थेच्या मिळकतीची नोंद वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३७ अन्वये वक्फ नोंद पुस्तक अनुसुची १ मध्ये घेण्यात आली आहे.

सदर संस्थेच्या दैनंदिन व्यवस्थापनासाठी व योग्य प्रशासनाकरिता अर्जदार सलीम अब्दुल कादर शेख रा. पुणे यानी दिनांक ३/७/२०१५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे योजना सादर केली आहे.
सदर वक्फ संस्थेच्या व्यवस्थापकीय विश्वस्तांमधील फेरबदल अर्ज प्रकरणी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ नुसार वक्फ मंडळाने दिनांक २७/२/२००९ रोजी निर्णय दिला असून त्यानुसार ॲड एच.आय.मुल्ला (फिट पर्सन) व शरफोद्दिन शमसोद्दिन ऊर्फ रोशन दिलशाहन यांना संस्थेचे विश्वस्त म्हणून घोषित केले होते. तसेच याच प्रकरणात श्री. अय्याज अब्दुल कादर शेख रा.भवानीपेठ, पूणे यांनी दि.०४/०५/२०१९ रोजी दुसरी योजना सादर केली आहे.

सदरील दोन्ही योजनांना शरफोद्दीन शमशूद्दीन ऊर्फ रोशन दिलशान सरगूरू यांनी हरकत घेतलेली आहे.

श्रीमती. खैरुन्निसा अब्दुल कादर व इतर यांनी कलम ६९ व ६४(८) वक्फ कलम १९९५ अन्वये मा. कार्यकारी अधिकारी यांच्यापुढे दर्गाह अंगडशाहा तकीया व आशुरखाना, पुणे या ट्रस्टचे मुतवल्ली म्हणुन पुर्ननियुक्तीसाठी अर्ज दिला होता. त्यात त्यांनी असे नमुद केले होते की ती वरील दर्गाची वंशपरंपरेने मुतवल्ली असुन सदर ट्रस्टच्या नोंदणीचे वेळीस धर्मादाय आयुक्त पुणे यांनी अर्जदाराचे नाव शेडयुल-१ मध्ये सदरील दर्गाचे एकमेव ट्रस्टी म्हणुन नोंदविण्यात आलेले आहे व वारसाची कार्यवाही वंशपरंपरेनुसार असल्याचे घोषित केले आहे. वरील प्रमाणे झालेल्या नोंदणी विरुध्द जॉईन्ट चॉरीटी कशिनर पुणे यांचे न्यायालयात अपील क्र. ५३/८९ दाखल करण्यात आले व सदरील अपील दि. १०/०१/१९९१ रोजी खारीज करण्यात आले. तसेच दोन्ही निकाल मा. जिल्हा न्यायाधिश पुणे यांनी एम.ए. नं. १८९/९१ मध्ये दिलेल्या सन १९९५ च्या निकालानुसार कायम करण्यात आले.

दि. २५/०३/२०१३ रोजी श्री. एन.डी. पठाण मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वरील प्रकरणात आदेश देऊन अर्जदार श्रीमती खैरुन्निासा अब्दुल कादर यांचा कलम ६३ व ६४(८) प्रमाणे दिलेला अर्ज मंजुर केला होता अर्जदार यांचा अंगड शाहा तकिया पुणे या वक्फ संस्थेचे वंशपरंपरागत मुतवल्ली म्हणुन पुर्ननियुक्ती करण्याचे आदेश पारित केले. तसेच प्रतीवादी नं.२ यांचा सदरील संस्थेशी कुठलाही संबंध नसल्याचे घोषित करण्यात आले होते. तसेच पारित केले होते अर्जदार यांने सदर संस्थेच्या व्यवस्थापनासाठी वक्फनामे प्रमाणे सविस्तर योजना दाखल करावी असा आदेश देण्यात आलेला होता.

<u>अर्जदार सलीम अब्दुल कादर शेख व अय्याज अब्दुल कादर यांचा युक्तीवाद -</u>

अर्जदारांनी त्याच्या अर्जात व युक्तीवादात असे नमुद केले आहे की ते जुन्या अभिलेखाप्रमाणे वंशपरंपरागत या वक्फ संस्थचे मुतवल्ली आहे ते संस्थाची देखभाल करतात तसेच mode of succession is hereditary अशी परंपरा आहे तसेच वक्फ संस्थेच्या मिळकती वाचवण्यासाठी व उत्तम व्यवस्थापन साठी अर्जदारांनी स्किमचा अर्ज दिलेला आहे तो मंजूर करावा तसेच नियमानुसार कोणत्याही व्यक्तीला त्या ठिकाणी हस्तक्षेप करणेचा अधिकार नाही सबब अर्जदाराचा स्किमचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

श्रीमती खैरुन्निसा अब्दुल कादर यांनी त्या सदर संस्थेच्या वंशपरंपरागत मूतवल्ली असल्याने त्यांना मूतवल्ली म्हणून घोषित करण्यासाठी घोषित करून ॲडव्होकेट एच.आय.मुल्ला व शेख शरफोद्दीन शमसोद्दीन यांचे विरूध्द प्रकरण क्रमांक ६३/१०/२००९ वक्फ मंडळामध्ये दाखल केले होते प्रकरणात दोन्ही पक्षकारांचे जबाब यूक्तीवाद होवून हे प्रकरण दिनांक २५.३.२०१३ रोजी अर्जदारांचे बाजूने निकाली काढण्यांत आलेले आहे. हे प्रकरण निकाली काढताना वक्फ मंडळाने अर्जदार श्रीमती. खैरून्निसा अब्दुल कादर यांना सदर संस्थेचे वंशपरंपरागत मुतवल्ली म्हणून पुर्तनियूक्त करण्यात आले. सदरचे आदेशात खैरुन्निसा अब्दुल कादर या वंशपरंपरागत मुतवल्ली असून जनाब शेख शरफोद्दीन शम्सुद्दीन उर्फ रोशन दिलशान सरगुरु यांचा सदर संस्थेचे मुतवल्ली पदाचा कोणताही संबंध नाही श्रीमती खैरुन्निसा यांनी सदर संस्थेच्या दैनांदिन कामासाठी योजना मान्यतेसाठी सादर करावी म्हणून

प्रस्ताव सादर करावा असा आदेश पारित करण्यांत आलेला आहे. वरील दोन्ही स्किम प्रस्ताव श्रीमती खैरुन्निसा अब्दुल कादर यांच्या मुलांनी दाखल केले असून नवीन मुतवल्ली घेण्याची रित वंशपरंपरागत असल्याचे दिनांक २५/३/२०१३ चे आदेशात नमुद केलेले आहे. खैरून्निसा अब्दुल कादर यांचे दिनांक १८/४/२०१३ रोजी निधन झाल्यामुळे त्यांचे वंशातील मुलांनी योजनेचे अर्ज सादर केलेले आहे. प्रकरण क्रमांक ६३/१०/२००९ मध्ये सदर संस्थेच्या नवीन विश्वस्त घेण्याची रित मध्ये वंशपरंपरागत असून त्याप्रमाणे योजनेचे अर्ज प्राप्त झालेले आहेत. तसेच त्यांनी असे नमुद केलेले आहे की नवीन विश्वस्त घेण्याची रित वंशपरंपरागत असून खैरुन्निसा अब्दुल कादर यांच्या मुलांनी दाखल केलेली योजनेचे प्रस्तावाच्या अनूषंगाने पूढील कार्यवाही करणे योग्य होईल.

सदरील आदेश पारित केल्यानंतर शरफोद्दीन शमशोद्दीन ऊर्फ रोशान दिलशान सरगुरु यांनी सदर आदेशास कोठेही आव्हान दिलेले नाही त्यानंतर दि. १८/०४/२०१३ रोजी अर्जदार श्रीमती. खैरुणन्निस अब्दुल कादर यांचे निधन झाले व त्यानंतर सदर वक्फ संस्थेच्या मुतवल्लीची जागा रिकामी झालेली आहे शरफोद्दीन शमशोद्दीन ऊर्फ रोशान दिलशाह सरगुरु यांनी महाराष्ट्र राज्य वक्फ प्राधिकार यांच्यापुढे दावा क्र. १९/२०१६ दाखल करुन विनंती केली की त्यांना सदर अगंड शाहा तकीया ट्रस्टचे मुतवल्ली/ट्रस्टी असल्याबाबत घोषित करण्यात यावे व सामनेवाले यांना सदर ट्रस्टच्या कार्यभारात ढवळाढवळ करु नये या करीता मनाई हुकुम देण्यात यावा करिता दावा दाखल केला होता परंतु न्यायालयाने त्यांची कोणतीही विनंती मान्य केलेली नाही व दावा त्यांच्या विरुध्द निकाली काढून टाकण्यात आलेला आहे.

सदरच्या आदेशा विरुध्द शरफोद्दीन शमशोद्दीन ऊर्फ रोशान दिलशाह सरगुरु यांनी मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठा पुढे सिव्हिल रिवीजन अर्ज क्र. २२२/२०१८ चा दाखल केला होता त्या अर्जात मा. उच्च न्यायालयाने वक्फ मंडळाला असे आदेशित केलेले आहे की शरफोद्दीन शमशोद्दीन ऊर्फ रोशान दिलशान सरगुरु यांचा मुतवल्लीपदासाठी दिलेला अर्ज गुणदोषावर निकाली काढावा तसेच वक्फ न्यायाधिकरणाने दिलेल्या निकालाचा कोणताही प्रभाव त्यांच्या आदेशावर असणार नाही.

शरफोद्दीन शमशोद्दीन ऊर्फ रोशान दिलशाह यांनी मा.उच्च न्यायालय औरंगाबाद येथे सीआरए क्रमांक २२२/२०१८ दाखल करून असे नमुद केले की, ते वंशपरंपरागत मुतवल्ली आहे. वक्फ न्यायाधिकरणापूढे वक्फ डिड चा अर्थ mode of succession च्या बाबतीत योग्यरित्या काढला गेला नाही तसेच न्यायाधिकरणाने असे स्पष्ट केले आहे की शरफोद्दीन यांचा वक्फ मंडळापूढे मुतवल्ली च्या अधिकाराचा अर्ज प्रंलंबित असल्याने अर्जदाराने न्यायधीकरणापूढे येणे उचित नाही.

या प्रकरणी उच्च न्यायालयात दाखल करण्यांत आलेल्या सीआरए-२२२/२०१८ प्रकरणी दिनांक १६/८/२०१९ च्या आदेशात उच्च न्यायालयाने असे कथन केले आहे की न्यायधिकरणापूढे दिलेला अर्ज मेंटेनेबल नसताना तसेच अर्जदाराने एकदा मुतवल्लीच्या अधिकारासाठी मंडळापूढे अर्ज दिलेला असतांना न्यायाधिकरण त्यात हस्तक्षेप करू इच्छित नाही तसेच वक्फ मंडळापूढे अर्जदाराने दिलेला अर्ज वक्फ मंडळ गूणदोषावर निकाली काढावा त्यात न्यायधिकरणाने अर्जदाराचा अर्ज रदद केला, त्याचा वक्फ मंडळाच्या निकालावर काहीही

परिणाम करणारा नाही तसेच उच्च न्यायालयाने मंडळाला आदेश दिले आहे की अर्जदाराने दिलेला मुतवल्ली बाबतच्या अधिकाराचा अर्ज ९ महिन्याच्या आंत गुणदोषावर निकाली काढावा. व न्यायाधिकरणाच्या निष्कर्षाचा कोणताही प्रभाव त्यावर नसावा.

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर वेळोवेळी दोन्ही पक्षकारांना व त्यांच्या वकीलानां सुनावणी करीता नोटीसा काढुन सुनावणी करिता बोलवण्यात आले व नंतर सुनावणी पुर्ण करण्यात आली.

दि. २१/०४/२०२२ रोजी या कार्यालयाचे पत्र जा.क्र. ६३०/३३१६/२०२२ अन्वये श्री. शरफोद्दीन शमशोद्दीन ऊर्फ रोशान दिलशाह सरगुरु यांना नोटीस काढुन असे कळविण्यात आले की आपण सदर अंगड शाह तकीया संस्थेचे मुतवल्ली असल्याबाबत सर्व प्रमाणित कागदपत्र हजर करावे. त्यानुसार दि. २७/०४/२०२२ रोजी श्री. शरफोद्दीन शमशोद्दीन ऊर्फ रोशान दिलशाह सरगुरु हे हजर राहुन त्यांनी काही कागदपत्र दाखल केले आहेत तथापि वरील दाखल केलेल्या सर्व कागदपत्रावरुन हे बोध होत नाही की ते अंगड शाहा तकीया या संस्थेचे मुतवल्ली आहे किंवा सरगुरु आहे. तसेच असल कागदपत्र (Authentic Document) सरगुरु असल्याबाबत दाखल केलेले नाही तसेच जे काही कागदपत्र दाखल केले आहे त्या वरुन श्री. शरफोद्दीन शमशोद्दीन ऊर्फ रोशान दिलशान सरगुरु असल्याबाबत स्पष्टता होत नाही.

श्रीमती खैरुन्निसा अब्दुल कादर यांनी त्या सदर संस्थेच्या वंशपरंपरागत मूतवल्ली असल्याने त्यांना मूतवल्ली म्हणून घोषित करण्यासाठी ॲडव्होकेट एच.आय.मुल्ला व शेख शरफोद्दीन शमसोद्दीन यांचे विरूध्द प्रकरण क्रमांक ६३/१०/२००९ वक्फ मंडळामध्ये दाखल केले होते प्रकरणात दोन्ही पक्षकारांचे जबाब यूक्तीवाद होवून हे प्रकरण दिनांक २५.३.२०१३ रोजी अर्जदारांचे बाजूने निकाली काढण्यांत आलेले आहे. हे प्रकरण निकाली काढताना वक्फ मंडळाने अर्जदार श्रीमती. खैरून्निसा अब्दुल कादर यांना सदर संस्थेचे वंशपरंपरागत मुतवल्ली म्हणून पुर्ननियुक्त करण्यात आले. सदरच्या आदेशात खैरुन्निसा अब्दुल कादर या वंशपरंपरागत मुतवल्ली असून जनाब शेख शरफोद्दीन यांचा सदर संस्थेचे मुतवल्ली पदाचा कोणताही संबंध नाही श्रीमती खैरुन्निसा यांनी सदर संस्थेच्या दैनांदिन कामासाठी योजना मान्यतेसाठी सादर करावी असा आदेश पारित करण्यांत आलेला आहे. वरील दोन्ही स्किम प्रस्ताव श्रीमती खैरुन्निसा अब्दुल कादर यांच्या मुलांनी दाखल केले असून नवीन मुतवल्ली घेण्याची रित वंशपरंपरागत असल्याचे दिनांक २५/३/२०१३ चे आदेशात नमुद केलेले आहे.खैरून्निसा अब्दुल कादर यांचे दिनांक १८/४/२०१३ रोजी निधन झाल्यामुळे त्यांचे वंशातील मुलांनी योजनेचे अर्ज सादर केलेले आहे. प्रकरण क्रमांक ६३/१०/२००९ मध्ये सदर संस्थेच्या नवीन विश्वस्त घेण्याची रित मध्ये वंशपरंपरागत असून त्याप्रमाणे योजनेचे अर्ज प्राप्त झालेले आहेत. तसेच त्यांनी असे नमुद केलेले आहे की नवीन विश्वस्त घेण्याची रित वंशपरंपरागत असून खैरुन्निसा अब्दुल कादर यांचे मुलांनी दाखल केलेली योजनेचे प्रस्तावाच्या अनूषंगाने पूढील कार्यवाही करणे योग्य होईल.

श्री. शेख शरफुद्दिन शम्सोद्दिन यांनी दि. १०/०५/२०२२ रोजी एक योजना दाखल केली आहे.

सुनावणी व संबंधीताचा युक्तीवाद -

प्रकरणात वेळोवेळी सुनावणी ठेवण्यात आली त्यावेळेस अर्जदार सलीम अब्दुल कादर शेख रा. पुणे. हे हजर होते तसेच हरकतदार श्री शरफोद्दीन शमशूद्दीन ऊर्फ रोशान दिलशा सरगूरू हे हजर होते.

ठराव क्रमांक ३१:-

पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

विषय क्रमांक ३२:-

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर
वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४० अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश

संचिका क्र. ४०/२९२/२०१२

हाजी अब्दुल रज्जाक हाजी अहमद छापरा, वय ६२
रा.अंधेरी वेस्ट,मुंबई ----- अर्जदार

विरूध्द

मोहंमद अली तैय्यब, वय सज्ञान.
भायखळा मुंबई-२७.व इतर २. ----- गैरअर्जदार

प्रकरण - जालीवाली मसजिद ॲड अरबी मदरसा अंधेरी वेस्ट,मुंबई च्या संस्थेच्या क्षेत्राची क्षेत्रफळ मोजणी व वक्फ संस्था घेषित करणे बाबत वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४० नुसार
नोंदणी क्र.. MSBW/MUM//२८५//२०१३

प्रारंभिक -

जालीवाली मसजिद अँड अरबी मदरसा अंधेरी वेस्ट, मुंबई ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून त्याचा नोंदणी क्र. MSBW/MUM//२८५//२०१३ असा आहे. सदरील संस्थेच्या मिळकतीची नोंद वक्फ अधिनियम १९५५ च्या कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यांत आलेली आहे.

जालीवाली मसजिद अँड अरबी मदरसा अंधेरी वेस्ट, मुंबई च्या वक्फ संस्थेस संस्थेच्या क्षेत्राची क्षेत्रफळ मोजणी व वक्फ संस्था घोषित करणे बाबत वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४० नुसार अर्जदार हाजी अब्दुल रज्जाक हाजी अहमद छापरा, यांनी दिनांक ०४/१२/२०१२ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कडे अर्ज सादर केला होता.

प्रकरणात गैरअर्जदार क्र. मोहंमद अली तैय्यब, वय सज्ञान. रा. भायखळा मुंबई-२७.व इतर २. यांनी अर्जावर आक्षेप नोंदवल्याने अर्जदार व गैरअर्जदार यांना सुनावणी करिता या कार्यालयाचे पत्र क्रमांक मरावम/चौकशी/६२६७/२०२१ दिनांक २३/९/२०२१ रोजी पत्र पाठवून

दि. ०७/१०/२०२१ रोजी सुनावणी करिता कागदपत्रासह पाचारण करण्यात आले तसेच त्यांना लेखी म्हणणे सादर करण्याबाबत कळविण्यात आले.

सुनावणी व संबंधीताचा युक्तीवाद -

दि. ०२/०९/२०२१ रोजी प्रकरणात सुनावणी ठेवण्यात आली त्यावेळेस अर्जदाराकरिता ॲड निसार अहमद व ए.एन.शेख हजर होते तसेच ॲड ताहेर अली कादरी हे ॲड मुजतबा करिता हजर होते तसेच गैरअर्जदार मोहंमद अली हे हजर होते. सदरील प्रकरणात सर्व पक्षकार हजर होते त्यांचा अर्ज कलम ४० अन्वये होता. मंडळाने सर्व वकिलांचे म्हणणे एकूण घेतले या प्रकरणातील महत्वाचा मुद्या हा वक्फ संस्थेचा मिळकतीच्या क्षेत्रफळा बाबतचा आहे. कागदोपत्री कोणाताही दस्त नाही परंतु वकिल निसार खान यांनी सादर केले की मा.सर्वोच्च न्यायालयाचे एक सायटेशन आहे त्याचा क्रमांक अेआयआर १९७६ पान नंबर १५६९ पॅरा २ या न्यायालयाच्या न्यायनिर्णयात असे कथन केले आहे की, वक्फ मिळकत जी अनूसूचि १ मध्ये दाखवलेली नाही ती देखील क्षेत्रफळ म्हणून घेता येते. त्या उलट रेस्पॉंडट तर्फे वकिल आनंद भंडारी यांनी काही उच्च न्यायालयाचे सायटेशन दाखल केले व आक्षेप घेतला की तोंडी सांगणेवरून वक्फ ची मिळकत वर्ग होत नाही व हरकत घेतली की बाकीची मिळकत वक्फ मिळकत म्हणून धरू नये सबब सदरील मिळकतीची अनूसूचि १ मध्ये नोंद होवू शकत नाही. वक्फ मंडळाने ३ सदस्यांची कमेटी नेमलेली आहे त्यांनी सदर वक्फ संस्थेच्या जागेचे इन्स्पेक्शन करावे तसेच वक्फ मिळकतीचे मोजमाप करावे. तसेच दिनांक २१-१०-२०२१ पूर्वी अहवाल सादर करावा अशा सुचना या सदस्यांना दिल्या आहे.

अर्जदार हाजी अब्दूल रज्जाक हाजी अहमद छापरा रा. मुंबई यांचा युक्तीवाद -

अर्जदारांनी त्यांच्या कलम ४० वक्फ अधिनियम १९९५ नूसार दिलेल्या अर्जात व युक्तीवादात असे नमुद केले आहे की जालीवाली मसजिद व मदरसा ही वक्फ संस्था तिच्या परिसरातील क्षेत्राफळसह म्हणून घोषित करावे. सदरची मशीद ही अंधेरी वेस्ट मुंबई येथे असून त्याचा सीटीएस. नंबर १७७ असा असून त्याचे क्षेत्र ७२८.७९ स्के.मिटर ऐवढे आहे. तसेच अर्जदाराचे ॲड निसार अहमद यांनी कथन केले की वक्फ मिळकती सीटीएस नंबर १७७ चे क्षेत्र १२०१.३ स्के.मिटर ऐवढे आहे परंतु सदरची मसजिद ही ७२८.७९स्के.मिटर इतके आहे. सदरची मिळकत मसजिद म्हणून सूमारे ६० वर्षापासून वापरात आहे .५ वेळेस तेथे नमाज होत असते सध्याचे अर्जदार हे संस्थाचे व्यवस्थापन पाहात असतात वक्फ संस्थेचे बँकेत खाते आहे. पेशइमाम व बांगी चे पगार अर्जदार करतो तसेच दूसरे किरकोल व मेंटेनन्स हे देखीरल अर्जदार करतो. वजूखाना,तहारतखाना, टॉयलेट बलॉक,आरसीसी,वॉटर टँक व पंपरुम तसेच लाडडस्पीकर कार्पेट हे मशीदीत ठेवले आहे. वरील सर्व कामे हे अर्जदाराने केलेले आहे. वक्फ मिळकत ही धार्मीक कामासाठी उपयोगात येते.

गैरअर्जदार यांचा यूक्तीवाद

गैरअर्जदार यांनी असे कथन केले आहे की वक्फ मिळकत ही त्यांची खासगी मिळकत आहे.तसेच अर्जदाराने कथन केलेले मुददे खोटे आहेत . गैरअर्जदार नंबर २ यांनी असे कथन

केले आहे की जर वक्फ मिळकतीचे कागदपत्र असेल तरच वक्फ मिळकत होवू शकते तसेच मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कोणत्याही प्रकारे अर्जदार यांच्या अर्जात आदेश करण्याचा किंवा ढवळाढवळ करणेचा अधिकार नाही . त्यांनी कथन केले आहे की एकदा की मसजिद किंवा कब्रस्तान अस्तित्वात आले तर मालकत्वच आपोआप रदद होतो ही केस वक्फ-अल - औलाद अशी नाही सबब अर्जदाराचा अर्ज नामंजूर करावा.

वरील सर्व बाबीचा व कागदोपत्राचा विचार करता श्री एन.डी पठाण तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी दिनांक ४.१२.२०१३ रोजी असे निष्कर्ष नोंदविले होते की, रेकॉर्ड अभिलेख वरील कागदपत्राच्या आधारे हे सिध्द होते की, ती जागा मसजिद ची आहे व त्याठिकाणी ५ वेळेस नमाज पठण होत आहे तसेच ज्या जागी मशीद बांधलेली आहे ती जागा तय्यब अबूबकर लतीफ यांच्या मालकीची होती. गैरअर्जदार मोहंमद अली व ताहेर अली हे दोन मुले श्री तय्यब अबूबकर लतीफची आहे. तसे त्यांनी हे कबूल केले आहे की तेथे मसजिद होती व ५ वेळेची नमाज होत होती. सबब मसजिद असल्यामुळे ते पहिल्यापासून वक्फ आहे त्यामुळे त्यास पून्हा वक्फ म्हणून घोषित करणची आवश्यकता नसलेने अर्जदाराचा कलम ४० अन्वये दाखाल केलेला अर्ज तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी रदद केलेला होता तसेच मसजिद ही वक्फ मिळकत असल्यामुळे ताबडतोब नोंदणी करणेचे आदेश दिनांक ४.१.२०१३ रोजी देण्यात आले होते. सदरील तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दिनांक ४.१.२०१३ च्या आदेशाला नाराजगी दर्शवून अर्जदार हाजी अब्दूल रज्जाक छापरा रा.अंधेरी यांनी न्यायाधिकरणापूढे वक्फ अपील क्रमांक १/१३ दिनांक २२.१.२०१३ रोजी दाखल केले. सदरच्या अपीला मध्ये मा.न्यायधिकरणाने अर्जदार यांचे अपील दिनांक ३१.१०.२०१५ रोजी फेटाळले, सदरील आदेशाला अर्जदार यांनी उच्च न्यायालय औरंगाबाद येथे अपील दाखल केले त्याचा क्रमांक सीआए २५६/२०१५ असा आहे त्यामध्ये माननीय न्यायालयाने सदर प्रकरण वक्फ मंडळाकडे पाठवून असे कथन केले की मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वक्फ मिळकतीची शहनिशा व खात्री करावी तसेच वक्फ संस्थेच्या मिळकतीच्या क्षेत्राची शहनिशा करावी. क्षेत्राची प्रत्यक्ष पाहणी करताना फक्त मशीद बांधली केवळ तीच जागा विचारात न घेता इतर जागा जी मशीदीच्या सुविधेसाठी बांधलेली आहे ती देखील विचारात घ्यावी असे आदेश दिलेले आहे.

ठराव क्रमांक ३२:-

पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

विषय क्रमांक ३३:-

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर
वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश

संचिका क्र. ६९/३१७/२०१६

अय्याज इलियास नाईकवाडी व इतर
रा.मिरज ता.मिरज जि.सांगली — अर्जदार

विरूध्द

महेबुब अली मोहम्मद गौस मणेर
रा.मिरज ता.मिरज जि.सांगली
हरकतदार

मुबारक बुरहानोद्दीन खतीब
रा.मिरज.ता.मिरज जि.सांगली अर्जदार

विरुध्द

अय्याज ईल्यास नायकवाडी व इतर
रा.मिरज ता.मिरज जि.सांगली हरकतदार

साहेबपाशा अब्दूल कादर काजी (इनामदार)
हरकतदार

प्रकरण - निमजगा माळ इदगाह.मिरज.ता.मिरज जि,सांगली या संस्थेच्या दैनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नुसार योजनेस मान्यता देणे बाबत. नोंदणी क्र.. MSBW/SGL/३१/२००८

प्रारंभिक - (विवेचन)

निमजगा माळ इदगाह, मिरज ता. मिरज जि. सांगली ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून तिचा नोंदणी क्र. MSBW/SGL/३१/२००८ असा आहे.

सदर संस्थेची नोंद धर्मादाय आयूक्त यांच्याकडे झालेली असून त्याचा नोंदणी क्रमांक B-१३३ Sangli Dt.३१-३-१९५४ असा आहे.

निमजगा माळ इदगाह, मिरज, ता. मिरज जि. सांगली सदर संस्थेच्या मिळकतीची नोंद वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यात आलेली आहे.

सदर संस्थेच्या दैनंदिन व्यवस्थापनासाठी व योग्य प्रशासनाकरिता अय्याज इलियास नाईकवाडी व इतर रा.मिरज ता.मिरज जि.सांगली अर्जदार, यानी दिनांक २९-७-२०१६ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कडे योजना सादर केली आहे. व असे कथन केले आहे की, वरील संस्था ही वक्फ मंडळात नोंदणीकृत संस्था असुन वशंपरंपरेने जरी खतीबीचा दावा असला तरी मुतवल्ली. इमाम म्हणून आज ही गौस मोहंमद आबासाहेब खतीब यांचेच नांव आहे व ते मयत आहे. त्यांच्या जागी नियूक्ती बाकी आहे त्यांच्या जागी मुलाची नोंद झाली नाही त्यामुळे मयत खतीबचे नातु सिकंदर बूऱ्हानोददीन स्वत: यांचे म्हणणे किंवा प्रस्ताव देण्याचा वा स्विकारण्याचा कोणताच अधिकार नाही, त्यामुळे सिकंदर खतीब यांनी सादर केलेला प्रस्ताव चूकीचा व बेकायदेशीर आहे. खतीब यांच्या प्रस्तावात फक्त त्यांचे नातेवाईकांचाच समावेश आहे. त्यांनी प्रस्तावीत योजना मंजुरीसाठी या कार्यलयास अर्ज सादर केला आहे

दुसरा अर्ज श्री. मुबारक बुऱ्हानोद्दीन खतीब, रा.मिरज.ता.मिरज जि.सांगली यांनी दिनांक २.३.२०१९ दाखल केलेला असून त्यांनी संस्थेच्या दैनंदिन व्यवस्थापणासाठी व योग्य प्रशासनाकरिता , मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कडे योजना सादर केली आहे. व असे कथन केले आहे की अर्जदार हे सदर वक्फ संस्थेचे व्यवस्थापक असून रोजचे रोज ते संस्थेचे कार्य करतात. निमजगा माळ या संस्थेची धर्मादाय आयुक्त मध्ये मिळकतीची नोंद करण्यांत आलेली होती व त्या मध्ये महेबूबअली मोहंमद गौस मनेर गैरअर्जदार यांनी कथन केले आहे की ही मिळकत शाही इदगाहची आहे असे म्हणणे बेकायदेशीर आहे व बरोबर नाही. ईदगाहच्या नावाने नोंदणी केलेला ट्रस्ट फक्त कायदेशीर आहे व त्याचे अर्जदार हे वंशपरंपरागत आहे. अली आदिलशा यांनी ही मिळकत अर्जदाराचे पूर्वज यांना रोजच्या रोजच्या रोज होणाऱ्या कार्यासाठी व इदची नमाज व दोन्ही इदच्या नमाजच्या खूदबासाठी दिली होती.गैरअर्जदार यांना वंशपरंपरेने ट्रस्टामध्ये कोणताही अधिकार नाही.अर्जदाराने ॲडहॉक कमेटीसाठी गावातील लोकांच्या नातेवाईक यांच्या सल्लयाने स्किम दाखल केलेली आहे.

सदर प्रकरणासंबंधी अर्जदार यांनी सर्व कागदपत्राची पुर्तता केली आहे अर्जदारांने सादर केलेल्या योजना अर्जाची व प्रस्तावीत योजनेची पडताळणी करण्यात आली आहे.

<u>अर्जदार अय्याज इलियास नाईकवाडी व इतर रा.मिरज ता.मिरज जि.सांगली यांचा युक्तीवाद :-</u>

अर्जदाराने असे कथन केले आहे की, वरील संस्था ही वक्फ मंडळात नोंदणीकृत संस्था असुन वशंपरंपरेने जरी खतीबीचा दावा असला तरी मुतवल्ली. इमाम म्हणून आज ही गौसमोहंमद आबासाहेब खतीब यांचेच नांव आहे व ते मयत आहे. त्यांच्या जागी नियूक्ती बासकी आहे त्यांच्या जागी मुलाची नोंद झाली नाही त्यामुळे मयत खतीब चे नातु सिकंदर बूऱ्हानोददीन स्वत:चे म्हणणे किंवा प्रस्ताव देण्याचा वा स्विकारण्याचा कोणताच अधिकार नाही त्यामुळे सिकंदर खतीब यांनी सादर केलेला प्रस्ताव चूकीचा व बेकायदेशीर आहे खतीब यांचे प्रस्तावात फक्त त्यांचे नातेवाईकाचाच समावेश आहे. त्यांनी प्रस्तावीत योजना मंजुरीसाठी या कार्यलयास अर्ज सादर केला आहे.

<u>गैरअर्जदार श्री.महेबूबअली महंमद गौस मणेर रा.मिरज (हरकतदार यांचा युक्तीवाद) -</u>

हरकतदार यांनी दिनांक ३०.७.२०१६ रोजी हरकत देवून असे कथन केले आहे की चूकीच्या माहितीच्या आधारे अर्जदाराने स्किम योजना दाखल केली आहे तसेच महत्वाच्या बाबी वक्फ मंडळापासून लपवलेल्या आहे. हरकतदार सध्या मुतवल्ली आहे बुऱ्हानोद्दीन यांनी कोणतेही अधिकार नसतांना मिळभ्कत हडप करण्याच्या उद्येशाने निमजगा माळ ईदगाह मिरज च्या नावाने नोंदणी क्रमांक एमएसबीडब्ल्यू/३१/२००८ अन्वये नोंदणी केली आहे. ईदगाह ही आर.एस.नंबर ९६३/१/अ या जागेवर आहे व ही जागा शाही इदगाह मिरज या संस्थेची आहे. शाही इदगाह व निमजगा हे दोन वेगळे वक्फ संस्था आहे तसेच आर.एस. नंबर ९६३/१/१७ ही निमजगा या संस्थेची मिळकत नाही. बुऱ्हानोददीन यांनी चुकीचे आधारे कथन केले की ते निमजगा माळ या संस्थेचे मुतवल्ली आहे. शाही इदगाह च्या अर्जावर वक्फ मंडळाच्या दिनांक १.१०.२०१४ च्या आदेशान्वये मिळकत क्रमांक आर.एस.९६३/१/अ ही निमजगा माळ इदगाह

मिरज च्या लेख्ययातुन कमी करण्यांत आले. बून्हानोद्यीन यांनी मिळकत क्र.९६३/१/अ हडप करणेकरिता चूकीचा फेरफार मंडळात दाखल केला आहे. तसेच हरकतदारांनी विनंती केली आहे की. स्किम. फेरफार व व्यवस्थापन समिती नेमणूकी बाबत निमजगा माळ इदगा सुनावणी शिवाय मंजूर करू नये.

दूसरे अर्जदार श्री मुबारक बुरहानोद्यीन खतीब यांचा युक्तीवाद -

अर्जदार यांनी दिनांक २.३.२०१९ रोजी योजना अर्ज दाखल केलेला असून त्यांनी संस्थेच्या दैनंदिन व्यवस्थापनासाठी व योग्य प्रशासनाकरिता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कडे योजना सादर केली आहे. व असे कथन केले आहे की

अर्जदार हे सदर वक्फ संस्थेचे व्यवस्थापक असून रोजचे संस्थेचे कार्य ते करतात. निमजगा माळ या संस्थेची धर्मादाय आयुक्त मध्ये मिळकतीची नोंद करण्यांत आलेली होती व त्या मध्ये महेबूबअली मोहंमद गौस मनेर गैरअर्जदार यांनी कथन केले आहे की ही मिळकत शाही इदगाहची आहे ते म्हण्णे बेकायदेयशीर आहे व बरोबर नाही. ईदगाहच्या नावाने नोंदणी केलेला ट्रस्ट फक्त कायदेशीर आहे व त्याचे अर्जदार हे वंशपरंपरागत आहे.अली आदिलशा यांनी ही मिळकत अर्जदाराचे पूर्वज यांना रोजच्या रोजच्या कार्यासाठी व इदची नमाज व दोन्ही इदच्या नमाजच्या खूदबासाठी दिली होती.गैरअर्जदार यांना वंशपरंपरेने ट्रस्ट मध्ये कोणतीही अधिकार नाही.अर्जदाराने ॲडहॉक कमेटीसाठी गावातील लोकांच्या नातेवाईक यांच्या सल्लयाने स्किम दाखल केलेली आहे.

अय्याज ईल्यास नायकवाडी व इतर हरकतदार -

हरकतदार यांनी असे कथन केले आहे की सदरील वक्फ संस्थेस मागील सूमारे १० वर्षापासून मॅनेजिंग व्यवस्थापकीय समिती नाही. बून्हानोददीन खतीब व त्यांचे लोक इदगाह ची व्यवस्था पाहात नाही तसेच त्यांच्याकडे इदगा संस्थेचे जमा ,खर्च नाही. वक्फ मंडळाने खतीब यांना कोणात्याही प्रकारची नियूक्ती दिलेली नाही तसेचू त्यांने अर्ज त्याचा मुलगा जावई भावाचा मुलगा ,बहिणीची मुलगा तसेच नातु यांच्यासह केलेला आहे हे वंशपरंपरागत होवू शकत नाही. तसेच मैनोद्यीन शमसोद्यीन बागवान हा देखील अर्जदार आहे परंतु त्याच्या विरूध्द मिरज पोलीस स्टेशनला फौजदारी केस असल्याने तो लायक नाही तसेच अर्जदार मुबारक खतीब व साथीदार यांनी गुंड प्रवृत्तीच्या लोकांबरोबर हात मिळवणी करून वक्फ ची मिळकत हडप करण्याचा त्यांचा उद्येश आहे तसेच न्यायालयात प्रकारणे प्रलंबबित असून देखील अर्जदार मिळकत हडप करण्यासाठी प्रयत्न करीत आहे तसेच अर्जदाराने गावांतील मुसल्लीयान ची सम्मती न घेता अजर्ह दाखल केला आहे सबब ॲडहॉक कमिटी बनवू नये तसेच बुन्हानोदीन खतीब व मैनोद्यीन बागवान यांच्या स्किमला हरकतदाराचे म्हणणे ऐकल्याशिवाय मंजूरी देवू नये.

साहेबपाशा अब्दूल कादर काजी (इनामदार) हरकतदार:

हरकतदार यांनी दिनांक ९.१२.२०२० रोजी हरकत द ाखल करून असे कथन केले आहे की निमजगा माळ इदगाह संबंधी स्किम अजर्ह नामंजूर करावे शाही इदगाहची सर्व मालमत्ता व आर्थीक व्यवहार मंडळाने ताब्यात घ्यावी व कोर्ट रिसीव्हर नेमावा.

सुनावणी व संबंधीताचा युक्तीवाद -

दि. ०२/०९/२०२१ रोजी प्रकरणात सुनावणी ठेवण्यात आली, त्यावेळेस हरकतदार महेबूबअली करिता ॲड.शारिक अहमद हजर होते तसेच अर्जदार इलियास करिता ॲड वसीम हे हजर होते.

ठराव क्रमांक ३३:-

पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

विषय क्रमांक ३४:-

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर
वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४० अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश

संचिका क्र. ४०/०६/२००७

झाकीर हुसेन अब्दूल जब्बार शेख व इतर १०
वय ३६ धंदा व्यवसाय रा. कल्याण ----- अर्जदार

विरुध्द

महेबूब फत्तुभाई खान व इतर ६
रा. कल्याण ----गैरअर्जदार

प्रकरण - मदरसा तालीमुल कूरआन मकबरा मोतबरखान शाही मकबरा पीर सादिक अली बाबा दर्गाह काला तलाव मकबरा कल्याण जि.ठाणे या संस्थेचे वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४० नुसार वक्फ संस्थेची मिळकत घोषित करणेबाबतचा अर्ज मंजुर करणे बाबत. नोंदणी क्रमांक. MSBW/THANE/०३/२००६

प्रारंभिक -

मदरसा तालीमुल कूरआन मकबरा मोतबरखान शाही मकबरा पीर सादिक अली बाबा दर्गाह काला तलाव मकबरा कल्याण जि.ठाणे ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून त्याचा नोंदणी क्र. MSBW/THANE/०३/२००६ असा आहे.

तसेच सदर संस्था ही धर्मादाय आयूक्त यांच्या कडे नोंदणी होवून त्यांस E-१६९३ Thane असा क्रमांक दिलेला आहे.तसेच बंदेनवाज मकबरा चॅरिटेबलन ट्रस्ट कल्याण या नावाने धर्मादाय आयूक्त यांच्याकडे सन १९६३ साली नोंदणी होवून E-१६९३Thane dated १६=१२=१९९६ असा नंबर पडलेला आहे.

सदर संस्थेच्या मिळकतीची नोंद वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यात आलेली आहे.

सदरचा अर्जदार झाकीर हूसेन अब्दूल जब्बार शेख रा. कल्याण यांनी कलम ४० अन्वये अर्ज दिलेला आहे त्यात त्यांनी त्यांचा अर्ज मंजूर करण्याबाबत विनंती केलेली आहे. सदर अर्जदार यांनी दिलेल्या अर्जावर गैरअर्जदार श्री. महेबूब फत्तु भाई खान यांनी हरकत घेतलेली आहे व म्हणणे सादर केलेले आहे.

सूनावणी :

अर्जदार झाकीर हूसेन करिता ॲड एस.एम.निजामी हजर होते तसेच सामनेवाले १ करिता ॲड जे.व्ही कादरी हजर होते . दोन्ही पक्षकार व वकिल हजर होते.

सामनेवाले च्या वकिलांनी यूक्तीवादाच्या नोटस दाखल केल्या .सामनेवाले वकिलांनी जादा म्हणणे दाखल करण्याची परवानगी मागितली दिनांक १५.९.२०२१ पर्यंत दाखल करण्यांचे आदेशित करण्यांत आले. सामनेवाले यांनी दिलेल्या म्हणणेची प्रत अर्जदाराला देण्यांत आली .

प्रकरण आदेशाकरिता ठेवण्यांत आले.

<u>अर्जदार झाकीर हूसेन अब्दूल जब्बार शेख यांचे म्हणणे-</u>

त्यांनी असे कथन केले आहे की वक्फ संस्थेचे एकूण क्षेत्रफळ ४४९७.२५ स्के.मिटर ही जागा चिकनघर ता.कल्याण येथे असून त्याचा सर्व्हे नंबर १०२ असा आहे तसेच दूसरी जागा मौजे कल्याण जि.ठाणे येथे स.नं.१२८/१ मकबरा मसजिद व दर्गाह सह आहे. तसेच त्यात इमारत वगैरे चे बांधकामासह उभी आहे . मालक भाडेकरू व नगरपालिका बरोबर सुल्हनामा दिनांक १.३.१९९३ चा दाखल आहे त्यात एकूण जमीन स.नं.१०१ व १०२ तसेच १२८/१व १२८/२ ही तीन भागात वाटप करण्यांत आलेली आहे. पार्ट बी ही वक्फ मिळकत आहे तसेच शासन परिपत्रकात दिनांक २१ एप्रिल १९९४ अन्वये त्यात नोंद घेण्यांत आलेली आहे तसेच ग्रीन बेल्ट व रेसिडेन्शीअल झोन असे म्हटले आहे. अर्जदार हे सर्व धार्मिक कार्य व नमाज मकबरा मसजिद येथे करतात सर्व अर्जदार हे प्रस्तुत वक्फमध्ये दाखवण्यांत आलेल्या मिळकतीतील इंटरेस्टेड परसन आहेत.अर्जदार व त्यांचे समवेत राहणाऱ्या झोपडपटटीवासियांची घरे पूर्वी स.नं.१२८/२ मध्ये होती. रिहॅबीलेटेशन स्कीमनूसार त्यांच्या ताब्यातील घराऐवजी अर्जदार व झोपडपटटीवासांठी दूसरीकडे घरे बांधून पर्यायी व्यवस्था करून देण्याची योजना निघाली तेव्हा जमिनीचे मुळमालक ॲन्ड्रयू जोसेफ कॅलासो व रहिवासी यांनी सदर योजनेनूसार नवीन कॅलनी बांधून झोपडपटटीवासीयांना तेथे मोफत फलॅटस दयावेत असे ठरविले त्यावेळेस सामनेवाले नंबर १ महेबूब फत्तुभाई खान यांनी स्वत: अर्जदार व इतर रहिवाशांच्या प्रतिनिधी असल्याचे भासवून आम्हास अंधारात ठेवून सन १९९३ मध्ये विकासक सागरमन जैन यांचे समवेत प्रथम करार तथा समझोता करार केला आणि महानगरपालिकेकडून ठराव मंजूर करून घेतला व कल्याण विकास आराखडयास मायनर मॉडीफीकेशन करून घेतले.तसे नोटीफीकेशन महाराष्ट्र राज्य पत्रात प्रसिध्द झाले . सामनेवाले यांचा वक्फशी काही एक हितसंबंध नाही मात्र त्यांनी अर्जदाराना व तेथील रहिवाशांना अंधारात ठेवून त्यांची संमती नसताना एकतर्फी वक्फची नोंदणी बेकायदेशीररित्या

केली वास्तविक पाहता महा.रिजीनली टी.पी.ॲक्ट १९६६ नुसार काढण्यांत आलेल्या दिनांक २१.४.१९९४ चे नोटीफिकेशन प्रमाणे मशिद मकबरा व दर्ग्याचा परिसर मिळून ४४९७-२५चौ.मी. इतर मिळकत उपरोक्त अर्जदाराचे वक्फची मिळकत होती व आहे तसे सरकारी व महापिलिकेकडचे आदेश आहेत मात्र सामनेवाला नंबर १ ते ६ यांनी गैरहेतूने व अर्जदारांचे वक्फ मिळकत गिळक़त करण्याच्या हेतूने वक्फ नोंदताना केवळ १५९० चौ.मि. इतके क्षेत्र वक्फचे आहे आणि तेवढेच नोंदवावे असे नमुद केले त्यामुळे वक्फच्या रेकॉर्डला पॅरा कॉलम १ मध्ये नमुद केलेले क्षेत्र ४४९७.२५ चौ.मि.वक्फची मिळकत म्हणून आपल्या रेकॉर्डला नोंदले न जाता केवळ १५९० चौ.मि.वक्फची मिळकत इतकेच क्षेत्र नोंदले गेले आहे.

अर्जदार हे मकबरा मसजिद आणि दर्गाची देखभाल करीत होते अर्जदार मुतवल्ली म्हणून वक्फ मिळकतीची देखाभाल करीत आहे. मशीदीचे व्यवस्थापन पहात आहे. मकबरा व दर्गाची व्यवस्था उदा दिवाबत्ती पाहणे, वार्षीक संदल व उरूस साजरे करणे हे कार्य करित असतात कारण अर्जदार हे तेथीलच रहिवासी आहेत आणि त्यांना वक्फची व्यवस्था पाहणेचा कायदेशीर अधिकार तेथील जनतेकडून प्राप्त झाला आहे. सामनेवाले १ ते ६ हे वक्फ परिसरातील रहिवासी नाहीत ते कधीही मशीद व दर्गास भेट देत नाही व व्यवस्था पहात नाही ते वक्फ संस्थेपासून ३ ते ४ कि.मी लांब अंतरावर राहातात.

वरील सर्व कारणास्तव वरील मिळकत १२८/१ १२८/२या पैकी एकत्रित मिळून गव्हर्नमेंट नोटीफिकेशन मध्ये बी-पार्ट म्हणून पीक्यूआरएस दर्शविलेली ४४४९.२५ चौ.मिटर यातील मशीद मकबरा दर्गा कॉलनी व यातील चाळीमधील रुम व खुली जागा ही संपूर्ण मिळकत अर्जदार यांचे वक्फची मिळकत म्हणून जाहीर करण्यांत यावी.

<u>सामनेवाले महेबूब फत्तुभाई खान यांचा युक्तीवाद :</u>

सामनेवाले यांनी सादर केले की दिनांक १६.२.१९३२ रोजी मिळकत श्री गजानन रामचंद्र पठारे यांनी ६ एकर जमीन विकत घेतली ती अहमदअली खानला विकली नंतर त्याचे वारस इकरामोद्दीन खान पीररजादे, मोहंमद अली अहमदअलीखान पिरजादे व अजीजुन्नीसा शेख ख्रूल्लाखान यांचे नांवे वर्ग केली त्यानी सेल डीड दिनांक १६.२.१९३२ हजर केले आहे. पूढे असे म्हटले आहे की अहमद अलीचे वारस यांनी दिनांक २५.६.१९५३ रोजी जोसेफ डोमिनीक कोलासो यांना विकली परंतु त्या जमीनीवर already शाही मसजिद मदरसा तालीमुल कूआर,कल्याण व झोपडपटटी कालातलाव होती. सेलडीड दिनांक २५.६.१९५३ ची प्रत त्यांनी दाखल केली आहे.

पूढे त्यांनी असे सांगितले आहे की जोसेफ डोमीनीक यांनी त्यांच्या जमीनीवरील झोपडपटटी काढणे करिता अतिक्रमण काढण्याकरिता केस दाखल केली व रेस्पांडंट नंबर १ यांनी शाही मसजिदचा एरिया वेगळा करून देणे करिता जे जोसेफ डोमिनिक यांच्या कब्जात आहे तसेच तो ती मशीदीच्या जमीनीचा उपयोग गाई म्हशी चारण्याकरिता करतो. तसेच जोसेफ यांनी न्यायालयाकडून ताबा बाबतीत हूकूमनामा घेतला की जे झोपडट्टीचे लोक त्याच्या जमीनीत राहतात ती झोपडपटटी ही demolish करावी व तसेच मशीद मकबरा दे,खील demolish करणेचा हूकूमनामा घेतला परंतु रेस्पॉडट १ यांनी कायदेशीर लढाई करून ताबा बददल आदेश रददबादल केल.

पूढे असे सांगितले की दिनांक १.३.१९९३ रोजी रेस्पांडट १ व जोसेफ व महानगरपालिका कल्याण यांचे Agreement झाले त्यात असे ठरले की वरील मिळकत चे A B C असे तीन हिस्से करण्यात येवून A हा हिस्सा जोसेफला ४४१७४.३९ स्के.मिटरचा दयावा. B हा हिस्सा रेस्पॉंडट नंबर १ ला ४४९७.७५ स्के.मिटर त्यात मसजिद मकबरा आहे. तसेच रेस्पांडट १ ला असे आदेशित करणेत आले की A मधून झोपडपटटी B मध्ये ४ महिन्यात वर्ग करावी व C हा भाग नगरपालिका कल्याणला देण्यांत आला त्याचे क्षेत्र ८२१९.७४ स्के.मिटर ऐवढे होते.

पूढे असे कथन केले की रेस्पॉंडट १ ची जबाबदाररी होती की त्याने B वर झोपडपटटीच्या लोकांसाठी बिल्डींग बांधावी व रेस्पॉ.१च्या विनंतीवरुन सागरमल जैन बिल्डर power of attorney of property holder यांनी B वर इमारत बांधली परंतु झोपडपटटीतील लोक पार्ट A मधून B मध्य जाण्यास तयार नव्हते कारण अर्जदार झाकीर हूसेन यांनी झ ोपडपटटीच्या लोकांना बळ दिल्यामुळे व त्यांना न जाण्यासाठी मानसिकता तयार केली त्यामुळे रेस्पांडट १ यांनी जोसेफ ला दिलेले Agreement केलेले पूर्ण होवू शकले नाही नंतर जोसेफ यांनी नोटीसा पाठवून सहमतीनूसार करारानूसार झोपडपटटीच्या लोकांना खाली करा नाही तर सुलहनामा रदद करण्यांत येईल असे सांगितले व त्यानुसार दिनांक १२.२.१९९७ रोजी नोटीस देवून सुलहनामा रदद केला. त्यानंतर रेस्पॉंडट १ यांनी जोसेफ कडून १५९०.८७ स्के.मिटर जागा घेतली त्यात वक्फ संस्थेचा नुकसान झाले त्यालाा कारण झाकीर हूसेन हा होता.

पूढे असे कथन केले की रेस्पॉंडट यांनी सन १९७६ साली मस्जीदने ताबा घेतला मकबराचा १९७७ साली व दर्गाह चा १९७८ साली ताबा जोसेफ कडून घेतला. न्यायालयीन लढाई केली व त्यासाठी स्वत:चे पैसे दिले. थोडक्यात रेस्पॉ.१ हा मसजिद मकबरा चा संस्थापक आहे. अर्जदार याने रे.१ ला मदत करणे ऐवजी त्यांना त्रास देण्यांचा प्रयत्न केला. वक्फ मिळकती बाबत तो सकारात्मक नव्हता तसेच त्याने रेस्पॉडंट १ विरूध्द केसेस केल्या अर्जदाराने कलम ३६, ४०, ६३ अन्वये अर्ज केले ते मा.मुख्य कार्यकारी अधिकारी औरंगाबाद यांनी फेटाळले.

तसेच असे कथन केले की मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक ६.१०.२००६ रोजी अर्जदार जाकीर याला पत्र देवून चंदा वसूल करू नये असे आदेश दिले परंतु त्याचे हे कृत्ये चालूच आहे त्यावर कार्यवाही व्हावी .

वरील सर्व कारणास्तव अर्जदार वक्फ संस्थाचा मिसयूज करून लग्न व पार्टी करिता भाडयाने देतो. कोविड मध्ये देखील लोकांना जमा करीत होता. रेस्पॉडंट १ ने सदरील कृत्याविरूध्द आवाज उठविला तर त्याला जिवे मारणयाची धमकी तसेच शिवीगाळ अर्जदाराने केली.अर्जदासराचा अर्जातील मजकूर खोटा आहे. अर्जदाराने बऱ्याच गोष्टी वक्फ मंडळापासून लपवलेले आहे सबब त्यांचा अर्ज रदद करण्यांत यावा.

ठराव क्रमांक ३४:-

श्री.जोसेफ कोलासो यांनी त्यांच्या वडील व त्यांच्य मालकीची ४४९७.७५ चौ.मि. जागा मस्जीद व मकबरासह या वक्फ संस्थेकडे दिलेली आहे व त्यांचा अधिकार त्यांनी सोडून दिलेला आहे. ही बाब स्पष्ट असल्याने वक्फ अधिनियम १९९५ च्य कलम

४० मधील अधिकाराचा वापर करुन मदरसा तालीमुल कूरआन मकबरा मोतबरखान शाही मकबरा पीर सादिक अली बाबा दर्गाह काला तलाव मकबरा कल्याण जि.ठाणे या संस्थेकडील संपुर्ण ४४९७.७५ चौ.मि. इतकी जागा वक्फ म्हणुन घोषीत करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

विषय क्रमांक ३५:-

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर
वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश
संचिका क्र. ६९/१३०/२०१० व ३२/४९/२०१४
व ६९/४९/२०१४ व ४२/४२/२०१० व ४२/५२४/२०१८ व ३१२/२०१८

जमशेद अली सय्यद व इतर
रा. माहिम जि. मुंबई ----- प्रथम योजना
अर्जदार

मोहम्मद रफीक मेमन व
मोहम्मद वसीम मुन्ना ----- व्दितीय योजना
अर्जदार
रा. माहिम जि. मुंबई

मोहम्मद नसीर शेख
रा. माहिम जि. मुंबई ------ तृतिय योजना
अर्जदार

सोहेल जुलफेकार कुरैशी व
हारुण इब्राहिम खलीफा व इतर ----- हरकतदार
रा. माहिम जि. मुंबई

मोहम्मद शोएब मुशताक अहमद खान ----- हरकतदार
रा. माहिम जि. मुंबई

प्रकरण - बाई फातीमा बिन्ते काझी अब्दुल करीम मस्जिद, कापड बाजार, केडल रोड, माहिम, मुंबई (बी-२२६) च्या दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नुसार योजनेस मान्यता देणे बाबत.
नोंदणी क्र. MSBW/MUM/५९/२००८ मुबंई सार्वजनिक ट्रस्ट कलम १९५०अन्वये नोदंणी क्र. B-२२६ Mumbai

प्रारंभिक (विवेचन) -

बाई फातीमा बिन्ते काझी अब्दुल करीम मस्जिद, कापड बाजार, केडल रोड, माहिम, मुंबई (बी-२२६) ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून तीचा नोंदणी क्र. MSBW/MUM/५९/२००८ असा आहे.

प्रथम योजना अर्जदार-

सदर संस्थेच्या हिताकरिता वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नूसार योजनेस मान्यता देण्याकरिता अर्जदार जमशेद अली सय्यद व इतर, रा. माहिम जि. मुंबई यांनी दिनांक ०६/०२/२०१० रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जामध्ये अर्जदाराने असे कथन केले आहे की, या संस्थेची योजना उच्च न्यायालयाच्या दि. ०६/०६/१९१३ च्या आदेशानुसार ट्रस्ट डीड तयार करण्यात आलेली आहे. ते वक्फ संस्थेच्या रोजचे रोज देखभाल व व्यवस्थपन करतात. ते सदरील वक्फ संस्थेमध्ये हितसंबंध असणारी व्यक्ती असुन तेथे नमाज पडणे सर्व प्रकारचे धार्मीक कार्य करणे दरुद पडणे इत्यादी कामे करतात. वक्फ संस्थेच्या उज्जवल भविष्यासाठी व उत्तम देखभालीसाठी त्यांनी दाखल केलेली व्यवस्थापन समितीची प्रस्तावित योजना मान्य करावी असे त्यांनी नमुद केले आहे.

व्दितीय योजना अर्जदार-

सदर संस्थेच्या हिताकरिता वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नूसार योजनेस मान्यता देण्याकरिता अर्जदार मोहम्मद रफीक मेमन व मोहम्मद वसीम मुन्ना, रा. माहिम जि. मुंबई यांनी दि. २५/०३/२००८ रोजी डीम रजिस्टेशन सोबत योजना दाखल केलेली होती तसेच त्यांनी दिनांक २४/०१/२०१४ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जामध्ये अर्जदाराने असे कथन केले आहे की ते वक्फ संस्थेच्या रोजचे रोज देखभाल व व्यवस्थपन करतात. ते सदरील वक्फ संस्थेमध्ये हितसंबंध असणारी व्यक्ती असुन तेथे नमाज पडणे सर्व प्रकारचे धार्मीक कार्य करणे दरुद पडणे इत्यादी कामे करतात. वक्फ संस्थेच्या उज्जवल भविष्यासाठी व उत्तम देखभालीसाठी त्यांनी दाखल केलेली व्यवस्थापन समितीची प्रस्तावित योजना मान्य करावी असे त्यांनी नमुद केले आहे.

तृतिय योजना अर्जदार-

सदर संस्थेच्या हिताकरिता वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नूसार योजनेस मान्यता देण्याकरिता अर्जदार मोहम्मद नसीर शेख रा. माहिम जि. मुंबई यांनी दिनांक २८/०४/२०१४ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जामध्ये अर्जदाराने असे कथन केले आहे की ते वक्फ संस्थेच्या रोजचे रोज देखभाल व व्यवस्थपन करतात. ते सदरील वक्फ संस्थेमध्ये हितसंबंध असणारी व्यक्ती असुन तेथे नमाज पडणे सर्व प्रकारचे धार्मीक कार्य करणे दरुद पडणे इत्यादी कामे करतात. वक्फ संस्थेच्या उज्जवल भविष्यासाठी व उत्तम देखभालीसाठी त्यांनी दाखल केलेली व्यवस्थापन समितीची प्रस्तावित योजना मान्य करावी असे त्यांनी नमुद केले आहे.

त्यानुसार जाहिर प्रगटन पारित करण्याकरीता दि. २९/०४/२०१४ रोजी जाहिर नोटीस काढण्यात आली व त्यामध्ये असे नमुद करण्यात आले वरिल व्यवस्थापनासंबंधी कोणाची काही तक्रार असल्यास त्यांनी ही नोटीस मिळाल्यापासुन १५ दिवसाच्या आत आपले म्हणणे/आक्षेप दाखल करावे सदरची नोटीस दि. ३०/०४/२०१४ रोजीच्या दैनिक नवभारत या

वृत्तपत्रात देण्यात आली तसेच जिल्हा/विभागीय वक्फ अधिकारी यांनी पंचनामा व वृत्तपत्राची एक प्रत व अहवाल या कार्यालयास त्यांचे दि. ०५/०६/२०१४ च्या पत्रान्वये सादर केला आहे.

जमशेद अली सय्यद यांचा इतर अर्जदारांचा लेखी जवाब-

दि. १५/०९/२०२१ रोजी जमशेद अली यांनी अर्ज देवुन असे कथन केले आहे की, त्यांना बदल अर्ज मान्य करुन संस्थेवर घेण्यात आले आहे. या वक्फ संस्थेच्या घटनेनुसार इतर अर्जदाराना संस्थेसाठी योजना तयार करण्याचे व मुतवल्ली नियुक्त करण्याचे अधिकार नाही म्हणुन इतर अर्जदाराने दाखल केले इतर अर्ज रद्द करण्यात यावा. अर्जदाराचा अर्ज संस्थेची शांतता भंग करणार सबब अर्जदाराच अर्ज बेकायदेशीर असल्याने रद्द करण्यात यावा.

त्यांनतर वेळोवेळी पक्षकांराना बोलावुन चौकशी घेण्यात आलेली आहे. दि. २५/०२/२०२२ रोजी शेवटची सुनावणी ठेवण्यात आली.

दि. ०४/०३/२०२२ रोजी हितसंबंध असणारी व्यक्ती म्हणुन अर्जदार मोहम्मद शोएब मुशताक अहमद खान यांनी अर्ज देऊन असे कथन केले आहे की ते वक्फ संस्थेत पाच वेळेस नमाज पडतात वक्फचे रोजचे व्यवस्थापन करतात ते मस्जिदीचे सुमारे १४ वर्षापासुन इमाम आहे व ते हितसंबंध असणारी व्यक्ती आहेत. अर्जदार वसीम, मोहम्मद रफीक यांनी चुकीचा योजना अर्ज दाखल केलेला आहे त्यांनी ख-या गोष्टी लपवल्या आहेत. सबब अर्जदार श्री. मोहम्मद शोएब मुश्ताक अहमद खान यांचा अर्ज मंजुर करुन इतर सर्व अर्जदाराचे अर्ज रद्द करण्यात यावेत.

सोहेल जुलफेकार कुरैशी व इतर, यांनी लेखी युक्तीवाद सादर केलेला आहे व कथन केले आहे की, त्यांनी ६९/१३०/२०१० व ३२/४९/२०१४ या ६९ नुसार दाखल झालेल्या योजना रद्द करणे बाबत विनंती केली आहे. वक्फ अधिनियम १९९५ हा दि. ०१/०१/१९९६ नो पासुन आमलात आला आहे. सदरच्या संस्थेची योजना १९३६ मध्ये पारित झालेली आहे त्यामुळे तिच योजनापुढे चालु राहिल. सबब मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना नवीन योजना सुनावणीचा व निकाल देण्याचा अधिकार नाही. सबब वरिल सर्व अर्ज ना मंजुर करण्यात यावे.

अर्जदार सोहेल जुलफेकार कुरैशी यांनी मा. उच्च न्यायालय औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र. ३१९०/२०२२ दाखल करुन विनंती केली होती की, आमची सुनावणी झाल्याशिवाय मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी योजनेबद्दल कोणतेही आदेश पारित करुन नये. त्यावर न्यायालयाने दि. ०७/०३/२०२२ रोजी आदेश पारित करुन असे निदेश दिले आहेत की, सोहेल जुलफीकार कुरैशी यांनी त्यांचे लेखी निवेदन १० दिवसाच्या आत सादर करावे. सदरचे रिट पिटीशन निकाली काढलेले आहे.

ठराव क्रमांक ३५:-

सदर वक्फ संस्थेकरीता मॉडेल स्कीम बनविण्याकरीता ॲड.ए.यु.पठाण, ॲड.खालीद बाबु कुरेशी, डॉ.मुदस्सीर लांबे व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची समिती गठीत करण्यात यावी. सदर समितीने संस्थेची वक्फ डीड, मन्शा-ए-वक्फ इत्यादी बाबींचा विचार करुन आगामी १० दिवसात मॉडेल स्कीम बनवून सदर स्कीम मंडळाच्या पुढील बैठकीत सादर करावी.

(सन्माननीय सदस्या डॉ. फौजीया खान यांनी मांडलेले विषय)

विषय क्रमांक ३६:- वक्फ संस्थाचे मालमत्ता असलेल्या शेत जमीनी तीन वर्षासाठी लीज वर देण्याबाबत योजना

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या अखत्यारीत येत असलेल्या वेगवेगळया जिल्हयात अनेक वक्फ संस्था आहेत. या वक्फ संस्थापैकी काही वक्फ संस्थाकडे शेत जमीन मालमत्ता आहे. ही शेत जमीन या वक्फ संस्थाचे मुतवल्ली किंवा जिल्हा वक्फ अधिकारी हे लिलाव/हराशी द्वारे लोकांना लिजवर वापरण्यासाठी देतात. असे करतांना लिज ची मुदत ही एक वर्षाची ठेवलेली असते. त्यामुळे लिजवर घेणारा व्यक्ती हा या जमीनीत अधिक उत्पादन घेण्यासाठी मोठी गुंतवणूक करत नाहीत. त्यामुळे लिलावा मध्ये एका वर्षासाठी लिलाव कमी रक्कमेवर दयावी लागते. त्यामुळे वक्फ मंडळास आर्थिक नुकसान होते. हे नुकसान टाळण्यासाठी अशा शेत जमीनी लिलाव/हराशी द्वारे एका वर्षा ऐवजी तिन वर्षासाठी देण्यात याव्यात. तसेच लिलावाची रक्कम ही दर वर्षी ५ टक्कयानी वाढवून दयावी लागेल असे निर्धारीत करावे ज्यामुळे वक्फ संस्थांची जमीनी लिलावात जाताना सुदृढ स्पर्धा होईल व लिलावाची बोली जास्त किंमतीची येऊन वक्फ मंडळाचे आर्थिक फायद्याचे ठरेल. करीता ही बाब या वक्फ मंडळाचे समोर ठेवून यावर चर्चा विनियम होऊन निर्णय व्हावा.

ठराव क्रमांक ३६:-

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या अखत्यारीत येत असलेल्या संस्थांच्या शेत जमीनी ३ वर्षासाठी भाडेतत्वावर/लावणीवर देण्याचे अधिकार जिल्हा वक्फ अधिकारी यांना प्रदान करण्यात यावे. तथापि, भाडे करार करण्यापुर्वी संबंधीत जमीनी भाडयाने देण्याबाबतचे जाहिरात वक्फ मंडळाकडून एकत्रितरित्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावी. भाडेकराराची रक्कम दरवर्षी ५% ने वाढविण्यात यावी.

विषय क्रमांक ३७:- वक्फ संस्थाचे मुतवल्ली पद रिक्त झल्यानंतर अशा वक्फ संस्थाच्या कामकाजा बाबत

वक्फ अधिनियम १९९५ अंतर्गत कलम ३२ ग प्रमाणे वक्फ मंडळाच्या मुतवल्ली नेमण्याचे अधिकार आहेत. तर कलम ६४ प्रमाणे मुतवल्ली पदावरुन बडतर्फ करण्याचेही अधिकार आहे. तसेच ज्या वक्फ संस्थाचे मुतवल्ली नाहीत अशा वक्फ संस्थाचे व्यवस्थापन स्वत:कडे घेण्याचा वक्फ मंडळास कलम ६५ अन्वये अधिकार आहे.

राज्यात अनेक वक्फ संस्थाचे मुतवल्ली हे मयत झाले आहेत किंवा काम करण्यास असमर्थ आहेत. परंतु तरीही त्या संस्थाचे कामकाज हे इतर व्यक्तीकडून किंवा मयताचे वारसाकडून अनाधिकृतरित्या केले जाते. वास्तविकत: मुतवल्ली मयत झाल्यानंतर लगेचच एकतर त्या संस्थेचे मुतवल्ली वंशपरंपरागत असल्यास मयताचे वारसास विरासतदार म्हणून वक्फ बोर्डने मान्यता दयावयास पाहिजे किंवा जर मुतवल्ली पद हे निवड पध्दतीने असल्यास त्या परिसरातील योग्य अशा मुतवल्लीची नेमणुक वक्फ बोर्डाने करणे गरजेचे असते. परंतू सद्यस्थितीत किती वक्फ संस्थाचे व कोणत्या वक्फ संस्थाचे मुतवल्ली मयत आहेत तसेच काम करण्यास सक्षम नाहीत, तसेच अनाधिकृत व्यक्ती मुतवल्ली चे कार्य करीत आहेत. ही माहिती जिल्हा वक्फ कार्यालय, प्रादेशिक वक्फ अधिकारी किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे उपलब्ध नाही.

त्यामुळे एक विशेष मोहीम आखुन अशा वक्फ संस्था ज्यांचे मुतवल्ली मयत आहेत व या ठिकाणी वक्फ बोर्डची मान्यता नसतांनाही अनाधाकृतरित्या वक्फ संस्था चालविली जाते. त्याची संपुर्ण माहिती १५ दिवसात सर्वेक्षण करुन जिल्हा वक्फ अधिकारी, प्रादेशिक वक्फ अधिकारी यांचे कडुन मिळवून घ्यावी. यात वक्फ संस्थेचे नाव, नोंदणी क्रमांक, मुतवल्लीचे नाव, मुतवल्लीची नेमणूक पध्दत, जसे वंशपरंपरागत किंवा निवड पध्दतीने. त्यांचे संपर्क क्रमांक, सध्या कार्यरत अनाधिकृत मुतवल्ली त्याचे नाव, त्याचा संबंध, मोबाईल डिटेल्स, वक्फ संस्थाची मालमत्ता तपशिल, इत्यादी माहिती घेण्यात यावी.

ही माहिती मिळाल्यानंतर अशा वक्फ संस्थाचे मुतवल्ली नेमण्याबाबत प्रकरणे तपासुन मुतवल्ली नेमण्याची किंवा अशा वक्फ संस्थाचे व्यवस्थापन वक्फ मंडळाचे अखत्यारीत घेण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. या बाबीवर वक्फ मंडळाचे सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्याकरीता सादर.

ठराव क्रमांक ३७:-

ज्या वक्फ संस्थाचे मुतवल्ली मयत आहे, अनधिकृत व्यक्ती मुतवल्लीचे कार्य करीत आहे अशा वक्फ संस्थाचे सर्वेक्षण करुन जिल्हा वक्फ अधिकारी/प्रादेशिक वक्फ अधिकारी यांनी एका महिन्यामध्ये या बाबतची माहिती वक्फ मंडळास सादर करावी.

विषय क्रमांक ३८:- ध्वनी क्षेपकाचे वापरा बाबत

अ. ध्वनी क्षेपकाचे परवानगी साठी शासनाकडे सोपी व सुलभ कार्यपध्दती करण्यासाठी पाठविणे

मा. सर्वोच्च न्यायालय भारत सरकार यांनी ध्वनी क्षेपकाचे वापराबाबत नुकताच निर्णय दिला आहे. त्या निणर्यांचे अनुषंगाने राज्यभर मंदिर, मस्जिद तसेच इतर ठिकाणी नियमित स्वरुपात ध्वनीक्षेपकाचा वापर करण्यासाठी पोलिस विभागाकडे परवानगी मिळण्यासाठी अर्ज करण्यात येत आहेत. यामध्ये राज्यातील मस्जिदीवर धार्मिक प्रयोजनासाठी आवाहन करण्यासाठी ध्वनीक्षेपक वापराची परवानगी मिळण्यासाठी अर्ज देखील केले जात आहेत. याबाबत वेगवेगळया जिल्हयात वेगवेगळी कार्यपध्दती अवलंबली जात असुन वेगवेगळी कागदपत्रे मागविण्यात येत आहेत. त्यामुळे अर्जदारांच्या मनात एक प्रकारचे गोंधळाचे वातावरण निर्माण होत आहे. त्यामुळे या परवानगी साठी सोपी व सुटसुटीत असी कार्य पध्दती राज्यभर आखुन दिल्यास तसेच परवानगी साटी खुप जास्त कागदपत्रांची मागणी न करता परवाना मिळावा अशी लोकांची अपेक्षा आहे. मस्जिद अस्तित्वात असल्याबाबत इलेक्ट्रीक मिटर, स्थानिक संस्थांचे पुरावे व इतर काही पुरावाच्या आधारे परवानगी देण्याची सोपी कार्यपध्दती निर्धारीत करण्यासाठी मा. गृहमंत्री महाराष्ट्र राज्य यांना प्रस्ताव पाठविने योग्य होईल. त्यासाठी आज मंडळाने तसा ठराव करावा करीता सादर.

ब) मस्जीद नोंदणीची प्रकरणे तातडीने निकाली काढणे

वर नमुद प्रमाणे मस्जीद वरील ध्वनी क्षेपकास परवानगी बाबत मा. गृह मंत्री यांची भेट घेऊन विनंती करणे ही एक महत्वाची बाब आहे. परंतू याच बराबर अशा परवानगीसाठी मस्जीद नोंदणी झाली आहे काय? याबाबतची विचारणा झाल्यास मस्जीदची नोंदणी करुन घेणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत अशा प्रकारची प्रकरणे मोठया प्रमाणात असून आणखीही अनेक प्रकरणे नव्याने येऊ शकतात. त्यामुळे त्यासाठी वक्फ मंडळाने मस्जीद नोंदणीसाठी विशेष मोहीम हाती घेणे गरजेचे आहे व त्यासाठी मी मंडळास याबाबत ठराव घ्यावा.

ठराव क्रमांक ३८:-

अ) पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

ब) मस्जीद नोंदणी बाबत आगामी १० दिवसात विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे. सदर मोहिम पुर्ण झाल्यानंतर या बाबत आढावा घेवून पुढील निर्णय घेण्यात येईल.

विषय क्रमांक ३९:- वक्फ संस्थेचे जागेवरील अतीक्रमण हटविल्यानंतर त्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी उपाय याजना करणे

महाराष्ट्रात वेगवेगळया जिल्हा वक्फ संस्था असुन त्यांच्या स्थावर मालमत्ता आहेत. या स्थावर मालमत्तांवर बऱ्याच ठिकाणी अतिक्रमण केले जाते. हे अतिक्रमण काढण्याबाबत वक्फ अधिनियम अंतर्गत तरतुदी आहेत. याचा वापर करुन वक्फ जमीनी वरिल अतिक्रमण व अनाधिकृत ताबे काढण्यात येतात. त्यानंतर या जमीनीच्या संरक्षणाबाबत स्पष्ट अशी कार्यवाही वक्फ संस्था किंवा वक्फ बोर्डामार्फत होत नसल्यामुळे पुन्हा परत या जमीनीवर अतिक्रमण होतात किंवा अवैद्य ताबा केला जातो. परिणामतः वक्फ मंडळला पुन्हा पुन्हा तीच कार्यवाही करावी लागते व यामुळे वक्फ मंडळाची प्रतिमा खराब होते. त्यामुळे जेव्हा जेव्हा वक्फ मंडळाचे, वक्फ संस्थाचे मालमत्तावरील अतिक्रमणे किंवा अवैद्य ताबा हटविला जातो. त्या त्या वेळी या मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी एकतर अशा मालमत्तांना सुरक्षा भिंत बांधने किंवा अशी मालमत्ता लगेचच दुसऱ्या उपयोगात आणावी असे केल्यास पुन्हा त्याच जागेवर अतिक्रमण किंवा अवैद्य कबजा हेणार नाही, म्हणून या प्रकरणी वक्फ मंडळाने लक्ष घालून या प्रकरणात निर्णय घ्यावा.

ठराव क्रमांक ३९:-

१) वक्फ मंडळाच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली असलेल्या मिळकती तसेच वक्फ संस्थांच्या ताब्यात असलेल्या रिक्त मिळकती या संबंधी अतिक्रमण हटविण्याबाबत संबंधित ट्रस्टीकडून प्रस्ताव मागविण्यात यावे. वक्फ संस्थेचे जागेवरील अतीक्रमण हटविल्यानंतर त्या मालमत्तेच्या संरक्षण करणे आवश्यक आहे सबब, सदर जागेवरील अतिक्रमण हटविल्यानंतर तात्काळ त्याबाबत Expression of Intrest/advertisement मागविण्यात यावे. या बाबत शैक्षणिक, सामाजिक, धार्मीक , अपारंपारिक उर्जा या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्यांना प्राधान्य देण्यात यावे. यामुळे वक्फ मंडळाचे उत्पन्न वाढविण्यास मदद होईल.

२) वक्फ मंडळाच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली असलेल्या महत्वाच्या वक्फ मालमत्तेच्या संरक्षणासाठी संरक्षण भिंती/ तार फेन्सींग (कुंपन) बांधण्यात यावी. वक्फ मंडळाच्या सक्षमीकरणासाठी शासनाकडून दरवर्षी निधी उपलब्ध करुन देण्यात येतो यापैकी किमान ५% निधी या कामासाठी वापरण्यात यावा.

विषय क्रमांक ४०:-जिल्हा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे अधिकारी/ कर्मचारी यांचे करिता उजळणी प्रशिक्षण वर्गाचे अयोजन करणे

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे अधिकारी / कर्मचारी तसेच जिल्हा वक्फ अधिकारी, प्रादेशिक वक्फ अधिकारी यांना सद्यस्थितीत कोणतेही प्रशिक्षण दिलेले नसतांना सरळ सरळ काम करण्यासाठी सांगण्यात येते. त्यामुळे बरेचदा कार्यपध्दती. कायद्यातील तरतुदी, तसेच शासनाचे धोरण अंमलात आणण्याची पध्दती

योग्य रित्या हाताळले जात नाहीत व बरेचदा अनावधानाने चुका होतात. हया चुका होऊ नयेत व मंडळाचे कामकाज योग्यरित्या व प्रभावीपणे व्हावे या करिता औरंगाबाद येथे दोन दिवसीय उजळणी प्रशिक्षण वर्ग आयोजित करणे योग्य होईल. या उजळणी शिक्षण वर्गात अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी प्रशिक्षण देण्यात यावे. यासाठी खालील प्रमाणे विषय ठेवणे योग्य होईल.

१. वक्फ अधिनियम १९९५ व त्या अन्वये करावयाची कामे, तरतुदी व कार्यपध्दती
२. वक्फ मालमत्ता संबंधाने वक्फ अधिनियमातील तरतुदी, अतिक्रमण व अवैध हस्तांतरण प्रकरणात करावयाचे कामकाज आणि लिजवर जागा देण्याबाबत लिज रुल २०१४ मधील तरतुदी
३. वक्फ कार्यालयातील करावयाच्या कामकाजाच्या तरतुदी वैशिष्टयपुर्ण बाबी या वरिल माहिती
४. जिल्हा व विभागीय स्तरावरील वेगवेगळया विभागाच्या अधिकाऱ्या सोबत समन्वय व वेगवेगळया विभागाचे वक्फ कार्यालया सोबत येणारे संबंध व त्यांच्या तरतुदी
५. वक्फ मंडळाचे आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत, त्याबाबतचे ठेवावयाचे लेखे, आर्थिक सुधारणा या बाबतीत तरतुदी
६. वक्फ कार्यालयामध्ये रचना व कार्यपध्दती तसेच आस्थापना विषयक बाबी हाताळण्याची पध्दती वर्तुणुकी मधील आवश्यक सुधारणा करणे या बाबत मार्गदर्शन

हे उजळणी प्रशिक्षण औरंगाबाद येथे महसुल प्रशिक्षण प्रबोधिनी मध्ये निवासाची व्यवस्था करुन शनीवार, रवीवार या दिवशी घेतल्यास कार्यालयीन कामावर परिणाम पडणार नाही. सर्वजण उपस्थित राहतील त्यामुळे या बाबत वक्फ मंडळाने विचार करुन निर्णय घ्यावा.

ठराव क्रमांक ४०:-

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या अधिकारी व कर्मचारी यांच्याकरीता आयोजीत करावयाचे प्रशिक्षणाच्या कार्यक्रमामध्ये महसूल व वित्त विषयक तसेच अन्य विषयांचा समावेश करुन परिपुर्ण प्रशिक्षण कार्यक्रम अंतिम करण्यात यावा. सदर प्रशिक्षण देण्यासाठी रिसोर्स पर्सनची यादी मा.श्री.ए.यू.पठाण व मा.श्री.इम्तियाज काझी यांच्याशी सल्ला मसलत करुन अंतिम करण्यात यावी.

विषय क्रमांक ४१:- अखुंदमिया कब्रस्तान परभणी या वक्फ संस्थेचे मुतवल्ली नेमन्या बाबत प्रस्ताव पाठविणाऱ्या जिल्हा वक्फ अधिकारी यांचे विरुध्द कार्यवाही करणे बाबत

परभणी शहरातील वसमत रोड वरिल अखुंदमिया कब्रस्तान आहे. या कब्रस्तानचे मुतवल्ली असल्याचा बहाना श्री शेख सलीम हे करतात. त्यांनी या अखुंदमीया कब्रस्तानचे जागेवर दुकाने तयार करुन ती भाडयाने देऊन परस्पर भाडे वसुल करत असतांनाही त्यांनाच पुन्हा मुतवल्ली म्हणून नेमण्यासाठी प्रस्ताव पाटविला आहे. वास्तविकता: असे वर्तन करुन व मालमत्ता मधुन आर्थिक फायदा करुन घेण्याच्या उद्देशाने मुतवल्ली व जिल्हा वक्फ अधिकारी यांनी संगणमत करुन हा प्रस्ताव पाटविला असावा. याबाबत मी यापुर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे माहिती दिली होती व त्यांनी याबाबत मंडळाचे बैठकीतही जिल्हा वक्फ अधिकारी यांचा खुलासा घेऊन कारवाई करुत असे सांगीतले होते. महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ चे कर्मचारी/अधिकारी यांनी शिस्त पाळली पाहिजे. मंडळाचे आर्थिक हितास बाधा पोहचेल असे काम करु नये यासाठी काही अधिकाऱ्यांवर उदाहरणादाखल कडक कारवाई करणे गरजेचे आहे. सदर प्रकरणात जिल्हा वक्फ अधिकारी यांनी त्यांचेकडे काही काळ कारभार असतांना जाणिवपुर्वक असे प्रस्ताव पाठवून वक्फ मंडळाचे आर्थिक हितास बाधा पोहचेल असे कृत्य केले आहे. त्यामुळे अशा जिल्हा वक्फ अधिकारी विरुध्द कठोर अशी कारवाई करावी.

ठराव क्रमांक ४१:-

तत्कालीन जिल्हा वक्फ अधिकारी, परभणी श्री.मोहम्मद रियाजोद्दिन यांनी कर्तव्यात कसूर केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने श्री. मोहम्मद रियाजोद्दिन यांची विभागीय चौकशीची प्रक्रिया तात्काळ सुरु करण्यात यावी. विभागीय चौकशी दोन आठवडयाच्या आत प्रक्रिया पुर्ण करुन त्याबाबतचा अहवाल वक्फ मंडळाच्या बैठकीत सादर करण्यात यावा. विभागीय चौकशी प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत श्री.मो. रियाजोद्दिन यांना निलंबित करण्यात यावे.

विषय क्रमांक ४२:- दर्गाह बुऱ्हान शाह वली, इदगाह व कब्रस्तान, जिंतूर रोड परभणी च्या संबंधित इनाम जमीन सर्वे नंबर ६३६ व ६३७ मधील एकुन ४० भाडेकरुंच्या मासिक भाडयामध्ये तफावती बाबत

दर्गाह बुऱ्हान शाह वली इदगाह व कब्रस्तान, जिंतूर रोड परभणी ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ नुसार क्रमांक MSBW/PBN/३७/२००९ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. सदरील वक्फ संस्थेस सर्वे नंबर ६३६, ६३७ एकुण क्षेत्र २२ एकर ३१ गुंठे इनाम जमीन आहेत. सदर वक्फ संस्थेचा ताबा उपविभागीय अधिकारी परभणी यांनी दिनांक ३०.०८.२२१ रोजी वक्फ मंडळास दिलेला असुन सदर संस्था वक्फ मंडळाच्या थेट नियंत्रणात आहे.

सदरील वक्फ संस्थेच्या मिळकती मध्ये छोटे मोठे व्यवसाय करणार एकुण ४० भाडेकरु आहेत. तत्कालीन स्वयंघोषीत मुतवल्ली सय्यद साबेर अली यांनी नियम धाब्यावर ठेवून मनमर्जी प्रमाणे कोणाकडून कमी व कोणाकडून जास्त प्रमाणात भाडे वसुल केले आहे. त्यामध्ये फार मोठी तफावत दिसुन येत आहे. या संबंधी भाडेकरुंच्या समस्या जाणून घेण्यासाठी, थकीत भाडे वसुल करण्यासाठी तसेच वक्फ मंडळासोबत भाडेकरार करुन वक्फ मंडळात भाडे जमा करणे बाबत दर्गाह बुऱ्हानशाह वलीच्या संबंधीत सर्व भाडेकरुंना बोलवून दिनांक २१.०४.२०२२ रोजी परभणी येथे मा. डॉ फौजिया खान सदस्या महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, मा. आयुक्त महानगर पालिका परभणी, तहसिलदार परभणी यांच्या उपस्थितीत व मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, यांच्या अध्यक्षतेखाली चर्चा करण्यात आली. त्यामध्ये सर्व भाडेकरुंनी वक्फ मंडळासोबत भाडेकरार करण्यास व भाडे अदा करण्यास सहमती दर्शवली आहे. परंतू सदरील जागाचे भाडे फार जास्त असल्याने ते कमी करुन मिळणेस त्यांनी विनंती केली आहे. प्रकरणात परभणी चे या शिध्र सिध्द गणक २०२२ चे दरानुसार सर्वे नंबर ६३६/२ व ६३७ चे खुल्या जमीनीचे दर ९१०० प्रती चौ.मिटर आहेत. सुभाष रोड वर सिव्हील हॉस्पीटल ते जिंतूर रस्ता पर्यंत चे दर १२००० प्रती चौ.मिटर आहेत. यानुसार व्यापारी प्रयोजना दर निर्धारीत करणे योग्य होईल.

त्यानुसार सर्वे नंबर ६३६/२ व ६३७ मधील व्यापारी प्रयोजना करिता खुल्या जागेचे दराचा विचार केल्यास ९१०० चे २.५ % म्हणजेच दर चौ. मी. करीता २२७.५० पैसे दर येतात.

तथापी या भागातील सद्यस्थितीत भाडे दर हे जास्त असल्याने इदगाहचे दुकानाचे जास्तीचे भाडे असलेले ५ दुकानाचे १ चौ मिटरचे सरासरी दर काढावेत. या ५ दुकानाचे काढलेले प्र.चौ. मी. चे सरासरी दर व रेडीरेकनर चे येणारे २२७.५ या दोन्ही मधील सरासरी दर काढल्यास ते वाजवी दर ठरतील व त्यानुसार भाडे आकारणी करणे योग्य होईल. याबाबत वक्फ मंडळाने योग्य तो निर्णय घ्यावा असे मी प्रस्तावीत करते.

ठराव क्रमांक ४२:-

वक्फ लिज रुल्स २०१४ च्या तरतुदीनुसार कायदेशिर अभिप्राय घेवून सदर अभिप्रायानुसार हा विषय वक्फ मंडळाच्या पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

विषय क्रमांक ४३:-जिल्हा वक्फ अधिकाऱ्यांना वक्फ मंडळाचे वतीने गुन्हे दाखल करण्यासाठी प्राधिकृत करणे बाबत

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे मालमता व वक्फ संस्था हया राज्यातील जवळपास सर्व जिल्हयात आहे. राज्यामध्ये वेगवेगळया जिल्हयात वक्फ मंडळाचे काम होत असतांना बऱ्याचदा काही गैर कायदेशीर घटना घडतात. अशा वेळी गैर प्रकार करणाऱ्या विरुध्द फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल करण्याची आवश्यकता पडते. हे गुन्हे वेळीच दाखल केल्यास ते प्रभावशाली ठरते. परंतु सद्यस्थितीत अशा काही घटना घडल्यास त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे प्रथमत: लेखी स्वरुपात अहवाल पाठविला जातो. त्यावरुन मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालयात तपासणी होऊन तद्नंतर गुन्हा दाखल करण्यासाठी कळविण्यात येते नंतर गुन्हा दाखल करण्यासाठी प्रत्यक्षात अंमलबजावणी होते. या मध्ये बऱ्याचसा वेळ निघुन गेल्यामुळे एकतर गुन्हा योग्यरित्या तपासल्या जात नाहीत. गुन्हा करणारा पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न करतो व कार्यवाही प्रभावशाली होत नाही. त्यामुळे वक्फ मंडळाने व मंडळाच्या हिताच्या दृष्टीने जिल्हा वक्फ अधिकारी यांना त्यांचे स्तरावर गुन्हयाची गंभिरता विचारात घेऊन अती गंभीर प्रकरणात तात्काळ गुन्हा दाखल करण्यासाठी अधिकार देण्यात यावेत. ज्या प्रकरणात तातडीने गुन्हा दाखल करण्याचे तेवढे गरजेचे नसेल अशा प्रकरणात रितसर परवानगी घेऊन गुन्हा दाखल करावा. यासाठी अधिकाराचे प्रत्यायोजन जिल्हा वक्फ अधिकारी यांना करावे. यासाठी वक्फ मंडळाने योग्य तो निर्णय घ्यावा.

ठराव क्रमांक ४३:-

वक्फ मंडळाच्या मालमत्तेच्या नुकसानाबाबत जिल्हा वक्फ अधिकाऱ्याकडून गुन्हे दाखल करणेत येतात तथापि, या बाबत मार्गदर्शक सुचना नसल्याने गुन्हे दाखल करण्यामध्ये अनावश्यक विलंब होते सबब, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या बाबत सर्व जिल्हा वक्फ अधिकारी/प्रादेशिक वक्फ अधिकारी यांना सर्वसमावेशक मार्गदर्शक सुचनांचा मसुद तयार करावा. सदर मसुदा वक्फ मंडळाच्या पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

विषय क्रमांक ४४:-हजरत सय्यद शाह तुराबुल हक्क रहे. दर्गा विकास कामे

परभणी शहरात हजरत सय्यद शाह तुराबुल हक्क रहे. हा सर्वधर्मीयाचे श्रध्दास्थान असुन या वक्फ संस्थेचे परभणी येथे ४५ एकर जमीन आहे. या दर्गास दरवर्षी लाखोच्या संख्येने भाविक येतात. दरवर्षी २ फेब्रुवारी रोजी येथील ऊर्स असतो. परभणी हे मुस्लिम बहुल क्षेत्र असुन परभणी येथील हजरत सय्यद शाह तुराबुल हक्क रहे. दर्गाहचे जागेचा विकास केल्यास महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे शिरपेचात एक मोरपीस लावल्या सारखे होणार आहे. या दर्गाहच्या विकास करतांना त्यामध्ये धार्मिक, शैक्षणिक, आरोग्य विषयक, कौशलय विकासाच्या, व्यापारी व कर्मणुकीच्या विकास कामाचा विचार करुन सर्वकष असा आराखडा तयार केल्यास शासनाच्या वेगवेगळया विभागाचे निधी मिळून हा आराखडा पुर्ण करता येऊ शकतो. यासाठी आराखडा नेमण्यासाठी एक तज्ञ यंत्रणा निधारीत करुन या विकास आराखडयाची अंमलबजावणी करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्राधिकृत केल्यास हे कार्य पुर्ण होऊ शकते. त्यामुळे मी मंडळास परभणी येथील हजरत सय्यद शाह तुराबुल हक्क दर्गाहचे विकास आराखडा तयार करणे आणि तो पुर्ण करण्यासाठी कार्यवाही करण्यासाठी मंडळाने मान्यता दयावी.

ठराव क्रमांक ४४:-

खाजगी सल्लागार यांची नियुक्ती करुन दर्गाह हजरत सय्यद शाह तुराबुल हक्क रहे, परभणी या दर्गाहचा विकास आराखडा तयार करण्यात यावा व सदर

आराखडा वक्फ मंडळाच्या बैठकीत सादर करण्यात यावा. वक्फ मंडळाच्या बळकटीकरणासाठी प्राप्त होणा-या निधी मधून विकास आराखडयासाठी निधीची तरतुद करण्यात यावी.

(सन्माननीय सदस्य श्री. समीर गुलामनबी काझी, यांनी मांडलेले विषय)

(अतियात विभाग)

विषय क्रमांक ४५:- तकीया मुकरम अली शाह कब्रस्तान व मस्जीद, बीड ता. जि. बीड ही वक्फ संस्था, वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ६५ मधील तरतुदीनुसार वक्फ मंडळाच्या रास्त निगराणीत घेणे बाबत.

तकीया मुकरम अली शाह कब्रस्तान व मस्जीद, बीड ता. जि. बीड ही संस्था शासन राजपत्रानुसार नोंदणीकृत वक्फ आहे. जीचा क्र. MSBW/BED/२८१/२०१४ असा आहे. सदर संस्थेच्या संबंधित असलेली स.न. १० क्षेत्र ७.२८ एकर गुंठे जमीनीची नोंद कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यांत आलेली आहे. दि. २४ जानेवारी १९७४ च्या गॅझेटवर मुतवल्ली रकान्यात श्री. सय्यद नूर मगरीब यांचे नावाची नोंद आहे. या कार्यालयात उपरोक्त वक्फ संस्थेच्या व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये श्री. शेख अलीम शेख बाबू व इतर यांनी १७/०५/२०१६ रोजी योजना मंजुरीसाठी प्रस्ताव दाखल केले आहे. सदर प्रस्तावामध्ये श्री सय्यद हमजा पिता जैनोद्दीन यांनी दि. ११/४/२०१६ रोजी आक्षेप दाखल केले आहे. तसेच दुसरा योजना प्रस्ताव श्री. शाहनवाज अमीरोद्दीन खान व इतर रा. बीड यांनी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये दि. २२/०६/२०२० रोजी योजना मान्यतेसाठी प्रस्ताव दाखल केले आहे. सदर प्रकरणात आक्षेप असल्याने प्रकरण सुनावणीसाठी प्रलंबित आहे.

वर नमुद प्रकरणात कोणतेही व्यवस्थापन समितीच्या नियुक्तीचे वाद असल्याने वक्फ मंडळाने आपल्या ताब्यात घेणे बाबत आवश्यक ती कार्यावीह करणेसाठी वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ६५ नुसार वक्फ संस्था वक्फ मंडळाच्या रास्त निगराणीत घेणे बाबत वक्फ मंडळाच्या निर्णयसाठी सादर करण्यात येत आहे.

सद्यस्थितीत या वक्फ संस्थेची देखभाल करण्यास कोणीही मुतवल्ली नसल्याने तसेच कोणतीही सक्षम व्यवस्थापन समिती नसल्याने वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६५ नुसार कार्यावाही करुन वक्फ मंडळाच्या थेट निगरानीखाली घेण्याबाबत कार्यवाही करावी.

ठराव क्रमांक ४५:-

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६५ नुसार कार्यावाही करुन तकीया मुकरम अली शाह कब्रस्तान व मस्जीद, बीड ता. जि. बीड ही संस्था वक्फ मंडळाच्या थेट निगरानीखाली घेण्यात यावी.

विषय क्रमांक ४६:- सोलापूर जिल्ह्याकरिता स्वतंत्रपणे जिल्हा वक्फ अधिकारी हे कार्यालय सुरु करणेबाबत.

सोलापूर जिल्ह्यामध्ये अनेक संवेदनशील वक्फची प्रकरणे प्रलंबित आहे. सोलापूर जिल्हा पुणे जिल्ह्यापासून २७७ कि. मी. अंतरावर असल्याने प्रादेशिक वक्फ अधिकारी यांनी दुरवर प्रवास करुन या जिल्ह्यातील वक्फ संस्थांशी संबंधीत कामकाजावर लक्ष ठेवणे जिकिरिचे

ठरते त्यामुळे सोलापूर जिल्ह्यासाठी स्वतंत्र कार्यालय सुरु करुन तेथे एक जिल्हा वक्फ अधिकायाची कर्मचारीवृंदासह नियुक्ती करावी.

ठराव क्रमांक ४६:-

सोलापूर जिल्ह्यामध्ये जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय, सुरु करण्यास वक्फ मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

ठराव क्रमांक ४७:-

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या प्रत्येक बैठकीचे इतिवृत्त मंडळाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावे. तसेच शेवटच्या इतिवृत्ताची प्रत वक्फ मंडळाच्या कार्यालयासमोर माहिती फलकावर (Notice Board) लावण्यात यावी.

ठराव क्रमांक ४८:-

मंडळाने बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार वक्फ मंडळाच्या बैठकीचे इतिवृत्त अंतिम होण्याची वाट न पाहता, आदेश निर्गमित करण्याची/बैठकीतील निर्णयाची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करावी.

ठराव क्रमांक ४९:-

वक्फ मंडळाच्या जागेवर शासकीय विभागांचे कार्यालये वक्फ अधिनियम अस्तित्वात येण्याच्या आधीपासून सुरु करण्यात आलेले आहेत. या बाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी अशा शासकीय कार्यालयांची माहिती १५ दिवसांच्या आत जमा करण्यात यावी.

अ. क्र.	माननीय सदस्यांचे नांव	स्वाक्षरी
१	डॉ. वजाहत मिर्झा अथर मिर्झा मा. अध्यक्ष.	
२	श्री. सय्यद इम्तियाज जलील मा. लोकासभा सदस्य तथा सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद	16/6/22
३	डॉ. फौजिया तेहसीन अहमद खान. मा. राज्यसभा तथा सदस्या, म.रा.व.मं.औरंगाबाद	
४	मा. डॉ.मुदस्सीर निसार लांबे मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद	14/6/22
५	मा. ॲड. ए. यु. पठाण, मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद	15.6.22
६	मा. इम्तियाज मुश्ताक काझी, सह सचिव शालेय शिक्षण व क्रिडा विभाग तथा मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद	17/1/22
७	मा. समीर गुलामनबी काझी, मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद	15/6/22
८	मा. मौलाना हसनैन शाकीर. मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद	
९	मा. मौलाना सय्यद अतहर अली, मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद	16/6/22
१०	श्री. अनिस शेख, मुख्य कार्यकारी अधिकारी	14/06/2022

ॲड. खालीद बाबु कुरेशी
मा. सदस्य, म.रा.व.मं. औरंगाबाद